मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



मा. नामदार बाळासाहेब तिरपु
भंडारा साहित्य संमेलनाचे
उद्घाटन करताना.

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र



भंडारा येथील वि. सा. संघाच्या साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांचा सत्कार.

साभार पोच

पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	मूल्य
				रु. पैसे
तुषार	कें. एन. नांदूरकर	मंगल प्रकाशन, नशिराबाद, जि. जळगाव	१४८	५.००
ज्ञानेश्वर काव्य आणि विचार	व. दि. कुलकर्णी	मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई नं. ४	१३२	१२.५०
स्वप्न एका वाल्याचे	दिलीप परदेशी		८२	६.००
५१ गमतीदार गोष्टी	पंढरीनाथ रेगे		१२५	६.००
दास डोंगरी राहतो	गो. नि. दांडेकर		२७९	२०.००
रानफुली	गो. नि. दांडेकर		१११	९.००
अंधारवाटा	सुभाष शेंडे		१३२	१२.००
वेडगळ	जयवंत दळवी		१५३	१४.००
उचल्या	शरश्चंद्र टोंगो		१५०	८.००
हृदयातले चांदणे	रत्नप्रभा शहाणे	मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैद्राबाद-२७	१५८	१२.००
युकॅलिप्टस	सुरेश मथुरे	पाप्युलर प्रकाशन, मुंबई	९६	८.००
ग्रंथवेध	वि. रा. करंदीकर	विद्या प्रकाशन, पुणे-३०	१११	७.५०
श्री रामकृष्ण परमहंस	वा. गणेश घोडवैद्य	घोडवैद्य प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर	१४४	१०.००
अनुशानगीता अर्थात आधुनिक महाभारतातील कृष्णार्जुन संवाद	प्रा. डॉ. नरसिंह अच्युत दाभोळकर	सिद्धार्थ नगर, गोरेगाव, मुंबई	६०	८.००
तुकारामाचे अभंग	डॉ. श्री. म. पिंगे, प्रा. गजानन माळी	व्हीनस प्रकाशन, पुणे-३०	१११	७.५०
साहित्य वेध	निर्मलकुमार फडकुले	व्हीनस प्रकाशन, पुणे-३०	१२९	१०.००

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

जून-जुलै १९७८
ज्येष्ठ-आषाढ १९००

संपादक :
वि. वा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये)
(वर्ष ३४, अंक ३-४

संपादक-मंडळ :
सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुभेदार, बजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. वा. कुंडले

वि. सा. संमेलनाचे भंडारा येथील अधिवेशन

वि. सा. संघाच्या विद्यमाने विदर्भ साहित्य संमेलनाचे ३३ वे अधिवेशन भंडारा येथे दि. ४ व ५ जून १९७८ रोजी भरविण्यात आले होते. विदर्भातील ख्यातनाम साहित्यिक व प्रभावी वक्ते प्राचार्य राम शेवाळकर यांनी या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते.

या संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उप-मुख्यमंत्री मा. श्री. बाळासाहेब तिरपुडे यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष होते भंडारा येथील श्री. जीवनचन्द्र निर्वाण व संयोजक होते श्री. प्रल्हाद पांढारकर.

वि. सा. संमेलनाचे पूर्वाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, प्राचार्य या. मु. पाठक, प्रा. शरश्चंद्र टोंगो व श्री. आ. रा. देशपांडे (कवी अनिल) हेही या समारोहाला अगत्याने उपस्थित राहिले होते. याप्रसंगी वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर यांनी पूर्वाध्यक्ष या नात्याने संमेलनाची सूत्रे नवीन अध्यक्षांच्या स्वाधीन केली.

उद्घाटनाच्या भाषणात मा. बाळासाहेब तिरपुडे यांनी काही विचार परखडपणे व्यक्त केले. साहित्यिक हे ईश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीचे भाष्यकार आहेत हे मान्य करूनही आमच्या मराठी साहित्यिकांनी सामान्य माणसाचे प्रश्न सोडविले नाहीत, हे मला स्पष्टपणे सांगितले पाहिजे असे ते म्हणाले. कै. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर त्याचप्रमाणे डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते या नामवंत साहित्यिकांचा गौरवपूर्ण उल्लेख करुन श्री. तिरपुडे म्हणाले की, मराठी साहित्य व साहित्यिक यांनी राजकारण्यांना प्रेरणा दिली आहे. साहित्यात जशी शक्ती आहे तसेच त्यात स्फूर्ती देण्याचे सामर्थ्यदेखील आढळते.

संमेलनाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषणात अनेक मोलाचे विचार मांडले. हे संमेलन ज्या मुक्त वातावरणात भरले त्या संदर्भात अध्यक्षांनी आविष्कारा-स्वातंत्र्यावरोबरच त्याच्या मर्यादांचीही समर्पकपणे जाणीव करून दिली.

कलास्वाद व मराठी वाङ्मयातील लैंगिकतेचे चित्रण या लोकप्रिय विषयाचा सविस्तर ऊहापोह करून प्राचार्य शेवाळकर हे दलित साहित्याचा परामर्श घेताना म्हणाले :—"दलित साहित्याचे निर्मळ स्वागत करताना त्याने मराठी समीक्षेवरच्या जबाबदाऱ्या वाढविल्याचे भान ठेवावे लागेल. नित्याच्या

साभार पोच

पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	मूल्य
				रु. पैसे
तुषार	के. एन. नांदूरकर	मंगल प्रकाशन, नशिराबाद, जि. जळगाव	१४८	५.००
ज्ञानेश्वर काव्य आणि विचार	व. दि. कुलकर्णी	मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई नं. ४	१३२	१२.५०
स्वप्न एका वाल्याचे	दिलीप परदेशी		८२	६.००
५१ गमतीदार गोष्टी	पंढरीनाथ रेगे		१२५	६.००
दास डोंगरी राहतो	गो. नि. दांडेकर		२७९	२०.००
रानफुली	गो. नि. दांडेकर		१११	९.००
अंधारवाटा	सुभाष शेंडे		१३२	१२.००
वेडगळ	जयवंत दळवी		१५३	१४.००
उचल्या	शरच्चंद्र टोंगो		१५०	८.००
हृदयातले चांदणे	रत्नप्रभा शहाणे	मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैद्राबाद-२७	१५८	१२.००
युकॅलिप्टस	सुरेश मयुरे	पाप्युलर प्रकाशन, मुंबई	९६	८.००
ग्रंथवेध	वि. रा. करंदीकर	विद्या प्रकाशन, पुणे-३०	१११	७.५०
श्री रामकृष्ण परमहंस	वा. गणेश घोडवैद्य	घोडवैद्य प्रकाशन, सीतावर्डी, नागपूर	१४४	१०.००
अनुशानगीता अर्थात आधुनिक महाभारतातील कृष्णार्जुन संवाद	प्रा. डॉ. नरसिंह अच्युत दाभोळकर	सिद्धार्थ नगर, गोरेगाव, मुंबई	६०	८.००
तुकारामाचे अभंग	डॉ. श्री. म. पिंगे, प्रा. गजानन माळी	व्हीनस प्रकाशन, पुणे-३०	१११	७.५०
साहित्य वेध	निर्मलकुमार फडकुले	व्हीनस प्रकाशन, पुणे-३०	१२९	१०.००

अनुक्रमणिका

परंपरागत कसोटयांनी या साहित्याचे मूल्यमापन कितपत न्याय्य होईल याबद्दल मी साशंक आहे. कर्कश व तर्कनिपुण पंडितांनी मांडलेल्या कसोटयांच्या कुंपणावरून अस्सल साहित्य नेहमीच छलांग मारून जाते व या चकव्याने बुचकळयात पडलेले पढिक विद्वान चरफडत व हात चोळीत बसतात. प्रत्येक चांगली कलाकृती हे समीक्षेला नवे आव्हान असते. इथे समीक्षेला आपल्या नव्या शोधाचे प्रस्थान ठेवावे लागते. दलित साहित्याने हे आव्हान आपल्या पुढे उभे केले ते आपण वस्तुनिष्ठ वृत्तीने स्वीकारले पाहिजे."

आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप शेवाळकरांनी पुढील शब्दांत केला :—"साहित्य हे जीवनशरण आहे. आणि जीवन हे इतके व्यापक, अथाग, व्यामिश्र आणि गूढ आहे की आपल्या आकलन–शक्तीला व सृजनतेला हे चिरंतन आव्हान आहे. हे आव्हान जीवनापासून पळून नव्हे, तर त्याच्या पायाशी नम्रतेने बसून ताज्या कुतुहलाने समग्र समजावून घेऊन व त्याच्या महत्तेला सर्वांगाने आलिंगन देऊन आणि त्याचे रहस्य सुजाण प्रगल्भतेने व्यक्त करण्याच्या हमीवरच कुणालाही स्वीकारता येईल.

प्राचार्य शेवाळकर यांचे हे समग्र अध्यक्षीय भाषण मननीय असून ते पुस्तक-रूपाने प्रसिद्ध झालेले आहे. अशा या विचारांना चालना देणाऱ्या अभ्यासपूर्ण भाषणाबद्दल व्यक्तिशः मी त्यांचे अभिनंदन करतो.

वि. सा. संघाच्या भंडारा शाखेच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन 'युगवाणी'कडे आलेले भंडारा जिल्हयातील संपादक-मंडळाने निवडलेले साहित्य या अंकात आम्ही प्रकाशित करीत आहो.

अंतरंग

⊕ ⊕ ⊕

देवीसिंग व्य. चौहान / **संस्कृत श्वाशुर**[1]
(मूळ लेखक-राल्फ्. एल्. तर्नर)

[ज्यूल ब्लोक यांनी मराठी भाषेचा शास्त्रीय अभ्यास करून नव्या आर्यभारतीय भाषांच्या उद्‌गमविकास अध्ययनाचा पाया घातला. जॉन बीम्स यांनी आर्यभारतीय भाषांच्या तौलनिक अभ्यासाची मुहूर्त मेढ स्थापित केली. राल्फ् तर्नर (जन्म इ. १८८८) यांनी भारतीय भाषांची तौलनिक कोशरचनेची भक्कम पायाभरणी केली. त्यांनी १९३१ त नेपाली भाषेचा तौलनिक व व्यौत्पत्तिक कोश प्रकाशित केला. हे मोठे भरीव कार्य होते. त्यांचा भारतीय भाषांचा तौलनिक अभ्यास गेल्या अर्धशतकापेक्षा अधिक कालापासून चालू आहे. इ. १९६२–६६ या कालात त्यांनी आर्यभारतीय भाषांचा तौलनिक कोश प्रकाशात आणला. पूरक सूची खंड, इ. १९६९ व ध्वन्यात्मक विश्लेषण, इ. १९७१, हे खण्ड प्रकाशित केले.

तर्नर यांच्या संशोधन लेखांचा 'कलेक्तेद पेपर्स' हा ग्रंथ १२७५ त लंडनच्या स्कूल ऑफ ओरिएन्तल व आफ्रीकन स्तदीज या संस्थेने प्रकाशित केला. तर्नर इ. १९३७ पासून १९५७ पर्यंत या संस्थेचे संचालक होते. या संग्रहात तर्नर यांच्या १९१२ ते १९७३ पर्यंतच्या एकूण ४४ लेखांचा समावेश आहे. यात मराठी, गुजराती, हिन्दी, नेपाली, रोमाणी आदी भाषांचा मूलभूत व कूट समस्यांचा ऊहापोह आहे. गुजराती व सिंहली भाषांच्या मराठीशी असलेल्या जवळिकीची चर्चा आहे. पिशाच व दरद या भारतीय भाषांचे अन्त:स्वरूप तर्नरच्या कोश व लेखांतून पहिल्यांदा अधिकृतरीत्या पुढे आलेले आहे. रोमाणी भाषेचा अधिकारवाणीने घेतलेला परामर्ष अपूर्व आहे. मराठीच्या अभ्यासात ज्यूल ब्लोकसारखेच तर्नर यांच्या साहित्याला महत्त्व आहे.— अनुवादक.]

संस्कृत श्वशुर आणि श्वश्रू- (=लातिन सासर व सोक्रुस्) यांच्या प्राचीनतेविषयी कसलीच शंका नाही. हे शब्द नव्य आर्यभारतीय भाषांत[2] सामान्यपणे वावरतही आहेत : उदाहरणार्थ : पाहा :— नेपाली कोशातील शद्ब ससुरो आणि सास[3]. तरीपण श्वशुर शद्बाच्या वृद्धि-रूप, ओल्द हाय जर्मन भाषीय शद्ब **सुअगुर** याच्याशी समान असलेल्या, श्वाशुर या मूळ शद्बाविषयी सबळ संशय वाकरनागेल-देब्रुन्नेर यांच्या अल्त-इन्दिश्चे ग्रामर २, २, परिच्छेद ३४ क मध्ये व्यक्त करण्यात आलेला आहे.

---

१. बुलेतिन ऑफ द स्कूलऑफ ओरिएन्तल अँन्द आफ्रिकन स्तदीज, २७, १, १९६०, पृ. १०६ ते १०८.

२. श्वशुर शद्बाचा प्राचीन अर्थ मुख्यत: 'नवऱ्याचा बाप' असा होता. पण उत्तरकालात 'नवऱ्याचा किंवा वायकोचा बाप' असा अर्थविकास झाला. या शद्बाच्या आधुनिक प्रतिनिधींची प्रत्येक भाषेतील कोशात सासरा म्हणून नोंद होते. पण हा शद्ब द्व्यर्थी राहातो. कोशातून याची व्याख्या नवऱ्याचा किंवा वायकोचा बाप अशी करण्यात येते; डुमाकी ससुरा, काश्मीरी हिहुर, पंजाबी सौहरा (**ददौहरा**-'वायकोचा किंवा नवऱ्याच्या वापाचा वाप' या शद्बाशी ताडून पाहणे), नेपाली **ससुरो,** हिन्दी **ससुर,** मराठी **सासरा.** केवळ काही भाषांच्या कोशातच त्याचा किंवा तिचा वाप असा अर्थ आढळतो; (१) नवऱ्याचा वाप : मैथिली **ससुर**; (२) पत्नीचा वाप गवर-बति **प्लोशुर** आणि शक्यत: शुमश्ती शाशुरेम् 'माझा सासरा' (पुरुषाने म्हणावयाचे, एन्. टी. एस्. १३, १९४५, २७६).

३. काही नवीन रूपे. विशेषत : स्त्रीलिंगी, जसे ग्रीक भाषेत **एकुरा** : पालि **ससुरी,** शुमश्ती **शशुरी,** पशइ (कुरंगल), **शांसुरी,** हिंदी सास < श्वश्रू-खेरीज तिरस्कारार्थी ससुरी, पंजाबी सहुरी, सिंहली सुहुल < ***श्वश्रुरा** (हे, दब्ल्यु जायगर, एतिमालाजिकल ग्लॉसरी, सिंहलीज् लँग्वेज, १८५, < श्वश्रू, या प्रमाणे नव्हे) अशी आढळतात. परंतु पुल्लिंगी रूपांसाठीसुद्धा सवि **प्राश** पु. प्रश स्त्री. < श्वश्रू, जी. मोर्जन्स्तर्न, नोट्स ऑन फलूडा. पृ. ४८.

श्वाशुर-शद्ब फारच उशीरा, केवळ कथासरित्सागर ग्रंथात आढळलेला असला आणि तो विशेषण म्हणून ठिपला, तरी तो एक प्राचीन मूळ शद्ब आहे, अशी दब्ल्यू. श्चूल्जे, विलएन स्क्रिग्तेन, ६३ याच्या आक्षेपाच्या परिपुष्ट्यर्थ, अलीकडे पॉल थिएम याने, झेड. डी. एम्. जी., १०६, १, १९५६, पृ. १५३-५४ मध्ये, पुनश्च ही चर्चा उपस्थित केली आहे. थिएम याचे म्हणणे असे की आपल्या महाभाष्यात (कीलहार्नची आवृत्ति, २, २४३, ७–८) पतञ्जलीने उद्धृत केलेल्या, 'सासऱ्याच्या मुलाचा मुलगा'[४] या अर्थाच्या श्वाशुरि-शद्बावरून त्याच्या पूर्वीचे श्वाशुर- (––जुनी उच्च जर्मन **सुअगुर**) 'सासऱ्याचा पुत्र' हे अध्याहृत रूप सिद्ध होते. श्वाशुर हा शद्ब पाणिनीय (४.१.१३७) श्वशुर्य शद्बामुळे बाजूला पडला आणि श्वाशुर शद्बास आपले विशेषणात्मक कार्य स्वीकारण्यास मोकळीक मिळाली. या श्वाशुर शद्बाचा अर्थ कथासरित्सागरात आढळल्याप्रमाणे 'सासऱ्यासंबंधीचे' असा आहे.

श्वाशुर- 'सासऱ्याचा पुत्र' याच्या अस्तित्वाचा आधुनिक भाषांमधूनही अधिक पुरावा उपलब्ध होतो. हे सत्य आहे की यांपैकी अनेक भाषांतून श्वाशुर- 'सासऱ्यासंबंधीचे' या विशेषणापासून शद्ब व्युत्पन्न झालेले आहेत, उदाहरणार्थ निश्चितपणे सिंधी विशेषण **साहुरो**, परंतु नवऱ्याच्या बापाचे घर किंवा नवऱ्याचा अथवा बायकोचा बाप, हा मूळ शद्बसुद्धा : प्राकृत सासुर-न, पाश्चिमात्य पंजाबी साहवरें पुं., बिहारी **ससुरा**, मैथिली सासुर, जुनी हिंदी **सासुर** पुं., आधुनिक सासरा पुं., 'नवऱ्याच्या किंवा बायकोच्या बापाचे', जुनी मारवारी सासरउ, गुजराती सासरूं न., 'नवऱ्याच्या वा बायकोच्या बापाचे', (आणि सासरी स्त्री <* श्वाशुरीय- किंवा श्वाशुरिक न.), मराठी सासूर न., 'नवऱ्याच्या बापाचे'. प्राकृत, गुजराती व मराठी भाषांतील गृहवाचक शद्ब नपुसकलिंगी असल्याच्या वस्तुस्थितीवरून, विशेषण मूळापासून हे शद्ब व्युत्पन्न होण्याला पुष्टी मिळते.

चार उदाहरणांत **श्वाशुर** या शद्बाला श्वशुर- शद्बाचा अर्थ प्राप्त झाल्याचे दिसून येते अपभ्रंश सासुर-पुं. 'सासरा' युरोपीय जिप्सी शस्त्रो[५], मराठी सासरा पु.[६], जुनी हिंदी सासुर पुं. 'सासरा' तसेच 'सासऱ्याचे घर'. जर हा अर्थविकास विशेषणापासून[७] असेल तर त्याला अंशतः समान्तर गोत्रवाचक आणखी एक संज्ञा आढळून येते. या दुसऱ्या संज्ञेत शक्यतः विशेषणात्मक विस्तार असलेल्या शब्दाने मूळच्या साध्या शद्बाला बाजूला सारले. हिन्दी जवांई पुं. 'जावई' < संस्कृत **जामातृ-** शद्बाला विरोधी बऱ्याचशा वायव्य भाषांत, तसेच जिप्सी भाषेत ***जामात्र(क)-** वर अवलंबून असलेली रूपे दिसून येतात : जिप्सी डुमाकी **जमाच** (बिना

---

४. 'श्वशुरस्यापत्यं श्वशुर्यः । श्वसुर्यस्यापत्यं श्वासुरिः । श्वाशुरेर्यूनश्छात्राः श्वाशुराः ।

येथे अपत्य शद्बाच्या अर्थ 'पुत्र' आणि 'श्वशुर- शद्बापासून पैतृक नाम' या, पतञ्जलीच्या संदर्भावाचून पिटर्सबर्ग कोशात व सन्दर्भासह मोनियर वुइल्म्सच्या 'सासऱ्याचा पुत्र' अशा रीतीने व्याख्यात केलेल्या श्वाशुरि-शद्बाचा अर्थ, थिएम म्हणजे त्याप्रमाणे, 'सासऱ्याच्या पुत्राचा पुत्र' आहे, यात संशय नाही.

५. युरोपीय जिप्सी भाषेत जोडाक्षर व्यंजनापूर्वीचा अ, अ म्हणून शेष राहातो आणि एकाच व्यंजनापूर्वीच्याचा ए बनतो. हा दुसरा बदल मागाहून येणाऱ्या व्यंजनातील स्वराच्या लोपामुळे घडून येतो, उदा. **तेर्णो** 'जवान' < **तरुण, पस्तेरणि** 'गालिचा' < **प्रस्तरण-पेर्यस** 'विडंबन' < **परिहास-, केरको** 'कडू' < ***कटु-क्क-** (जे. साम्पसन, डायलेक्ट्स् ऑफ वेल्स ४, १४६, याच्या स्लाव्ह शद्बापासून नव्हे).

६. जे. ब्लोक, ल लांग्वे मराठे, ४२१८ श्वशुर- शद्बापासून नव्हे.

७. शद्बभांडारातील इतर क्षेत्रात, एखाद्या साध्या नामाला, त्याच्या वृद्धि-विशेषण रूपापासून व्युत्पन्न शद्बाने बाजूला सारल्याचा प्रकार काही दुर्मिळ आहे असे नाही; हा नमुना पाहावा, बिल्व-पुं 'बेलाचे झाड', अवेस्ता, याचे रूप काश्मीरी बिल पुं., पंजाबी बिल्ल पुं., हिंदी बील पुं., गुजराती बील न. 'त्याचे पान' बीली स्त्री, 'त्याचे झाड' या भाषात शेष आहे. परंतु हा शद्ब इतर ठिकाणी बैल्व-विशेषण, शतपथब्राह्मण, उदा. मराठी बेल न. 'बेलाचे फळ', पु. 'बेलाचे झाड' या शद्बाकडून बाजूला सारला गेलेला आहे.

अनुक्रमणिका

भाषेतून ऋण?), युरोपीय **जमत्रो,** सवि **जमलो,** फलूडा **झामत्रो,** पिना **जचो,** काश्मीरी **ज़ामतुर**उ लहंदा **जवात्रा,** त्याचप्रमाणे, **देवृ-** 'नवऱ्याचा धाकटा भाऊ' (प्रथमा देवा), प्रसुन भाषेत **अव** (जी. मोर्जन्स्तर्न, एन्. टी. एस्. १५, १९४९, २५२) आणि हिन्दी इत्यादींत **देवर-.** याच्या जोडीने फक्त **देव्रक** शद्वापासून काश्मीरी **द्रयुय**उ आणि पाश्चात्य पहाडी (खशली, भद्रवाही, भलेसी) **ड्लेवु**[८] ही रूपे आढळतात.

परंतु यापेक्षाही ***श्वाशुर-** 'सासऱ्याचा पुत्र' शद्वाचे जुने अस्तित्व काश्मीरी आणि सिंहली या सीमाभागातील दोन भाषांवरुन दिसून येते. काश्मीरी **हहर** 'बायकोचा भाऊ' आणि सिंहली **हूरा** 'मेहुणा' हे दोन्ही शद्व नियमितपणे ***श्वशुर-** शद्वाचे प्रतिनिधी आहेत. श्वशुर- शद्वापासून > ***शुशुर-** (गवर-बती **शूशुर** अथवा हिन्दी **सुसरा** शव्दाप्रमाणे) > ***शिशुर-** मागील व पुढील श ध्वनीच्या ओष्ठीकरण प्रभावामुळे, > हिहुर)[१०]. श्वशुर- मधील ऱ्हस्व अ पेक्षा, **हहर** शद्वात ***श्वाशुर**-शद्वातील दीर्घ आ गुणात्मक बदलाला अधिक प्रतिरोधक आहे. सिंहली **हूरा**-शद्व दत्स्य. गायगर एटिमालिजिश्चे देस सिंघलीसिस्चेन, ९७, याने संस्कृत शशुर्य-, पालि ***ससुरिय-** शद्वापासून व्युत्पादिला आहे. परंतु सिंहलीत उ-इ > इ-इज (पी. बी. एफ्. विजेरत्ने, बी. एस्. ओ. ए. एस्. १२, १, १९४७, १८०) आणि अ-इ > इ-इ (तत्रैव, १७६) होत असल्यामुळे, याचा विकास ***हीर-** आ असा झाला असता. याच्या उलटपक्षी, अ-उ याचा उ-उ होत असल्यामुळे ***श्वाशुर-** > **हहुर-** > **हुंहुर-** > **हूर-आ.**

हाच शद्व पुल्लिंगी अनेकवचनी सिंधी **साहुरे,** लहंदा **साहवरे-** 'सासऱ्याचे कुटुंब' अर्थाच्या शद्वाच्या मुळाशी असला पाहिजे. हे शेवटचे दोन्ही शद्व 'सासऱ्याचा मुलगा' या अर्थाच्या शद्वापासून निघालेले आहेत. ते 'सासऱ्याच्या कुटुंबातील माणसे' या अर्थाच्या शद्वापासून निघणे कठीण आहे.

***श्वाशुर-** शद्वाच्या पाणिनीय हकालपट्टीमुळे, नामतः **श्वशुर्य-, श्वशुरिय-** 'सासऱ्याचा मुलगा' अर्थात 'मेहुणा' शद्वापासून पशइ (लौरोवन) **इश्पैरी-** 'बायकोचा भाऊ', (दर्र-ई नूरी) **पएरी-** 'बायकोचा किंवा नवऱ्याचा भाऊ' हे शद्व व्युत्पन्न आहेत. येथे दिसून येणारा श ध्वनीचा विकास दाय < इश याच्याप्रमाणेच आहे.[११] वश्करीक **शाशिर** 'नवऱ्याचा भाऊ' दीर्घ आ ध्वनीसहित याची समानता जी. मोर्जन्स्तर्न, ए. ओ. १८, १९४०, २५२ याने **श्वाशुर्य-, श्वाशुरिय-** वर्णिली आहे. हा शेवटचा शद्व ***श्वाशुर**-मधील दीर्घ स्वराने प्रभावित झाल्यामुळे, **श्वशुर्य श्वशुरिय-** यांचा प्रतिनिधी असू शकतो. यामुळे कथासरित्सागर ग्रंथातील **श्वाशुर्य-** 'बायकोचा किंवा नवऱ्याचा भाऊ' या रूपाच्या याथातथ्याचा पुरावा उपलब्ध होतो. पिटर्स्बर्ग कोश

---

८. अनपेक्षित देवृ काश्मीरीतील **द्यार-** (देवरम् रूपाला बाजूला सारून, स्वसारम्, भर्तारम् इत्यादी रूपांच्या अनुषंगाने < द्वितीया *देवारम्) द्यारथ अ र 'नवऱ्याच्या भावाचा पुत्र', **द्यार** अ ज 'नवऱ्याच्या भावाची कन्या' अशा समासातील.

९. तरी पण हे अशक्य नाही की **श्वाशुर-** या विशेषणाच्या रूपापासून नव्हे, तर **श्वाशुर-** या मूळ शद्वरूपापासून हा व्युत्पत्तिविकास झालेला असून, 'सासऱ्याचा मुलगा' या अर्थापासून केवळ 'सासरा' हा अर्थ प्राप्त झाला. अशा प्रकारचा गोंधळ कदाचित् पशइ भाषेत (लौरोवन) शैर (ई) पु. 'सासरा' समान्तर वाटतो. हा शद्व मोर्जेन्स्तर्न, इन्दो-ईरानियन फ्रान्तियर लँग्वेजेस, ३, ३, १६५ याने * श्वश्रू शद्वापासून व्युत्पादिला आहे; परंतु त्याची व्युत्पत्ती **श्वशुर्य-, श्वशुरिय-** 'सासऱ्याचा' मुलगा' शद्वापासून अधिक सयुक्तिक आहे. त्याच पशइ भाषेत इश्पैरी 'सासऱ्याचा मुलगा' (पुढे पहा) असा शद्व आहे. रूप व अर्थ यासंबंधीचा हा भेद बोलीबोलींतील उसणवारीमुळे घडून आला असे समजले पाहिजे.

१०. जी. मोर्जन्स्तर्न याने एका वैयक्तिक पत्रातून सुचविल्याप्रमाणे.

११. जी. मोर्जन्स्तर्न, इन्दो-ईरानियन फ्रांतियर लँग्वेजेस ३, ३, १९ याने तात्पुरता व्युत्पादिला आहे < ***श्वश्रीय-.** त्याने त्याची तुलना **श्वशुर्य-** बरोबर केली आहे.

व त्याचे अनुकरण करणाऱ्या मोनियर वुइल्यम्सने **श्वाशुर्य**-शद्ब **श्वशुर्य**–शद्बाचा केवळ चुकीचा पाठ आहे असे म्हटलेले आहे. उलटपक्षी **शाशिर**-हा शद्ब अन्वेपणतः <**श्वाशुरि**- पासून, 'सासरा' अर्थापासून 'सासऱ्याचा मुलगा' या अर्थान्तराने, निघालेला आहे.

सारांश असा : भारोपीय भाषेतून वारसा रूपाने आलेला * **श्वाशुर**- 'सासऱ्याचा मुलगा' शद्ब काश्मीरी व सिंहली भाषांत जीवित राहिलेला आहे, आणि कदाचित सिन्धी व लहंदा भाषांत; **श्वशुर्य-**, **श्वाशुरिय**- याने त्याची जागा घेतली व ते पशइ भाषेत शेष आहे आणि असे असल्याखेरीज, या अवस्थेत **श्वाशुरि**- 'सासऱ्याच्या मुलाचा मुलगा' शद्बाने 'सासऱ्याचा मुलगा' असा अर्थ वदलून, कदाचित् श्वाशुर- च्या संपर्काने रूपान्तरित होऊन, वश्करिक भाषेतही. एकाच वेळी दोन्ही **श्वाशुर**- व **श्वाशुर्य-**, **श्वाशरिय-**, सुद्धा एका पिढीने मागे सरकतात आणि आपला अर्थ, 'सासऱ्याचा मुलगा' पासून 'सासरा' असा अर्थ वदलतात; पूर्वोक्त शब्द (साध्या मूळ शद्बाच्या जागी त्याचे वृद्धि-विशेपण प्रयुक्त होत आल्याची अवस्था नसली तर) अपभ्रंश, युरोपीय जिप्सी, हिन्दी, मराठी भाषांत; उत्तरोक्त पशइच्या लौरोवन बोलीत. उत्तरकालीन संस्कृतात **श्वाशुर**-शद्बाला फक्त विशेषणात्मक मूल्य असून तो सिंधीत शेष आहे आणि नपुंसकरूपाने (पाहा गृहम्) व सासऱ्याचे घर या अर्थाने प्राकृतात आणि मुख्य भारताच्या वहुतेक भाषांत–पाश्चात्य पहाडी, विहारी, मैथिली, हिन्दी, मारवारी, गुजराती, मराठी, आजपर्यंत शेष राहिलेला आहे.

***श्वाशुर**-शद्बाखेरीज, संस्कृतात स्वगोत्रेतर लग्नाच्या नात्याचे आणखी दोन शद्ब चालत आलेले आहेत : देवृ-(देवर) 'नवऱ्याचा धाकटा भाऊ' आणि श्याल- 'वायकोचा भाऊ'. दोन्ही वहुतेक सर्व आर्य-भारतीय क्षेत्रात रूढ आहेत (उदाहरणार्थ पाहा :–नेपाली शद्बकोश, शद्ब देवर, सालो). या दोन्ही शद्बात बहुधा निरपवादपणे धाकट्या भावाचा अभिप्राय असतो. तरी पण ते इतक्या निश्चितपणे, *श्वशुर हा प्राचीन शद्ब ज्यात शेष आहे अशा <दोन भाषांत शेष राहिलेले नाहीत. जीत **हहर**- 'बायकोचा भाऊ' असा मर्यादित अर्थ आहे, त्या काश्मीरीत देवृ- आहे. पण तीत पुल्लिंगी **श्याल**- लुप्त झालेला आहे; तीत फक्त त्याचे स्त्रीलिंगी **रूप साल** 'बायकोची वहीण' श्याली- हे शेष आहे. सिंहलीत **हूरा**- 'मेहुणा (वायकोचा किंवा नवऱ्याचा भाऊ?)' शद्ब शेष असला तरी **देवृ**-आणि **श्याल**-दोन्हीही लुप्त झालेले आहेत.

अनुवाद १० फेब्रु., १९७७

⊕ ⊕ ⊕

शैलेश / **निवृत्ती**

एखाद्या निवृत्त क्षणी
अस्तावून येतात
नुस्ते शद्ब – शद्बभोगी,
तेंव्हा या
निर्मनुष्य रहदारीत
एखादा अक्षरशून्य
कोपरा शोधून पाहावा;
. . .माझी पावले
वाळवून घ्यायचीयत् मला.

जी. बी. मेश्राम / **डाग**

आसवात भिजलेल्या वेदनांना,
क्षारत्व प्राप्त झाले,
आणि आग झाली जखमेवर,
मीठ चोळल्यागत.
डोळे मिटून मुक्या मनाने,
सारे सहन केले,
घाव वूजेल म्हणून
दाहकता कमी झाली
पण डाग मात्र कायम आहे.
सनातन संस्कृतीचा–

धर्मराज निमसरकर / अग्नि-आवर्त

पाऊस कोसळत होता मरणाच्या आक्रांताने.
अंधार साचत होता भयाचे डोह आत भरुन.
वीज लखलखाटत होती विध्वंसाच्या तावाने.
आवाजाने हृदयावरचे संकोचाचे तलम आवरण फाडून टाकले होते.
अस्वस्थतेच्या चिंध्या वावरून लोंबकळत होत्या.
डोळे विझल्यागत झाले होते कानं फुटल्यागत.
समोरचं काही एक दिसत नव्हतं. अस्सा धुव्वाधार पाऊस.
वारा घोंगावत होता, पाण्याचे तुषार, थेंबांचा मारा, गारव्यानं झोंबणं.
सगळं कसं चिंब चिंब. ह्या चिंबपणाने सगळे शाश्वत गारठून गेलेले.
रस्ते वाहत होते गढूळ पाण्याने गच्च गच्च भरुन सगळी घाण घेऊन.
अस्साच कोसळला म्हणजे उन्हानं लाही लाही झालेली माती निवते.

अंगात साचलेली काळी ऊब निघून जाते. अस्सं भिजल्याने अंग शहारतं, अंगातली सगळी आग कानात साचते.

काळे कुट्ट ढग आभाळातून पडायला आले होते, तेव्हा मी घाई करून निघाले होते. नको आणखी आता अंगाची आग, नको आणखी आता मनावर सावट आणणारा मनस्ताप.

तुझं ते वादळी वाऱ्यासारखं उन्मळून पाडणारं बोलणं नको.

तुझी ती तरवारीच्या धारदार पात्यासारखी नजर नको. तिचा तो वेग. कुठल्याकुठं उडवून नेणारी. उंचावरून नेऊन आदळणारी. ह्याच नजरेने तर माझ्यात सुरूची झाडं पेरली होती. उगविली होती, वाढविली होती.

तू म्हणायचास मला, या झाडांच्या सावलीत बसायचं आहे. या सावलीत बसून, तुझ्यात गुलमोहर उमललेला पहायचाय मला.

मला त्या गुलमोहरांच्या फुलांचा रक्ताळलेला रंग आवडत नसे. तरी तू रोज मला भेट द्यायचास गुलमोहरांची फुलं मौसम आहेतोपर्यंत.

या फुलांच्या जीव गुंतवून टाकणाऱ्या रंगाचा छंद लागतो, सहवास लागतो. अवेळी फुलणारी फुलं नव्हत.

ऋतू कधी चुकत नाही. माझ्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाले असलेल्या जीवाच्या जखमा भडभडून वाहायच्या रक्ताचाही रंग लालच असतो ना!

ग्रीष्माच्या तळमळण्याने फुलतात ही फुलं. नकोय मला.. पण माझ्याने हेच बोलवत नव्हते.

तुझ्या डोळ्यांतले समुद्रपक्षी मला बोलूच देत नव्हते.

मी मौन असायचे. निंबोणीच्या सावलीसारखी. तुझ्या देहपुष्पाच्या भाराने भारावलेला, गर्भरेशमी रात्रीच्या वस्त्रातून निथळणारा दुःखस्राव. कशा वेचून घेतल्यास गारगोटचा डोळ्यातल्या. मला कळलचं नाही.

पाऊस कोसळतच होता. वीज लखलखाटतच होती. प्रकाश विरत होता. गारठा वाढतच होता. गढूळ पाणी साचतच होतं. आडोसा पोरका होत होता. वातावरण भयानक वाटत होतं. घरांच्या खिडक्या दरवाजेबंद होते. बाहेर अमानुष दंगल सुरू असताना जीवाच्या भीतीने घराघरातले जीव घाबरून

दारं खिडक्या घट्ट लावून घेतात त्यागत. मोकाट, बेवारस कुत्री, गायी ढोरं मिळेल त्या आश्रयामध्यें निपचित गारठून उभी होती.

मी एका अशाच घराच्या आश्रयाने उभे होते. उभे काय होते नुस्ते थरथरत होते. कापत होते. कोणाच्या घराचे बंद दार ठोठावून आश्रय मागावसं वाटत नव्हतं. त्या घरामधला आश्रय असह्य होऊनच तर मी बाहेर पडले. अशा अभाग्या वेळी. जीवाची घाम लागून गेल्यावर जशी अवस्था व्हावी, या पाऊस-येणात जीव कंठाशी आला होता. पाऊसभारापासून स्वतःला या तोकडचा असहाय्य आश्रयापासून बचावून घेत असता महापुरात बेघर झालेल्या जीवासारखी माझी अवस्था झाली होती. अंगावरचे कपडे सगळे चिंब झाले होते. साडी वर अुचलून धरली होती. तारुण्य कपडयावर अनावृत झालं होतं आणि भिरभिरणाऱ्या नजरा आता अधाशासारख्या चाटायला लागतील म्हणून मी अस्वस्थ होत होते. पायाखालून पाणी वाहत होतं. त्यावर वरून पडणाऱ्या थेंबांचा आवाज, त्यावर उठणारे तरंग––चक्र–चक्र.

पावसाने गाठायच्या आधी मला वाटलं होतं चांगल्या ठिकाणी थोडा वेळ घालवावा. पावसात भिजू नये.

पण, मनातली आग––आगीने लावलेला वणवा. वणव्याने व्यापलेलं अंतर्विश्व मला कुठलाच निर्णय घेऊ देतं नव्हतं. मी चालत होते. चालत राहिले. पाऊस कोसळायला लागला तरी चालतच राहिले. या पावसाने तरी आग विझेल आतली, दाह शांत होईल मनाचा.

तो बोलायचा ते चाकोरीबाहेरचं होतं. कधी न ऐकलेलं. रोजच्या आयुष्यात अंगवळणी न पडलेलं. त्याचं पाहणं विवरात प्रकाशाचा थेंब हुडकावा त्यागत होतं. खूपखूप खोल पाहायचा तो. आपल्याच आत घालमेल व्हायला लागायची. काय शोधतो या डोळचांतून हेच कळत नसे.

आणि मग हळूच बोलायचा ––

मी पाहतोयना ते मला कुठे दिसतच नाही. या जगाच्या पसाऱ्यात तर नाहीच पण तुझ्या डोळचां-तही नाही.

तुझ्या डोळचांच्या पलीकडेही नाही आणि या माणसांत तर मुळीच नाही.

ते कुठे आहे? येथे आहे काय?

मी दुभंगून जायची अंतर्बाह्य. संशयचक्राच्या वादळात, प्रश्नांच्या गदारोळात मी भिरकावल्या जायची. त्याचं बोलणं सुरूच राह्यचं.

येथे असणारच. मला वाटतेना. मग येथे नक्कीच असणार!

मी माझ्या हृदयाला चिरून काढतो. माझ्या रक्ताचा रंग लाल आहे.

का आहे लाल? पिवळा का नाही?

पांढराशुभ्र का नाही शांतिदूतासारखा! सोनेरी का नाही, सिंहासनाच्या वर्खासारखा? येथे स्वयंभू आहे. शाश्वत आहे, पण त्याला नष्ट केल्या गेलं. त्याचेवर काळं पांघरूण घातलयं.

अस काही तरी बोलायचा, मला हे सगळं असंबद्ध वाटायचं. पण त्याचं बोलणं आतड्याला पीळ लागून बाहेर आल्यासारखं असायचं. मन गहिवरून जायचं. मी नुस्ते ऐकत रहायचे. डोळे पांढरे व्हायचे. चेहऱ्यावरचं हसू मावळून जायचं.

मी माझी कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त करू शकत नव्हते. त्याच्या बोलण्याचा आवाज वाढायचा. कधी खूप क्षीण व्हायचा.

बोलत असताना, आपल्या आत उत्पात करणारे विचार व्यक्त करीत असताना त्याला कमालीचा त्रास व्हायचा. त्याच्या चेहऱ्यावरील क्षणात विरणारे, क्षणात भडकणारे वैराण वादळासारखे चौफेर धावणारे अनामिक भाव पाहून मला भीती वाटायची. स्वतःला हरवून बसल्यासारखे मी त्याचे समोर बसून राहायचे.

मध्येच अवखळ प्रश्न विचारायचा.

माझ्यात काय आहे प्रेम करण्यासारखं . . . ?

आणि मग स्वतःच मौन बसायचा माझ्यात पाहत.

मला काहीच सांगता यायचं नाही. मी पण दूर दूर कुठे तरी पाहत राहायची. काय उत्तर द्यायचं मला काहीच सुचायचं नाही. मग आमचं दोघांचंही अवकाशात शून्य शोधण्याच्या पाहण्यासारखं चालायचं. किती तरी वेळ. कोणालाच वेळेचं भान नसायचं. ही आर्तता आटत यायची तेव्हा भयाण रितेपणाची जाणीव व्हायची. या प्रश्नाचं उत्तर किती भावनात्मक आहे. किती खोल आहे. त्याचा किनारा गवसायचा नाही मला. मग उत्तर काय देऊ!

मला निरुत्तर पाहून तो खदखदून हसायचा. त्या हसण्यासाठी त्याला आपल्या आतल्या सत्वाला फार मोठे मोल द्यावे लागत असावे. त्या हसण्यामध्ये कुत्सितपणा नसायचा किंवा भयानकताही नसायची. एक प्रकारचा निर्मळ शुद्ध भाव असायचा.

म्हणायचा मी समुद्रावर झाडं लावणार आहे अशोकांची.

त्यांची तू राखण करायची. समुद्राच्या फेसाळलेल्या पाण्याने त्यांची प्यास शमवायची — फेसाळलेला समुद्र तू बघितलास!

मी नुस्ते ऐकत राहायचे. मला आवडायचं त्याचं ते अंगाअंगाला थरकापणारं बोलणं. जीवाला चक्रीय वादळात नेऊन सोडणारं. आपण काही तरी चाकोरीबाहेरचं ऐकतो आहे. जे कधी ऐकलं नाही, कोणी ऐकवलेलं नाही-पाहिलं नाही. मला एका वेगळ्या प्रकारची कृतार्थता वाटायची आणि एक प्रकारची अन मिक डोळे नसलेली भीती.

तो म्हणायचा माझ्यातला काळोख पार निघून जातो, विरून जातात काळोखदग्ध दिश. माझ्यातल्या. जेव्हा मी असं बोलतो. या भौतिक जगाच्या असंख्य कटकटींतून क्षणासाठी सुटावतो. यत ओघात सगळे पाश विसरून जातो. सगळ्या शापांपासून मुक्त होतो. अमृततुल्य आनंद प्राप्त होतो मला.

पण मला काही एक अनुभवता येत नव्हतं. सवयीने मला काही समजू उमजू लागलं.

आवडूही लागलं होतं. काही काही कळायचं पण नक्की काय आहे हे नव्हतं कळत.

संध्याकाळची वेळ होती. सूर्य अस्ताला चालला होता, दिवसभर तापून. आम्ही दोघेही बसलो होतो वाळूत.

असंच तावून तापून अस्ताला जायचं माझ्या आयुष्यात आहे की काय! तापणं म्हणजे काय? कदाचित या प्रश्नाच्या जाळ्यात तो फसला असावा. उदास नजरेनं तो सूर्याच्या अस्ताला जाऊ घातलेल्या लाल गोळ्याकडे पाहत होता. थोड्यावेळातच त्याच्या चर्येवरचे भाव बदलले आणि माझेकडे वळून त्याने प्रश्न केला, "तू ज्वालामुखी पाहिला आहेस काय?"

"नाही". माझं अल्पउत्तर.

"मग काय बघितलंस ?", त्याचं उखडून वैतागून बोलणं.

"भाकरीच्या तुकड्यासाठी दिवसभर झगडणारे जीव. आयुष्य जगवता यावं म्हणून आठ तास स्वतःला बंदिस्त करून ठेवणारे पांढरे जीव. आत्मप्रतिष्ठेसाठी एकमेकांचा जीव घेणारे उन्मत्त घोडे. आणि ही दिवसेंदिवस अंगावर शेवाळं वाढवून घेणारी बुरसटलेली माणसं... .बस्स!" तो त्वेषाने बोलला एवढं आणि गप्प झाला.

समुद्राच्या मंद मंद हेलकावे खाणाऱ्या पाण्याकडे पाहत पाहत, मुठीत वाळूचे कण घट्ट धरून भकास भकास नजरेने. आकाशात पसरत जाणाऱ्या लालभडक रंगाकडे ओथंबलेल्या डोळ्यांनी काही तरी शोधत.

त्या दिवशीचा सूर्यास्त तुला आठवतो. अफलातून लालरंग पसरला होता सगळ्या आकाशात. किती मस्त वाटायचं. डोळे सुखावल्यासारखे झाले होते. असा सूर्यास्त मी प्रथमच पाहिला कित्येक दिवसां-

नंतर–आकाश भरून काढणारा. मला वाटलं होतं, सगळ्या पिचलेल्या, नागावलेल्या जीवांचे उश्वास मुक्ती मिळवून आनंदाने घुमत आहेत आकाशांत.

किती आनंदात होता पण थोड्याच वेळात त्याला भयंकर उदास झाल्याचं मी पाहिलं.

तो म्हणाला होता, "केव्हा केव्हा मी पण भ्रमिष्टासारखा ह्या अगतिक वाटांवरून घुमत भटकतो. मिळणाऱ्या संकेतांचे खरे अर्थ मलासुद्धा कळत नाहीत. कळावे म्हणून किती आटापिटा करतो जीवाचा."

त्याची खिन्नता मला जखमी करून गेली. त्याच्या प्रामाणिकपणाची उदात्तता मला कळली. एवढं बोलून जाण्यासाठीसुद्धा कमालीचं सामर्थ्य असावं लागते अंगात.

अस्साच्या अस्सा आतल्या अंत:करणात साठवून घ्यावा असं वाटलं होतं मला. पण त्याच्या भव्यतेमुळे मी अणूहूनही लहान झाले होते.

हेच त्याच्या प्रश्नाचं उत्तर पण मला सांगता येत नव्हतं.— कसं सांगू —त्याच्या भव्यतेला पेलून घेतील असे शब्दच नव्हते माझ्याजवळ.

शब्दांचा दुष्काळ.

तुझ्या घोंघावत येणाऱ्या महापुरात वाहून.

दुष्काळात वाहून जाणारी हवे.

देवळातल्या गाभाऱ्यात भरणारा अंधार.

अंधाराने खचणाऱ्या पायऱ्या.

रचताना पायऱ्या भोगलेले भोग.

भोगाने दिलेले दान.....

आज मी त्याचेकडे गेले होते तेव्हा दिशा भिजून गेल्या होत्या, पावसाच्या रिपरिपीने. मधून अधून उन्हं चमचमत होती. थोडा उष्मा वाढला होता. तो बसला होता. कमालीचा शांत. मात्र तेवढाच उत्साही दिवस होता. डोळ्यात कसलसं अनामिक तेज लखलखत असलेल्याचं जाणवलं मला. माझं स्वागत नेहमी तो स्मित करून करायचा. आज तो खडखडून हसला. मला त्याचं हे हास्य परिचित होतं. तो जेव्हा असं हसायचा तेव्हा तो खूप बोलायचा. ऐकणाऱ्याला कंटाळा येईस्तो. मी बसले त्याच्यासमोर. त्याला मी त्याच्यासमोर असे बसलेले आवडतं असे पाय मुडपून.

समोरच्या शोकेसमध्ये भगवान बुद्धाची ध्यानस्थ मूर्ती ठेवली होती. जगातलं अपरंपार दु:ख पाहून करुणेने, अनुकंपेने भारावून आलेले त्यांचे डोळे, अर्धे मिटलेले. दु:खाभार वाहून हताश झालेल्या जीवाचा अकर्मकपणा पाहून ह्यांचे मिटलेले डोळे. त्या शांत ध्यानस्थ मूर्तीकडे तो शांतपणे पाहत होता.

त्याने हळूच बोलण्यास सुरुवात केली. माझे प्राण कानात स्थिरावले. जगाच्या इतिहासाच्या क्षितिजावर उगवलेली आणि आयुष्यभर स्वयंतेजाने लखलखाटत राहिलेली ही माण्सं किती थोर होती! संपूर्ण मानव जातीचं कल्याण हे माझं कल्याण समजणारे आणि आपलं आयुष्य अर्पण करणारे. .किती प्रामाणिक स्वत:शी आणि जगाशी. आम्हीही माणसंच पण किती अप्रामाणिक स्वत:शी आणि जगाशीसुद्धा, मी माझी प्रतारणा करतो. तू तुझी प्रतारणा करतेस आणि आपण दोघेही अेकमेकांची प्रतारणा.

आयुष्य असं असंबद्ध प्रतारणेच्या रंगमंचावर नटवत असतो आपण आणि अंकाअंकाच्या मध्यंतरात अहंकाराने फुगून जातो. सत्य म्हणजे काय अजून कळलंच नाही आपल्याला.

असं काही तरी तो भयानक बोलेल असं वाटलं नव्हतं मला. त्याच्या शांत मुद्रेकडे पाहून त्याच्या उत्साहाकडे पाहून. पण ह्या कमालीच्या शांततेच्या पोकळीतून अस्वस्थेकडे धाव घेण्याची त्याची रीत मोठी विलक्षण होती.

या माणसाने, माणसाच्या जीवनात दु:ख शाश्वत आहे म्हणून माणसावर अपरंपार प्रेम केलं. आपलं आयुष्य वेचलं त्याच्या दु:खाचे कारण शोधण्यास आणि त्याचे निरासन करण्यात.

आणि मी प्रत्येक वेळी तुला विचारतो आहे. तू माझ्यावर का प्रेम करतेस ?

........तू प्रत्येक वेळी मौन. अबोल राहत आली आहेस. मी प्रत्येक वेळी अस्वस्थ होत राहिलो.

त्याने विचाराचे, चिंतनाचे मुक्त अमृततुषार उडवावेत आणि त्यामध्ये मी चिंब भिजावे. पण आज अकल्पित. मनाला छिन्नविछिन्न करणारे शब्द ऐकून हृदय फाटून जात होतं. कशी समजूत घालावी या मित्राची. कसं सांगावं माझ्या सर्वस्वाला !

स्त्री पुरुषाकडे आकृष्ट होते स्वत:चं स्त्रीत्व पूर्ण करून घेण्यासाठी. कारण पुरुषाशिवाय तिला स्त्रीत्व प्राप्त होऊ शकत नाही. प्रेमाचा पाझर तिच्यात गळतो या न्यूनतेच्या शापातून.

माझ्यात विकार स्वयंभू आहेत.
स्वयंभू विकार तुझ्यातही.
वासनेचे उन्हाळे आणि वाळवंट.
माझ्याही प्रदेशात तसेच तुझ्याही प्रदेशात.
या प्रदेशातन् लज्जेचे पांघरूण
घेऊन भटकणारे आम्ही चोर —
चोरत असतो एकमेकांचे उणेपण,
चोरत असतो स्वत:ला
स्वत:च्या उणीवांना......

मी अबोल बसले होते. त्याच्या बरसणाऱ्या शब्दसुमनांच्या मुसळधार वर्षावात ओलेचिंब होऊन अंगात थरकाप भरला होता. एका अनामिक भीतीने अंतरंग हळूहळू भरत होतं. त्याच्या डोळ्यांतून नुसत्या ठिणग्या बाहेर पडत होत्या. माझी मती गुंग झाली होती. तो किती वेळ, काय काय बोलत होता, मला कळलं नव्हतं. आकलन होत नव्हतं.

"अशी मठ्ठपणे माझ्या समोर बसू नकोस जा ऊठ" .असे तो माझ्यावर जोरात ओरडला तेव्हा मी भानावर आले. त्याचे अंग रागाने थरथरत होते. चेहऱ्यावर वेगळेच भाव होते. माझ्यानं त्याची ही अवस्था बघवत नव्हती. त्याचं नेहमीच हे असं असायचं. म्हणून मी किती दिवस त्याचा हा जाच सहन करायचा ! मी पण कोणीतरी आहे. एक स्त्री असले म्हणून काय झाले. मला माझी स्वतंत्र अस्मिता आहे. स्वातंत्र्य आहे. मला माझे विचार आहेत. याच्या अशा पेटण्यामध्ये मी भस्म का व्हावं ? उत्कट प्रेम असलं म्हणून काय झालं ? त्यालासुद्धा त्याचं पावित्र्य असते. मलाही माझ्या सहनशक्तीच्या बाहेर गेल्यासारखं वाटलं मलाही थोडा राग आला. माझ्याही अंगाची, अंतर्यामाची आग आग झाली. 'मी येते' म्हणून बाहेर निघाले.

त्याची मुद्रा एकदम शांत झाली. सगळे भाव नाहीसे झाले होते. कमालीचा शांत झाला होता. वादळानंतरची शांतता.

"आता थांब. . .बघ आकाश भरून आलं" .त्याने खूप आग्रह केला. आकाश भरून आलंय.

येथेही आकाश भरून आलयं,
बरसतील ढग काळेकुट्ट कुठेतरी . .
माझी शपथ जाऊ नकोस, पावसात सापडशील, सर्दी खोकला होईल. अशा सांजवेळी निघू नकोस . .

पण मी निघालेच. माझ्यात उफाडलेला दाह मला तिथे थांबू देत नव्हता. त्याच्या आर्ततेतल्या वर्षावात तो विझत नव्हता. मी कुठेतरी दुखावल्या गेले होते. ते दुखणं मला असह्य झालं होतं. आपण अग्निआवर्तात सापडलो आहे असं वाटत होतं. हे अग्निआवर्त नसानसातून भिनेल आणि एक दिवस काही तरी विपरीत घडेल. ते सोसून घ्यावं इतपरची या मनाची अजून तयारी झाली नाही. कुठल्यातरी पारंपारिक संस्काराने हे मन अजूनही ग्रस्त आहे. हे मन पुढे जाऊ देत नाही. नुस्ते पायांनी चालत जाण्यात काय अर्थ आहे? मनही चाललं पाहिजे.

⊕ ⊕ ⊕

रमेश ललगूणकर / **माणसाचा जन्म**

सगळे बदलते आहे
माझे; माझ्यातले
एका विशाल चेतनोत्साहाच्या मूलस्त्रोतच
उमडून पडत आहे माझ्यातून.
साऱ्या संदर्भांचे अर्थ बदलले आहेत त्यामुळे
रक्तमांसमज्जेत वितळत चालले आहे
सर्व नक्षत्रांसह हे आकाश,
आणि मृत्युपार झाले आहेत जन्माचे हेलपाटे.
एक अखंड वाहणारा प्रवाह
अंधाराच्या ऐलपैल
दीपकळीप्रमाणे नेमका प्रकाश देणारा
त्याला फुटत चालले आहेत
हस्तपादादि अवयव
आणि सामर्थ्यगर्भी मन झंकारत
विलीन होत चालले आहे त्या मूळ स्त्रोतात.
हा जन्मोत्सव माझा—
माणसाचा.
वाजू लागली आहेत वाद्ये
एका माणसाच्या जन्माची.

अपर्णा देव / **तीन कविता**

(१)

दूर टेकडीवर कोसळणारा पाऊस
रोज मला खुणावून बोलावितसे
पण मीच जाणून बुजून
पाहिले न पाहिलेसे करी
अखेर तोच माझ्याकडे आला
मी त्याला डोळ्यात भरून घेतले ।

(२)

आल्या झाकोळून सावल्या आणि व्याकुळले मन
तुझ्यावीण सारे क्षण उदास उदास
आर्त घालीत साद उडे अनोळखी पक्षी
हाका आल्या परतोनी माझ्या माझ्याच पाशी
येत आहे काळोखात रान जवळी जवळी
मी ही उभी इथे त्यास जाण्यास सामोरी ।

(३)

नेहमीचा पावलाखालचा रस्ताही कसा दूर गेला
जराही हलविले नाहीत शेंडे झाडांनी पाहून मला
घरांनो थोडे तर डोळे उघडून माझ्याकडे पहा
इतके का तुम्ही माझ्यावर रागावले आहात?
पण मला असे दूर लोटू नका मी पुन्हा परत आल्येय ।

शब्दछेदकाने[1] वाक्यांचे छेद पाडल्यावर शब्द हाती येतात. हे शब्द ध्वनींनी बनलेले असून त्यांना स्वतःचा अर्थ असतो. विशिष्ट शब्दाने विशिष्ट आशय व्यक्त होण्यासाठी विशिष्ट ध्वनींची विशिष्ट रचना आवश्यक असते व या रचनेचा आशयाशी असलेला संबंध समाजमान्य असावा लागतो. 'पाणी' या शब्दातील **/प आ ण ई/**[2] हेच ध्वनी वेगळ्या क्रमाने आले, उदा. (आपणी=) **/आ प ण ई/** किंवा (आपीण=) **/आ प ई ण/** अथवा वेगळे अवयव होऊन आले उदा. (णी+पा=) **/ण ई/+/प आ/** किंवा (पाण+ई=) **/प आ ण/+/ई/** तर 'पाणी' या शद्वाने अभिप्रेत असलेला अर्थ व्यक्त होणार नाही. शब्दाला केवळ विशिष्ट ध्वनिसमूह एकत्र येऊन चालत नाही तर तो विशिष्ट क्रमाने यावा लागतो. 'पाणी' या शब्दाला सर्वमान्य अर्थ व्यक्त होण्यास तो त्यातील ध्वनी, त्यांची लांबी, त्यातील आघात इत्यादी उच्चारपद्धतीच्या सर्व वैशिष्ट्यांसह एकाच पद्धतीने उच्चारला जावा लागतो. पाणी या शब्दातील (पा=) **/प आ/** हा अवयव ऱ्हस्व व (णी=) **/ण ई/** हा अवयव त्या मानाने दीर्घ उच्चारला जायला पाहिजे, तरच आपल्याला अभिप्रेत अर्थ व्यक्त होणार : त्याऐवजी 'पाणी' या शब्दातील 'पा' हा अवयव अतिदीर्घापेक्षाही दीर्घ व 'णी' हा अवयव अतिऱ्हस्व उच्चारला गेला तर पाणी मागणारी व्यक्ती अशक्त, आजारी, जखमी किंवा आर्त आहे अशी काहीशी कल्पना 'पाणी' या शद्वाच्या सर्वमान्य अर्थाच्या जोडीने होईल परंतु कदाचित त्यावेळी ती अपेक्षितही नसेल. विशिष्ट ध्वनिसमूहाने विशिष्ट सर्वमान्य अर्थ त्याचवेळी व्यक्त होतो जेव्हा तो त्याला लागणाऱ्या विशिष्ट उच्चारणपद्धतीने उच्चारला जातो. यामागे एकच गोष्ट गृहीत असते ती म्हणजे बोलणारी व्यक्ती ज्या समाजाची असेल त्या समाजातील व्यक्तीव्यक्तीला, मान्य असा उच्चार-आशय यांचा संबंध, म्हणजेच 'संकेत'. **/प आ ण ई/** (=पाणी) या शद्वाने 'पाणी' असा अर्थ व्यक्त होतो असे मानणे हा 'मराठी' समाजाचा 'संकेत' आहे. अशा तऱ्हेने एका समाजातील व्यक्तीव्यक्तींच्या परस्पर संकेतांमधून शद्वांना अर्थ मिळतात म्हणजेच शद्व व अर्थ यांचे अतूट साहचर्य निर्माण होते. संकेतामुळे निर्माण झालेले, अर्थ असणारे, वाक्याचे विशिष्ट छेदकाने पाडलेले घटक म्हणजे 'शब्द'.

भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करताना ध्वनींच्या स्वरूपाचा अभ्यास जसा आवश्यक आहे तसाच त्या ध्वनींनी बनलेल्या शब्दाच्या स्वरूपाचा अभ्यास आवश्यक आहे. हे करताना शब्दाच्या अर्थाचा विचार करणे ही अत्यावश्यक बाब नसली तरी सोयीची निश्चितच असते. भाषेला मूलगामी ध्वनी कोणते हे ठरवण्यास शब्दाचा अर्थ जसा उपयोगी पडतो, तसेच, शब्दांचे अर्थही भाषेच्या शब्दाच्या स्वरूपाच्या अभ्यासास उपयुक्त ठरतात. शब्द हे ध्वनींचे बनलेले असल्याने, शब्दाँमध्ये दिसणाऱ्या ध्वनींच्या साम्यावरून, असंख्य शब्दांची वर्गवारी करणे शक्य होते. या वर्गवारीनंतर हाती आलेल्या शब्दांची तुलना करून शब्दांचे स्वरूप समजावून घेता येते.

'हे झाड आहे. ह्या झाडावर पक्षी आहेत. पक्ष्यांनी झाडाच्या फांदीवर घरटी बांधली आहेत. ते झाड फार उंच आहे. ह्या झाडापासून ते झाड फार दूर आहे.' हे वाक्यसमूह विचारात घेतल्यावर

---

१. शब्दछेदक :—भाषेतील ध्वनिप्रवाहात येणाऱ्या विरामांच्या विविध स्वरूपांवरून ध्वनिप्रवाह खंडित करता येतो. अशाप्रकारे शद्वामध्ये प्रवाह खंडित करणारा विराम-स्वरूपांचा एक भेद म्हणजे शद्वछेदक.

२. तिरप्या रेषांतील लेखन ध्वनिकुलानुसारी समजावे. या रेषातील देवनागरी व्यंजने व्यंजनान्त उच्चारावीत.

अनुक्रमणिका

त्यांचे शब्दछेदकाने विभाजन करता अनेक शब्द हाती येतील. त्यांची उच्चाराप्रमाणे वर्गवारी करता /**आ ह ए**/ या ध्वनिसमूहाचे तीन शब्द मिळतात व दोन शब्द /**आ ह ए त**/ या ध्वनिसमूहाचे आहेत. या दोन्ही वर्गातील शब्द शब्द सर्वसाधारणपणे समान अर्थ दाखवतात. फक्त दुसऱ्या वर्गात /**त**/ हे व्यंजन जास्त आहे. 'आहे' व आहेत यांप्रमाणे ध्वनिसमूहाच्या बाबतीत काही भागात समान व अथाने परस्पर जवळचा अर्थ सांगणारा आणखी एक शब्द समूह मिळतो, तो पुढील प्रमाणे :–झाड /**ज़ ह आ ड**/ झाडावर /**ज़ हा आ ड आ व अ र**/ झाडाच्या /**ज़ ह आ ड आ च य आ**/ व झाडापासून /**ज़हआड आप आसउन**/. या चारही शब्दांचे अर्थ 'झाड' या शब्दाने व्यक्त केलेल्या अर्थाशी निगडित आहेत. अर्थ व्यक्त करणारा व कमीत कमी ध्वनींचा बनलेला असा घटक वरील शब्दात 'झाड' /**ज़ ह आ ड**/, हा आहे. अशा अर्थ व्यक्त करणाऱ्या ध्वनींच्या लहानात लहान समूहाला 'रूप'[३] असे म्हणतात. झाड, झाडावर, झाडाच्या व झाडापासून या चार शब्दांत अर्थाचे जे साम्य आहे ते 'झाड' /**ज़ हा आ ड**/, या घटकाबाबतीत असून जे भिन्नत्व आहे ते 'झाड' या घटकापुढे आलेल्या-आवर /**आ व अ र**/ आच्या /**आ च य आ**/, आपासून /**आ प आ स उ न**/ या भिन्न ध्वनिसमूहांमुळे होय. अर्थ व्यक्त करणारा, लहानात लहान असा वाक्याचा घटक म्हणजे 'रूप'. 'झाड' हा शब्द 'झाड' या 'रुपा' पासून झाला आहे. 'झाडावर' ह्या शब्दात 'झाड' हे घटक-रूप आहे व त्याशिवाय—'आवर' /**आ व अ र**/ हा ध्वनिसमूह आणखी एक भाग म्हणून आलेला आहे. झाडावर, झाडाच्या व झाडापासून यांमधून 'झाड' हे 'रूप' बाजूला केले असता झाड नंतर पुढील ध्वनिसमूह दिसतात— /**आ व अ र**/, **आ च य आ**/ व /**आ प आ स उ न**/. त्यांची तुलना करता /**आ**/ हा ध्वनी तिन्ही ठिकाणी आलेला दिसतो. हा ध्वनी काही अर्थ दाखवू शकतो काय ? तसा असल्यास 'आ' हे 'रूप' मानावे लागेल. नसल्यास– 'आवर–, आच्या,–आपासून' अशी रूपे मानावी लागतील. /**आ**/ संबंधीचा विचार निश्चित करण्यासाठी आणखी काही वाक्ये व शब्द, तुलनेसाठी घेणे जरुरीचे आहे.

'हे घर आहे. ह्या घरावर पक्षी बसला आहे. या घरापासून ते झाड फार लांब आहे. नदीवर पूल बांधला आहे. नदीचे पाणी गढूळ झाले आहे.' या वाक्यसमूहातील शब्द सुटे केले व उच्चारानुसार त्यांची मांडणी केली तेव्हा शेवटी '–वर' असणारे 'घरावर' व 'नदीवर' असे शब्द मिळाले.

(झाडावर—/**ज़ ह आ ड आ व अ र**/
घरावर—/**घ अ र आ व र**/
नदीवर—/**न अ द ई व अ र**/)

'झाडावर' या शब्दाची वरील शब्दाशी तुलना करता 'आवर' असा घटक नसून 'वर' असा घटक वेगळा निघतो हे लक्षात येईल. व त्यावरून 'झाडावर' हा शब्द 'झाड', 'आ' आणि 'वर' या तीव रूपांचा बनलेला आहे हे स्पष्ट होईल.

'वर' असे 'रूप' आहे हे वरील उदाहरणांवरून समजले त्याची आणखी खात्री करण्यासाठी आणखी काही शब्द गोळा केले :—दिलवर, कलेवर[४], वरवर, मान्यवर, फुलवर, सरोवर, वधूवर,[४] जनावर वगैरे. या सर्व ठिकाणी शेवटी –वर /**व अ र**/ असा ध्वनिसमूह दिसत आहे, परंतु तो सर्व ठिकाणी एकच अर्थ व्यक्त करीत नाही हे दिसून येते अर्थातच या 'वर' ला, झाडावर मधील 'वर' शी ध्वनिसाधर्म्य आहे म्हणून, किंवा तो शब्दाचा घटक आहे म्हणून 'रूप' ही संज्ञा देता येत नाही. तसेच 'घरावर' मधील 'वर' 'वधूवर' मधील 'वर' पेक्षा भिन्न अर्थ दर्शविणारा आहे असे जेव्हा स्पष्ट होते तेव्हा समान ध्वनिसमूह असणारी ही भिन्न रूपे आहेत अशी त्यांची निश्चिती करावी लागते.

---

३. प्रस्तुत लेखात 'रूप' हा शब्द रूढ 'रूप' शब्दापेक्षा भिन्न अर्थाने वापरला आहे. हे 'रूप' प्रत्ययरहित असते तर 'रूढ रूप' प्रत्ययसहित असते.

४. कलेवर, वधूवर ही येथे नामे आहेत.

काही वेळा केवळ शब्दाचा अर्थ रूपनिश्चितीला पुरेसा ठरत नाही; 'तो आपल्या कलेवर प्रेम करतो', व 'त्याचे कलेवर पडले आहे' या दोन वाक्यांवरून 'कलेवर' शब्द 'कला+ए+वर' असा झाला आहे की 'कलेवर' असाच एक रूपाचा आहे हे ठरवणे शक्य होईल. नुसताच **/क अ ल ए व अ र/** 'कलेवर' असा ध्वनिसमूह, 'दिलवर, जनावर' वगैरे शब्दाशी तुलना करून, किती रूपांचा बनलेला आहे हे सांगणे कठिण आहे.

यावरून असे दिसेल की, शब्दाचे विभाजन रूपांमध्ये करीत असताना, म्हणजेच शब्दाची घटकरूपे शोधीत असताना, विविध शब्दांतील उच्चारदृष्टया आंशिक साम्य हे मार्गदर्शक तत्त्व ठरू शकत असले तरी ते एकमेव गमक तत्त्व ठरत नाही.

'वस, वसतो, वसणे, वसला, वसेन, वसू, वसतात' इत्यादी शब्दांमध्ये पुन्हा पुन्हा येणारा ध्वनिसमूह **/ब अ स/** असा असल्याने, व अर्थदृष्टया या सर्व शद्बांमध्ये विशिष्ट साम्य व **/ब अ स/** या खेरीजच्या घटकामध्ये विशिष्ट वैधर्म्य असल्याने वरील शद्बांमधून 'वस' हा घटक वेगळा काढून त्याला 'रूप' ठरवणे चटकन शक्य होते 'वसतो, चालतो, पाहतो, गातो, खेळतो, निजतो' इत्यादी शद्बसमूहांमध्ये **/त ओ/** तो हा ध्वनिसमूह प्रत्येक शद्बात आलेला दिसतो. येथे त्याने काळाचा विशिष्ट अर्थ दाखवला आहे. अर्थसाम्य व उच्चारसाम्य लक्षात घेऊन 'तो' हे 'रूप' आहे असे विधान करता येईल परंतु ते वरील उदाहरणांपुरते मर्यादित राहील कारण भाषेत 'तो' या रूपाने जो काळाचा अर्थ दर्शविला आहे त्याच्याशी साम्य व 'तो' याच्या ध्वनिसमूहाशी आंशिक साम्य असणारे काही शद्बघटक पुढील उदाहरणांत आढळून येतात. उदा. वसतात, वसताना, वसते, वसतोस, वसत, वसता, या सर्व ठिकाणी 'वस' हे रूप काढून टाकल्यावर जो भाग उरतो त्यात 'तो' शी आंशिक साम्य असणारे–तात–,ताना वगैरे भाग मिळतात. या शब्दगटाची 'गातात, पळताना, हसते, खेळतोस, टाकत, पकडता' या शब्दगटाशी तुलना करून 'तो' यात विशिष्ट काळ दर्शक 'त' हे रूप असून त्याला आणखी 'ओ' हे रूप जोडले गेले आहे की 'तो' हेच रूप आहे हे ठरविण्यासाठी आणखी साम्यस्थळे शोधावी लागतील.

वरील उदाहरणांवरून असे दिसते की वाक्यात येणाऱ्या विविध शब्दांतील उच्चाराच्या दृष्टीने काही प्रमाणात साम्य व काही प्रमाणात फरक आणि अर्थाच्या दृष्टीने पुष्कळ प्रमाणात साम्य व थोडया प्रमाणात फरक लक्षात घेऊन भाषेतील रूपांची निश्चिती करता येते परंतु येवढयाच गोष्टी रूपनिश्चितीला पुरेशा ठरू शकत नाहीत. 'तो येतो. तो आला. तो जातो. तो गेला. तो हसतो. तो हसला. तो बोलतो. तो बोलला. तो निजतो. तो निजला.' या वाक्यातील शद्बांची उच्चार व अर्थ या बाबतीत साम्य-भेद पहाण्यासाठी तुलना केली असता 'तो', '–ला', 'हस', 'निज', 'बोल', ही रूपे निश्चित करता येतात पण 'येतो' आणि 'आला' या शद्बातील 'ये' व 'आ' चे अर्थसाम्य व उच्चारभिन्नत्व तसेच 'जातो' व 'गेला' या शद्बातील 'जा' व 'गे' चे अर्थसाम्य व उच्चारभिन्नत्व लक्षात आल्यावर रुपनिश्चिती कशी करावयाची? येथे एक गोष्ट मात्र दिसून येते की 'तो' या घटकाआधी 'जा' व 'ये' ही घटकरुपे येतात तर 'ला' या घटकाआधी 'गे' व 'आ' ही घटकरुपे येतात. या पहाणीचा उपयोग रुपनिश्चितीसाठी करता येईल का याचाही विचार रुपविचारात करावा लागतो.

शद्बातील आंशिक उच्चारसाम्य व बहुतांशी अर्थसाम्य यांवरून शद्बांतील रूपे वेगळी काढता येतात. जेथे हा निकष उपयोगी ठरत नाही तेथे, म्हणजे उच्चारसाम्याच्या अभावी, अर्थसाम्य पाहून रूपे वेगळी काढता येतात. रूपे ही असंख्य असतात. ध्वनिकुलांत ध्वनींची जशी व्यवस्था करतात त्याप्रमाणे रूपकुलांत रूपांची यवस्था करता येते. त्यासाठी रूपांचे परस्परांशी पूरकत्व, विकल्पत्व किंवा विरुद्धत्व यांपैकी कोणते नाते आहे हे लक्षात घ्यावे लागते.

समान अर्थ व्यक्त करीत असलेली, उच्चारात साम्य असलेली आणि उच्चारात फरक असताना परस्परांशी पूरकत्वाचे किंवा विकल्पत्वाचे नाते असणारी रुपे मिळून एक 'रूपकुल' तयार होते. प्रत्येक रूप हे

कोणत्या ना कोणत्या तरी रूपकुलाचे घटक[5] असते. 'रूपकुला'चा प्रत्येक घटक एकमेकांचा 'सहरूप' असतो. रूपकुलातील घटकाचा, शद्वातील एक वेळा वापर म्हणजे 'रूपा'चा वापर. असे वापर अनेक असतात, त्यामुळे 'रूपकुला'चे घटकही अनेक असतात. केवळ व्यवहाराच्या सोयीसाठी प्रत्येक रूपकुलाचा एक घटक प्रातिनिधिक मानून त्याच्याशी उच्चारभिन्नता असणारा दुसरा घटक येथे 'त्याचा सहरूप आहे' असे म्हटले आहे. रूपकुल { }या कंसाने निदेशीत करीत असून 'रूप' निदर्शनासाठी रूपामागे √‾ हे चिन्ह वापरीत आहोत. {बोल} = √‾बोल = √‾/**ब ओ ल**/. याचा अर्थ बोल हे नामाभिधान केलेल्या रूपकुलाचे 'बोल' हे घटकरूप आहे. मेहरपी कंसात 'बोल' ऐवजी कोणतीही अक्षरे घातली व म्हटले {००० } = √‾बोल तरी अर्थ {बोल} = √‾ बोल असाच होतो. व्यवहार सुलभतेसाठी प्रातिनिधिक घटकरूपाचा उच्चार दर्शविणारे नाव रूपकुलाला देत आहोत. {जा} = √‾ जा व √ गे. अशी दोन घटकरूपे आहेत. यांपैकी √ जा हे प्रातिनिधिक रूप असून √ गे हे त्याचे 'सहरूप' आहे. '√ जा' चे √ गे' शी नाते पूरकत्वाचे आहे. याचाच अर्थ जेथे √ जा वापरले जाते तेथे '√ गे' वापरले जात नाही. रूपकुलाच्या घटकरूपांचे वर्तन दुसऱ्या रूपांच्या संदर्भात सांगावे लागते. जसे :— √ गे हे सहरूप'–ल'[6] ह्या भूतकाळनिदर्शक रूपाच्या आधी येते तर √ जा हे इतरत्र येते. प्रातिनिधिक घटकरूपाचा उल्लेख येथून पुढे नुसते 'रूप' या शब्दाने करीत असून त्याच्याशी पुरकत्वाचे किंवा विकल्याचे नाते असणाऱ्या रूपाचा उल्ललेख 'सहरूप' याने केला जाईल.

'तो बोलतो'. व 'तो बोलला'. या दोन वाक्यांचे उच्चारण अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहे. /^{2}**त ओ** + ^{2}**ब ओ ल त** $\overrightarrow{\text{ओ}}$ / व /त^{2} **ओ ब ओ**^{1} **ल** $\overrightarrow{\text{आ}}$/. 'बोलतो' मधील 'बोल' / **ब ओ ल** / असा आहे तर 'बोलला' मधील 'बोल' / **ब ओ**^{1} **ल** / असा आहे. यावरून असे दिसते की 'बोलतो' मधील 'बोल' साठी जो ध्वनिसमूह वापरला गेला तसाच ध्वनिसमूह 'बोलला' मधील 'बोल' साठी वापरला गेलेला नाही; तसेच बोलतो मध्ये जे रूप वापरले त्याच्याशी जास्तीत जास्त साम्य असणारे {बोल} चे रूप 'बोलला' मध्ये वापरलेले नाही. शिवाय 'तो बोलतो' हे विधानार्थी वाक्य जर प्रश्नार्थक वाक्याप्रमाणे किंवा उदगारवाची वाक्याप्रमाणे उच्चारले गेले तर प्रत्येक वेळी 'बोलतो' मधील √ बोल या ध्वनिसमूहाचे संप्रवाही तत्त्व भिन्न असणार. म्हणजेच 'तो बोलतो' या विधानार्थी वाक्यातील √ बोल या रूपासारखे 'तो बोलतो' या प्रश्नार्थक वाक्यातील रूप √ बोल हे असणार नाही. तरीसुद्धा या रूपातील उच्चारभिन्नता भाषिक व्यवहाराला अडचणीची ठरावी अशी नसल्याने, 'तो बोलतो' या विधानार्थी, उद्गारार्थी किंवा प्रश्नार्थक वाक्यातील, किंवा 'तो बोलला' या वाक्यातील 'बोलतो' किंवा 'बोलला' या शब्दात 'बोल' हे एकच रूप वापरले गेले आहे असे म्हटले जाते. कोणत्याही रूपाचा उच्चार पहिल्यावेळी केला तसा, आणि अगदी तसाच, दुसऱ्यावेळी होतोच असे नाही. परंतु त्या दोन उच्चारातील फरक भाषेला मूलगामी ठरावा इतका मोठा नसेल, ज्याने व्यवहाराची अडचण निर्माण होणार नसेल, तर जास्तीत जास्त साम्य दर्शविणारे उच्चार एकसारखे मानले जातात व वरील सर्व ठिकाणी 'बोल' हे एकच रूप वापरले गेले आहे असे विधान केले जाते. या सर्व 'बोल' या रूपांबद्दल '√ बोल' ।**ब ओ ल**। या एकाच प्रातिनिधिक घटक रूपाचा उल्लेख केला जातो.

रूपकुलाच्या एका घटकाचा एक वेळा वापर म्हणजे रूपाचा वापर. ध्वनिकुलाप्रमाणेच रूपकुलाला स्वतःचा उच्चार नाही. रूपकुल ही एकाच प्रकारच्या रूपांना एकत्रित सामावून घेणारी 'संज्ञा' आहे. वाक्यात रूपकुले वापरली जात नसून रूपे वापरली जातात किंवा या रूपांची सहरूपे वापरली जातात. रूपकुल

---

५. घटक शब्द दोन अर्थी वापरलेला आहे. संदर्भावरून कोणताही गोंधळ होण्यासारखा नसल्याने नवीन शब्द (घटक या अर्थी) योजलेला नाही (१) घटक रूप—रूपकुलाचा घटक असणारे रूप. (२) शब्दाचे घटक रूप = शब्दाची फोड केली असता हाती येणारे रूप.

६. याचेही आणखी छेद करणे शक्य आहेत परंतु त्याची येथे आवश्यकता नसल्याने केलेले नाहीत.

{जा} असे म्हणण्याऐवजी रूपकुल {*} = √ जा व √ गे असे विधान करणे सहज शक्य आहे परंतु √ जा ज्याचा घटक आहे अशा कुलाला {जा} असे नाव दिल्याने लक्षात राहाण्यास किंवा वर्णनात सुलभता येते म्हणून त्या त्या रूपकुलाच्या प्रातिनिधिक घटकरूपाच्या उच्चारप्रमाणे रूपकुलाला नाव देण्याची पद्धत आहे.

रूपविचार म्हणजे शद्वांचे विभाजन करून रूपांचे ध्वनिस्वरूप जाणून घेणे, रूपे एकत्रित करणे, रूपांतील साम्य फरक पाहणे होय. रूपांच्या अभ्यासाची ही पहिली पायरी. रूपे गोळा केल्यानंतर कोणते रूप कोठे येते ते पाहाणे म्हणजेच रूपांचे अस्तित्व व त्यांचे वर्तन जाणणे म्हणजे रूपांचा वास्तविक अभ्यास करणे, रुपविन्यास समजावून घेणे. रूपव्यवस्था म्हणजे रूपांची कुलांमध्ये व्यवस्था लावणे. यासाठी जरूर तर थोडे वास्तवापासून दूर जावे लागते. रूपकुले सांगणे, त्यांचे प्रातिनिधिक घटकरूप व त्या रूपाची सहरूपे यांचे वर्तन सांगणे रूपव्यवस्थेत अभिप्रेत आहे. √ गे 'हे' '√ जा' शी समानार्थी आहे. ते √ ला च्या आधी येते व इतरत्र येत नाही हे रूपविन्यासामुळे समजेल परंतु √ गे हे √ जा चे सहरूप आहे हे विधान करणे रूपव्यवस्थेमुळेच शक्य होईल. व्यवस्था सुटसुटीत करण्यासाठी काटकसर हे तत्त्व वापरून √ जा व √ गे च्या एकाच कुलात अंतर्भाव, त्यातील पूरकत्व व अर्थसाम्य लक्षात घेऊन करता येतो. यामुळे √ गे या रूपासाठी स्वतंत्र रूपकुलाची जरूरी राहात नाही. याप्रमाणे रूपविन्यासातील वास्तवता आवश्यक तेथे बाजूला ठेवून, रूपांची संख्या कमी करून, त्यांची व्यवस्था रूपव्यवस्थेत काटकसरीने, सुयोग्य, परिणामकारक व सुटसुटीत अशी लावता येते.

वाक्यातील शव्दाचा अर्थाच्या दृष्टीने लहानात लहान घटक म्हणजे 'रूप'. या रूपांना स्वतःचा अर्थ असतो व तो अर्थ व्यक्त करण्यास विशिष्ट ध्वनियुक्त अशा आकाराचा समाजमान्य असा संकेत आवश्यक असतो. केवळ उच्चारसाम्य आहे म्हणून दोन रूपे समान ठरू शकत नाहीत. त्यासाठी अर्थसाम्याचा निकष लक्षात घ्यावा लागतो. 'वसला' व 'बसतो' या दोन शव्दांत 'वस' /**ब अ स**/ हे एकच रूप आहे किंवा दोन भिन्न रूपे आहेत हे ठरवण्यासाठी वरील शद्व ज्या वाक्यात आले आहेत ती वाक्ये पहावी लागतात. 'वसला अपघात झाला' व 'तो खाली वसतो' ही दोन वाक्ये, 'वसला' व 'वसतो' मध्ये 'वस' हे एकच रूप नाही हे सिद्ध करतील, तर 'तो वसला' व 'तो वसतो' ही दोन वाक्ये 'वसला' व 'वसतो' मध्ये 'वस' हे एकच रूप आहे हे दाखवतील. यावरून रुपनिश्चितीसाठी अर्थसाम्याचा विचार करणे आवश्यक ठरते हे लक्षात येईल. अशा तऱ्हेने दोन रूपे अर्थाच्या तत्त्वावर भिन्न ठरवणे म्हणजे 'अर्थछेदक' या तत्त्वाचा वापर करणे होय. 'अर्थ-छेदकांची जाणीव स्वतःची भाषा बोलणाराला भाषा शिकता शिकताच प्राप्त होते. 'वसला' या शद्वात 'बस'+'ला' असे दोन घटक आहेत हे मराठी भाषा बोलणारा अगदी सहजपणे सांगू शकेल, 'ला' या घटकाचे आणखी छेद पडतील की नाही हे कदाचित त्याला सांगता येणार नाही.

'पिणे–पिणारा'; 'हसणे–हसणारा', 'पळणे–पळणारा' अशा शव्दजोड्या ज्याला माहीत आहेत त्याला 'करणे' पासून 'करणारा' हा शव्द किंवा उलट चालणारा 'पासून' चालणे हा शद्व तयार करणे अवघड नाही. 'शास्त्र' माहीत नसताही त्याला ही गोष्ट ज्याअर्थी शक्य होते त्याअर्थी अर्थछेदकाने शद्वाचे घटक बाजूला करणे व योग्य असे घटक एकत्रित करणे या गोष्टी मराठी भाषिक सहजपणे करत असला पाहिजे. यामुळेच शव्दाची घटकरूपे शोधताना अर्थछेदकाचा वापर उपयुक्त ठरतो. अर्थछेदकाशिवाय शद्वांचे रूपांमध्ये विभजन अशक्य आहे असे नव्हे परंतु अर्थछेदकाचा निकष हे विभजन सुलभपणे करून देण्यास मदत करतो हे खरे.

शद्वाच्या, घटकभूत असणाऱ्या, रूपांच्या संख्येवरून शव्दाचे दोन प्रकार होतात (१) एकरूपी शव्द व (२) अनेकरूपी शव्द.

(१) एकरुपी शद्व हा वाक्याचा शद्वछेदकाने पडलेला खंड असून आणखी विभागला जात नाही. 'त्या कागदावर चित्र काढले आहे' या वाक्याचे शद्वछेदकाने 'त्या, 'कागदावर' 'चित्र', 'काढले' व 'आहे' असे पाच खंड पडतात. यापैकी रूप दृष्टीने 'त्या', 'कागदावर' व 'काढले' यांचे आणखी घटक पड शकतील. 'आहे' या शव्दात 'आह+ए' असे दोन रूप-घटक आहेत किंवा काय हा चर्चेचा विपय राहील, तर

'चित्र' या शब्दाचे रुपदृष्ट्या आणखी विभजन शक्य होणार नाही. 'चित्र' हा शब्द वाक्याचा घटक आहे, तसेच तो लहानात लहान घटक असल्याने 'रूप'ही आहे. 'चित्र' हे 'रूप' ही आहे व 'शब्द' ही आहे. अशा प्रकारे जो शब्द 'शब्द' असून 'रूप' ही असतो त्याला 'एकरूपी शब्द' म्हणावे.

(२) ज्या शब्दात एकापेक्षा अनेक रूपे शब्दाचे घटक म्हणून येतात त्या शब्दांना 'अनेकरूपी शब्द' म्हणावे. 'त्या', 'कागपावर' 'काढले' हे अनेकरूपी शब्द आहेत.

रूपे दोन प्रकारची असतात :—(१) निपात व (२) संपात.

(१) निपात रूपे :—जी रूपे अनेकरूपी शब्दांची घटकरूपे होत नाहीत अशी. उदा. आणि, व, परंतु. शब्दछेदकाने वाक्याचे घटक पाडले तर ही रूपे वाक्यात 'शब्द'च असतात.

(२) संपात रूपे :—ही रूपे अनेकरूपी शब्दाची घटकरूपे होऊ शकतात. उदा. झाड, घर. ही दोन प्रकारची आहेत :—(अ) प्रकृती व (ब) प्रत्यय. प्रकृतिरूपांचा अर्थ ते रूप उच्चारले जाताच व्यक्त होतो. उदा. घर, गाय, झाड, मी, लाल इत्यादी. यांचा अर्थ 'स्वतंत्र' आहे असे म्हणता येईल.

प्रत्ययरूपांचा अर्थ दुसऱ्या प्रकृतिरुपांच्या सान्निध्याने व्यक्त होतो. नुसते प्रत्यय उच्चारिले असता चटकन स्पष्ट होत नाही; म्हणजेच यांचा अर्थ 'पर-तंत्र' असतो—'ला' असे म्हटल्याने अर्थ स्पष्ट होत नाही, परंतु 'झाडाला, घराला, पायाला, या शब्दातील 'ला' चा अर्थ अनुक्रमे 'झाड', 'घर' व 'पाय' या प्रकृतिरूपाच्या सान्निध्यामुळे स्पष्ट होतो. '–ईन' हे प्रत्ययरूप स्वतंत्रपणे स्वतःचा अर्थ व्यक्त करू शकत नाही, परंतु 'जाईन, देईन, घेईन' इत्यादी शब्दांतील 'जा, दे व घे' या प्रकृतिरूपांच्या पुढे ते आल्याने स्वतःचा अर्थ व्यक्त करण्यास समर्थ ठरते.

वाक्यातील शब्दांच्या संदर्भात प्रत्ययांचा क्रमदृष्ट्या होणारा वापर म्हणजे प्रत्ययांचे वर्तन. या वर्तनाचे दृष्टीने प्रत्ययांचे पुढील तीन प्रकार दिसतात :—

(१) चरमप्रत्यय :—शब्दात शेवटचे रूप म्हणून येणारे प्रत्यय. उदा. 'झाडाला' मधील '–ला';

(२) आदी प्रत्यय :—शब्दाच्या सुरवातीला येणारे प्रत्यय. उदा. 'अमाप', मधील '–अ';

(३) अंगी प्रत्यय :—ज्या प्रत्ययांच्या योगाने शब्दाची सुरवात किंवा शेवट होत नाही असे प्रत्यय. उदा. :—'झाडाला' मधील '–आ–'. या प्रत्ययांच्या पुढे आणखी एखाद्या प्रत्ययाची किंवा प्रकृती रूपाची आवश्यकता असते.

कार्यदृष्ट्या प्रत्ययांचे पुढील प्रकार दिसतात :—

(१) 'शब्द' तयार करणारे प्रत्यय :—प्रकृतीला हे प्रत्यय लागताच जो रूपबंध तयार होतो तो वाक्यात उपयोजण्याजोगा शब्द असतो. या शब्दाचे वर्तन निपात प्रकृतिरूपांप्रमाणे राहाते. उदा. घर+ई=घरी.

(२) 'शब्दांग' तयार करणारे प्रत्यय :—प्रकृतीला हे प्रत्यय लागल्यावर जो 'रूपबंध तयार होतो त्याला 'शब्द' घेण्यासाठी आणखी एका रूपाची अपेक्षा राहाते. असे आणखी रुपाची अपेक्षा करणारे रुपबंध म्हणजे 'शब्दांगे' होत. उदा.—(घर+ओ+घर) घरोघर यातील '–ओ'.

(३) 'शब्दप्रकृती' तयार करणारे प्रत्यय :—प्रकृतीला प्रत्यय लावल्यानंतर तयार होणारा रुपबंध, शब्द म्हणून वापरता येतो किंवा त्याचे वर्तन संपात प्रकृती रुपाप्रमाणे रहाते. उदा. झाडी. (झाड+ई) यातील '–ई' प्रत्यय

अर्थाच्या दृष्टीतून प्रत्ययांचे पुढील दोन प्रकार पडतात :—

(१) स्पष्टार्थ प्रत्ययरूपे — जी प्रत्ययरूपे स्वतःचा अर्थ स्पष्टपणे व्यक्त करतात अशी. उदा. 'माळीण' या शब्दातील '–ईण' हे रूप. यांनाच 'साधक' प्रत्यय असेही म्हणता येईल.

(२) अस्पष्टार्थ प्रत्ययरूपे — जी प्रत्ययरूपे स्वतःचा अर्थ स्पष्ट करू शकत नाहीत परंतु जी शब्दघटनेस आवश्यक ठरतात अशी. उदा. 'झाडाला' या शब्दातील '–आ–' हे प्रत्ययरूप. यांनाच 'व्याकरणिक'

प्रत्ययरूप असेही म्हणता येईल. 'झाडाला' या शद्वात 'झाड' या रूपाला एक स्पष्ट अर्थ आहे तसाच 'ला' या रुपालाही आहे परंतु '–आ'– या प्रत्ययरूपाचा अर्थ स्पष्ट नाही. 'झाड' व 'ला' या दोन रूपांपासून 'झाडाला' हा शद्व बनवण्यासाठी '–आ–' चा उपयोग अनिवार्य आहे. अशी अनिवार्यता असणे म्हणजेच व्याकरणिक अर्थ सांगणे होय.

प्रकृतिरूपांचे प्रकार त्यांच्याशी संबद्ध होणाऱ्या प्रत्ययांच्या स्वरूपावर अवलंबून असतात. या वर्गीकरणासाठी प्रत्ययांचे अर्थ, त्यांचे उच्चार व त्यांचे वर्तन लक्षात घ्यावे लागते. प्रत्यक्ष रूपे शद्वांमधून बाजूला काढून त्यांचे प्रकृतीच्या संदर्भात वर्णन करणे; कोणती प्रकृतिरूपे कोणते प्रत्यय घेतात ते सांगणे: प्रकृति व प्रत्यय एकत्र जोडले जात असता प्रकृतीच्या विशिष्ट ध्वनिस्वरूपामुळे किंवा प्रत्ययाच्या विशिष्ट ध्वनिस्वरूपामुळे प्रकृतीच्या ध्वनिस्वरूपात किंवा प्रत्ययाच्या ध्वनिस्वरूपात काही बदल होतो किंवा काय हे सांगणे इत्यादी विषय शद्वघटनेत समाविष्ट होतात. रूपे शोधणे, त्यांची रूपकुलामध्ये व्यवस्था लावणे हा भाग रूपव्यवस्थे-मध्ये अभिप्रेत असतो. भाषेमध्ये रूपे अनंत असतात. त्यामधून प्रातिनिधिक रूपे ठरवून त्यांची सहरूपे शोधून, रूपांची रूपकुलात व्यवस्था लावली तरी, अशा रूपकुलांची जंत्री करणे रूपसंस्थेच्या अमर्यादपणामुळे फारच मोठ्या व्यापाचे ठरते. प्रकृतिरूपांची संख्या अवाढव्य असून प्रत्ययरूपे मात्र त्यामानाने मर्यादित असतात त्यामुळे प्रत्ययरूपांच्या संदर्भात प्रकृतिरूपांचे वर्गीकरण करणे सोयीचे असते. वर्गीकरण केल्यावर प्रत्येक वर्गात मोडणाऱ्या प्रकृतिरूपांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे वर्णन देता येणे शक्य होते व यानंतर कोणत्या वर्गाच्या प्रकृतिरूपांपासून कोणत्या पद्धतीने शब्द बनवता येतो ते शद्वघटनेच्या द्वारा सांगितले जाते.

⊕ ⊕ ⊕

डब्ल्यू कपूर. / **कविता**

इतके करुण गाणारे हे पाखरू कोणते ?
अशी दर्दसंपृक्त लकेर
आणि ती सुद्धा अशा अपरात्री
तमभोर अंगणासकट माझी झोपडी
कशी मनभर भिजून गेलेली
माझाही सूर लागत नाही
घेईन म्हणतो त्याचा मागोवा
पण त्याची दिशाही तर गवसत नाही
कुणीतरी सांगाना त्याचे नांव
कोण्या फांदीवर त्याचे गाव
की माझ्यासकट तुम्हीही नवखेच
माझ्यासारखेच दिवटचा हरवलेले
तरी बरे ! झोपडीत उब कायम आहे
थोडीशी त्यालाही देईन म्हणतो
त्याच्या सूरात निखारे ठेवीन म्हणतो.

निर्मल पांढारकर / **अनिवार इच्छांची थडगी**

एका अनिवार ओढीनं निघालो होतो प्रवासाला
मायेचं गाव सोडून.
दूर क्षितिजाशी दोन स्नेहार्द्र डोळे खुणावीत होते . . .
मायेचे शद्व कधीच मागं पडले
पाण्यावर तरळणाऱ्या नजरा बुडून गेल्या अंधारात.
मी थकून गेलो आता
रक्ताळलेल्या पायांच्या चिंध्या झाल्या
आणि काळोखाचा समुद्र विशाळ
झेपावू लागला अंगावर
मरणस्पर्शानं गोठून गेलो मी आतून-बाहेरून.
माझ्या अनिवार इच्छांची थडगी
विखुरली आहेत आता हरवल्या वाटावाटातून.
आणि क्षितिजावरचे डोळे
मायावी, क्रूर झाले आहेत कधीचे.

गोपाळ मो. कोलते / **स्मशानवासी**
(तिरोडा)

एका एकाचं काय नशीब असतं पाहा. त्याचं नशीब पाहून मला एका यात्रेतील आकाश पाळण्याची आठवण झाली. बाराव्या दिवशी बारसं करून जगाच्या गोंगाटात शिरणाऱ्या माणसाचं जीवन किती दोलायमान ! दोन गारगोट्यांमधून निघालेली एक ठिणगी ! कधी कधी ओळखीच्या माणसाची भेट कधी होत नाही. पण दोन तपांचा काळ लोटून गेल्यानंतर त्याची माझी भेट झाली. आणि कुठे? तर स्मशानात. काय योगायोग विचित्र असतात ! माझं मन केवढं दचकलं होतं ! स्मशानातील पिंपळाच्या बुंध्याशी तो बसला होता. पंचा गुंडाळलेला. छाती उघडी. हाडं बाहेर निघालेली. चेहरा उन्हवाऱ्याच्या संगतीत काळा ठिक्कर झालेला. नजरेत मात्र विद्युल्लतेची चमक व दाहकता. मिशा ओठावर रूळलेल्या. केस विस्फारलेले. त्या दिवशी माझी प्रेमळ व वात्सल्यसिंधू आई मला कायमची सोडून गेली होती. नाहीतर मी कशाला इतक्यात स्मशानात जात होतो म्हणा ! माझ्या डोळ्यांत दु:खाचा सागर भरलेला होता. हृदय सारखं रडून रडून ओलं चिंब झालं होतं. राहून राहून आईची मूर्ती डोळ्यांपुढे उभी राहात होती. माझं मन बेचैन झालं होतं. तरीपण बालपणीच्या त्या मित्राला असहाय अवस्थेत पाहून मी क्षणभर थबकलो होतो. कुणीतरी माझ्या पाठीवर हात ठेवला. ही थांबण्याची जागा नव्हे असंच तो हात मला सांगत होता. माझे पाय हळू हळू पुढे जात होते. आणि डोळे मात्र मधून मधून त्याच्याकडे अधीरतेने बघत होते. जिवंतपणी बनलेला तो मृतात्मा होता. सारे काही जिवंत पण जगण्याच्या खुणा मागे टाकून अस्पष्ट जाणिवांच्या विरत चाललेल्या हालचाली. वाटलं होतं, क्षणभर थांबावं, त्याच्याशी बोलावं. त्याला त्याचे दु:ख विचारावं. पण न बोलता कळलं होतं. न पाहता दिसलं होतं. लहानपणी आम्ही एकत्र शिकलो होतो. इंद्रधनुष्यी आयुष्याच्या सुखद कल्पनेच्या हिंदोळ्यावर उंच उंच झोके त्याने घेतले होते. पण उंचं गेल्यावर खाली त्याने पाहिलं नव्हतं. खाली पाहिलं असतं तर त्याला वसंताऐवजी शिशिराची सुरवात दिसली असती. त्याच्यावर एक कथा लिहावी असं मला वाटलं होतं. पण खरं सांगू का ! ही कथा नाहीच मुळी. व्यथा लागेल तर म्हणा! आरंभ नाही शेवट नाही. पूर्णविराम हाच या कथेचा आरंभ. कुणाला वाटेल की हा आठवून आठवून लिहितो. पण हा पाचोळा आहे. मी सावडतो आहे इतकंच. आपण सर्व त्याच्या नशिबाला हसत आहा. माझ्या हातातली रिकामी टोपली पाहून. पण खरं सांगतो याच पाचोळ्याला. . .याच निर्माल्याला एकेकाळी गोड सुगंध होता. काल तो जगण्यासाठी धडपडत होता. आज तो मरणासाठी स्मशानात राहात आहे. पण मरण मात्र त्याच्यापासून दूर दूर पळत आहे. आंधळ्यालासुद्धा जगावंसं वाटतं. ज्याला सृष्टीतलं सौंदर्य दिसत नाही, तोसुद्धा जगण्याचा मोह बाळगतो. पण माझ्या मित्राच्या बाबतीत सर्वच वेगळं होतं. जीवनातली सारी शक्ती. . .सारं प्रेम. . .हृदयाच्या कप्प्यात त्यांनी जपून ठेवलं होतं. पण हृदयासकट ते सारं चुरगळून गेलं. दूध उतू येत असताना स्टोव्ह विझून जावा. मैफलीतील रंगलेल्या मधुर सुरांनी जोगियाचा ताल धरावा आणि ऐन रंगलेल्या अमृतधारांनी भैरवी छेडावी ! सूर्योदयासाठी आसुसलेल्या मनांनी आकाशाकडे पाहावं. . .कोवळ्या कोवळ्या किरणांचा सोन्यासारखा सोनेरी मार्ग काळ्या काळ्या ढगांनी अडविलेला असावा ! मनाला रिझविण्यासाठी एखाद्या यात्रेत जावं आणि बघावं ! सारी दुकानं उठलेली. खेळणी, आकाश पाळणा, मिठाई. . .अगदी सारी सारी उठलेली. पण उरलं असायचं एकच दुकान ! अंधाराला कवटाळून मिस्किलपणे हसत असलेलं ! एकच दुकान स्मशानयात्रेचं. नशीब हा तीन अक्षरी शब्द पण तिन्ही देवांना व मोठमोठ्यांना हालवून सोडणारा. नशीबाची ज्या दिवशी साथ नाही त्या दिवशी गावसकरसारखा शतकवीर शून्यवीर ठरतो. ज्या फुलाचं नशीब बलवत्तर

ते भगवंताच्या मस्तकावर विराजित होऊन भगवंतापेक्षाही श्रेष्ठ स्वत:ला समजत असतं. आणि एखादे दुर्दैवी फूल स्मशानातील मेलेल्या चैतन्यहीन देहाचा गौरव करण्यात चितेमध्ये भस्मसात होतं. त्याचंही नशीब काय होतं!

त्याचं व माझं लहानपण मला आठवतं. शाळेत यायचा तर चांगला पोषाख करुन. खिशात पेपरमिंटच्या वड्या. पानाचा छंद तरी केवढा! त्याचे दात म्हणजे डाळिंबाचे दाणे. आईबापांचा एकुलता एक. दुधावरच्या सायीसारखी दोघांची माया. माझ्या शेजारीच तो राहायचा. जातीचा महार. पण पुष्कळ दिवसपर्यंत तो महार आहे हे मला माहीतसुद्धा नव्हते. अगदी ब्राह्मणासारखा राहायचा. वडिलांनी धंद्यामधे चांगला लौकिक व पैसा कमावला होता. आम्ही लहानपणी असेच बसलो असता. पुढे काय करणार हा विषय निघाला होता.——तेव्हा तो म्हणाला—'मला मानवतेचं मंदिर बांधावयचं आहे. त्याकरिता मी सर्व पैसा खर्च करीन. त्या मंदिराचा पुजारी होता आलं तर मी स्वत:ला धन्य समजेन–' ——मला त्यावेळी त्याचा अर्थ उलगडला नव्हता. मानवतेचं मंदिर व पुजारी होण्याची इच्छा याच्या मागे निश्चितच काही ध्येय होते. दलितांचे प्रश्न, दलितांच्या अडचणी सोडविण्यात शाळेचा जास्तीत जास्त वेळ त्याचा जात असे. अभ्यासात मात्र जेमतेम. शाळेतील प्रगतिपत्रावर वडिलांची सही कशाला म्हणून तो शिक्षकांशी भांडला होता. प्रगतिपत्रक माझं आहे. त्यावर माझी सही घ्या. मी वडिलांची सही आणणार नाही. असं त्याने ठासून सांगितलं होतं. कुणी जात विचारली तर जात विचारण्याचे प्रयोजन काय असा तो प्रतिप्रश्न करी. कुणी 'दलित' म्हटले तर 'मी दलित नाही,' असे आवर्जून सांगत असे. आणि 'मला ब्राह्मण का म्हणत नाही?' असा उलट प्रश्न तो विचारत असे. एक हिंदू मुसलमान झालेला त्याने पाहिला होता. आणि एक ख्रिश्चन हिंदू झालेला त्याला माहीत होता. म्हणून माणसाला जर धर्म बदलता येतो तर जात का बदलता येऊ नये असे विचार शाळेतील वक्तृत्व सभेत त्याने मांडले होते. त्याचे वक्तृत्व दांडगे होते. पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक त्याला मिळाले होते. काँग्रेसमधून दुसऱ्या राजकीय जातीत जाता येते तर महार जातीतून ब्राम्हण जातीत का जाता येऊ नये? किंवा महार विद्याविभूषित होऊन ब्राह्मणकर्म करायला लागला तर त्याला ब्राम्हण का होता येऊ नये? तेली तेल काढण्याचा धंदा करीत नसला तर त्याला तेली का म्हणावे? महार जातीत जन्माला आलेला परंतु कर्माने कलेक्टर, शिक्षक, एन्जीनियर वा डॉक्टर झालेला माणूस दलित कसा? चालू कर्माने तो दलित नसताना केवळ जन्मामुळे त्याला दलित म्हणणे योग्य आहे काय? असले प्रश्न त्याच्या मनात निर्माण होत. दलितांनी स्वत:ला दलित का म्हणवून घ्यावे. याचेच त्याला राहून राहून नवल वाटे. त्याचे विचार मला क्रांतिकारी वाटत.

परंतु २५ वर्षात मला त्याच्या खुशालीचे काहीच कळले नव्हते. तो कुठे राहतो, काय करतो हे सुद्धा मला माहीत नव्हते. गाव सोडून कित्येक वर्षे लोटली होती. तथापि लहानपणचे विचार व आताची आपल्याच अंत्ययात्रेला आपणच हजर राहावे अशी त्याची स्थिती! तिरडीवर विस्मृतीच्या कपड्याआड झाकलेली त्याची काही निवडक स्वप्ने. मरेपर्यंत एकनिष्ठ राहाण्याची शपथ घेतलेली. अगदी छायेसारखी पाठीमागे लागलेली! जळू सारखी चिकटणारी व साखरेसारखी गोड वाटणारी पण मधुमेहाची आमिषे दाखविणारी! व्यवस्थितपणे लाकडावर रचावी. नजरेतल्या ठिणग्यांनी पेटवावी. लाकडाचा मोठा जाळ करावा. सारी स्वप्ने जळेपर्यंत स्वस्थ बसावे. एखादं शैलेंद्रचं गीत गळ्यातलं यंत्र सुटेपर्यंत आळवावं. गाणं संपल्यावर पाहावं. स्वप्ने पूर्ण जळली नसली तर एखादं लाकूड परत सरकवावं.

हवा रोगट. सुंदर विचारांची फुले गळून पडलेली. काळोख आकाशाला भिडलेला. गर्द-झाडीतून रात्रीचा हुंकार व भीतीच्या वेदना. वादळे. वणवे. जखमा. सळसळणारा पू. पण दलितांच्या कपाळीचं दु:ख मिटता मिटत नव्हतं. जन्माला आल्यावर देव सर्वांच्या कपाळावर त्याचं कर्म लिहून ठेवतो यावर त्याचा विश्वास नव्हता. काळ पुढे रॉकेटच्या वेगाने जात असताना माणूस का बदलत नाही ही त्याची

खंत होती. अशाश्वताच्या बाह्या वर सरकतील. युगांयुगाचे भाळ फुटेल. विषमतेला तडा जाईल. अस्मिता जागी होईल. अशी त्याची दृष्टी होती. पण हा स्मशानात का राहतो हा प्रश्न मला सारखा सतावत होता. आणि मी एक दिवस स्मशानात गेलोच. आणि त्याला विचारलं. तो म्हणाला —'मी जग काय आहे हे पूर्ण ओळखलं. जग म्हणजे स्वार्थाचा बाजार. मला आता कोण राहिलं आहे? माझी प्रेमळ पत्नी, माझी सोन्यासारखी पोरं, माझी मोहित करणारी इस्टेट. . सर्व सर्व मला सोडून चालते झाले. मी एकटा झालो. इतके दिवस मी दलितांचं दुःख गिळत राहिलो. आता ह्या जगात राहण्याचा मला कंटाळा आला. जगात राहिलो पण मला जीवन दिसलं नाही. मानवात राहिलो पण मला मानवता दिसली नाही. मानवतेला गाडणारी, जाळणारी, तिच्या चिंध्या चिंध्या करणारी माणसं जिथं वावरतात तिथं कुठलं आलं आहे जीवन? हे स्मशान लाख पटीनं बरं. मानवतेचा अंत करणाऱ्यांची प्रेतं इथं जळत आहेत. प्रत्येक प्रेताबरोबर अमानुषतेचा अंश जळला किंवा नाही हे मी बघत असतो. प्रत्येकाचा देह चितेवर जळत असताना जुन्या बुरसटलेल्या विचारांची आहुती मी चिताग्नीत टाकीत असतो. बस. स्मशानातलं माझं हेच सुख.'

आकाशाएवढं विशाल दुःख हृदयाच्या छोट्याशा कुपीत ठेवून तो दिवस कंठत होता. मानवतेला बांध घालणारा प्रत्येक विचार ह्या स्मशानात प्रेतासारखा जाळून टाकण्याकरिता तो स्मशानवासी झाला होता.

⊕ ⊕ ⊕

माणिक गेडाम / रोवण्याचे गाणे

चिखलाला तुडवित
फुलतात तुझी रोवण्याची गाणी
ओणवे होता-होता
जरी सूज येई गाली.
तूला नाही धाक कुण्या सर्पा-विंचवाचा
वळ असे संचारले
सुरकुत्यांनी विणले तुझ्यासाठी जाळे
पण सांगतेस तू वाघिणीशी नाते.
अर्धपोटी देहावर
झेलतेस कशी झोंवणारे आषाढी ऊन्ह
आणि गार-गार धारा,
परततांना भिजलेली तू देहाने-मनाने
लक्तरेही भिजलेली
जशी उत्सवानंतरची तोरणे
प्राणांतिक खोकणे जसे काही नित्याचे
कुडकुडणे तुझे तेही झाकलेले धीराने
पाणीदार आशेने
डोळ्यात आभाळ दाटलेले
पदराला बांधून सांजेसाठी
चंद्रसूर्य आणलेले.
झोपी जाता-जाता
मग तुझे पंढरीला जाणे
पहाटेच्या भूपाळीसाठी
लहानपण मागणे
कुणासाठी माऊले असे रोवतेस रोवणे
आजवरी कुणासाठी
गातेस रोवण्याचे गाणे
कुडाच्या भिंतीमध्ये
तुझे दर्यावर्दी जिणे!

बालकृष्ण दाभाडे / प्रभावती गुप्तची व्यथा

श्रावण पूर्णिमा नुकतीच झाली होती. एके दिवशी सकाळच्या वेळी आम्ही तिघेजण आमच्या घराच्या पुढल्या अंगणात बोलत बसलो होतो. डॉ. पाटणकर (प्रसिद्ध चित्रकार), डॉ. श्रीकांत दाभाडे व मी. आमच्या बोलण्यात अनेक विषय येऊन गेले. बोलण्याच्या ओघात डॉ. पाटणकर म्हणाले 'मी रामटेकला जाणार आहे. गोकुळ अष्टमीला', 'कशाला?' असे मी विचारले. ते म्हणाले—'गोकुळाअष्टमीला रामटेकच्या राममंदिरात 'चरणदर्शनाचा' सोहळा असतो. त्या दिवशी भगवान रामचंद्राच्या पायांचे दर्शन सर्वांना घडते. अन्य वेळेला वर्षभर ते पदयुगुल झाकलेलेच राहते'. 'म्हणजे रामगिरिस्वामिनः पादमूलाचे दर्शन फक्त कृष्णजन्माष्टमीला घडते असेच ना?' मी विचारले. 'हो! आहे खरे असे.' डॉ. पाटणकर हसून म्हणाले. आमची बैठक नंतर समाप्त झाली. पण या चरणदर्शनाच्या हकीगतीने मी मात्र अस्वस्थ झालो. प्रभु रामचंद्राच्या पदयुगुलांच्या दर्शनासाठी कृष्णजन्माष्टमीचा योग यावा लागतो यात काही तरी इतिहास दडलेला असावा असे मला वाटू लागले.

रामनवमीस रामटेकच्या राममंदिरात हजारो भाविक लोक जमतात व रामदर्शन घेऊन जातात हे मी पाहिले आहे. त्या गर्दीतून एकावर्षी मी व डॉ. भाऊसाहेब कोलते यांनी रामदर्शन घेतले होते. पण त्याच राममंदिरात गोकुळाअष्टमीस चरणदर्शनाचा उत्सव होत असेल असे मला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते. राम आणि लक्ष्मण यांची मंदिरे ज्या परिसरात आहेत त्याच्या मुख्य द्वारास गोकुळ दरवाजा असे म्हणतात, हे मला माहीत होते. त्याबद्दल मी माझ्या पूर्वीच्या एका लेखात आश्चर्य प्रकट करून लिहिले होते की 'गोकुळ दरवाजातून आत गेल्यावर रामचंद्राचा परिवार दिसावा हे जरा आश्चर्यच नाही का?' वस्तुतः या द्वाराचे नाव अयोध्याद्वार, किंवा सांकेत द्वार अशा पैकी असावयास हवे होते. द्वारांची नावे सहेतुक दिलेली असतात. गोकुळ दरवाजा नाव उच्चारताच आत भगवान कृष्णाचा परिवार दिसावयास हवा होता असे मला त्यावेळी वाटले होते. तीच शंका आज पुनः माझ्या मनात उत्पन्न झाली. गोकुळ-अष्टमीस रामाच्या चरणांचे दर्शन हा विधी काय दाखवितो? आज जिथे रामाची मूर्ती आहे त्या स्थानी फार प्राचीन काळी कधीतरी कृष्णाच्या अथवा विष्णूच्या पादुका असाव्या काय? (विष्णू आणि कृष्ण दोघेही चक्रपाणी होते हे एकरूपत्व वाचकांनी लक्षात घ्यावे). तत्रस्थ पण्डितांना या चरणदर्शन रूढीचा इतिहास सांगता येत नाही. मला मात्र पुनः प्रश्न पडतो की प्राचीन काळी या रामगिरीचा स्वामी कोण असावा? रामगिरीस्वामिनः पादमूलात् या वाक्य-खण्डाच्या अर्थाचा पुनः विचार व्हावयास पाहिजे असे मला वाटते. (Yes, truth has to be told. No relevant material should be dropped.–Dr. Tarashankar Bannerjee).

रामटेकच्या टेकडीचा उल्लेख रामगिरी या नावाने होत होता असा उल्लेख लक्ष्मण मंदिरातील शिलालेखात आढळतो. पृथ्वीसेन द्वितीय याचे माण्ढळ उत्खननात उपलब्ध झालेले ताम्रपत्र या स्थानाचे नाव रामगिरी होते हेच दाखविते. हे ताम्रपत्र पृथ्वीसेनाच्या राज्यकालाच्या दुसऱ्या वर्षी दिले होते. या दानाचा काल साधारणतः इ. स. ४७२ च्या आसपासचा असावा असे वाकाटक नृपती आणि त्यांचा काल या ग्रंथातील इतिहासावरून वाटते. या स्थानाचा या कालापूर्वीचा उल्लेख प्रभावती गुप्तच्या ऋद्धपूर ताम्रपत्रात आढळतो. त्यात हे दान 'रामगिरिस्वमिनः पादमूलात्' दिल्याचा उल्लेख आहे. या ताम्रपत्राचा काल प्रवरसेनाच्या राज्यकालाचे १९ वे वर्ष असा दिला आहे. हा काल साधारणतः इ. स. ४३९ च्या आसपास येतो. या काळात या स्थानाचे नाव रामगिरी होते असे दिसते. पण या गिरीवर कोणत्या स्वामीचे स्थान होते? रामगिरीचा स्वामी राम होता का विष्णू होता? या गोष्टीची चर्चा करण्यापूर्वी प्रभावती गुप्तच्या पूज्य देवतेचा शोध घेणे महत्त्वाचे ठरेल.

अनुक्रमणिका

प्रभावती गुप्तचा जन्म गुप्त कुलात झाला होता. सम्राट समुद्रगुप्त हा तिचा पितामह होता. समुद्रगुप्त हा भागवत होता. भागवत म्हणजे श्री विष्णूचा भक्त. गरुड हे या वंशाचे चिन्ह, प्रतीक होते. अलाहाबाद येथील समुद्रगुप्ताच्या अभिलेखात गरुद्‌मत् अंक हा उल्लेख सूचक आहे. या अभिलेखातून समुद्रगुप्त हा मूर्तिमंत विष्णू आहे असा ध्वनी स्पष्ट निघतो. कुबेर, इंद्र, यम व वरुण या चार लोकपालांच्या बरोबरीचा समुद्रगुप्त आहे, फार काय तो मानवदेहधारी विष्णूचा अंशच आहे असा तो अभिलेख सांगतो. असा हा विष्णुभक्त सम्राट समुद्रगुप्त प्रभावतीचा पितामह होता.

द्वितीय चन्द्रगुप्त हा प्रभावतीचा पिता होता. द्वितीय चंद्रगुप्त हा स्वतःला परम भागवत म्हणवीत होता. परम भागवत म्हणजे विष्णूचा परम भक्त ! त्याच्या चक्रविक्रम नाण्यावर चंद्रगुप्त हा भगवान विष्णूपासून काही कृपावस्तू ग्रहण करीत आहे असे दाखविले आहे. (J. N. S. of India X, P. 104) दिल्लीच्या प्रसिद्ध लोहस्तंभावरील अभिलेखात चंद्रगुप्ताचा उल्लेख भागवत असाच केलेला आढळतो. प्रभावती गुप्त ही त्या सम्राटाची कन्या होती. तिला आपल्या पितृकुलाचा अभिमान फार म्हणून तिने आपल्या ताम्रपत्रातून पितृकुलाचेच यशोगान गायिले आहे. भागवत गुप्तांच्या कुलातील प्रभावती गुप्ता सुद्धा स्वतःचा उल्लेख भगवद्पादानुध्याता असाच करते. कारण ती विष्णूच्या चरणांचे चिन्तन करणारीच होती. ही पीठिका लक्षात घेऊन रामगिरिस्वामिनः पादमूलात् या पदाचा अर्थ काय असावा हे पहावे लागेल.

प्रभावती गुप्ताच्या जीवनातील काही गोष्टींचा शोध घेताना म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांच्या 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काल' या प्रसिद्ध ऐतिहासिक ग्रंथातील माहितीवरच कुणालाही विशेष अवलंबून रहावे लागेल. पुढील माहिती मी याच ग्रंथातून घेतली आहे. उद्धृत केलेल्या माहितीपुढे पृष्ठांचे क्रमांक दिले आहेत, ते याच ग्रंथाचे १९५७ च्या प्रथम संस्करणातील आहेत. ना मूलं लिख्यते किंचित् ।

प्रभावती गुप्ताने दिलेल्या दानांची माहिती देणारे दोन ताम्रपट आतापर्यंत उपलब्ध झाले आहेत. त्यातील पुणे ताम्रपटाचा प्रथम विचार करू. हा ताम्रपट प्रभावती गुप्ताने नन्दिवर्धनापासून दिवाकरसेनाच्या राज्यकालाच्या तेराव्या वर्षी दिला होता (पृ. १०३). या ताम्रपटाच्या प्रारंभी दृष्टम् । सिद्धम् । हे शब्द कोरलेले आहेत. हे दान भगवत्‌भक्त चनालस्वामीला दिले आहे. हा ताम्रपट खरा आहे असे स्पष्ट दिसते. यात प्रथमच जितं भगवता हा शद्ब आढळतो. याचा अर्थ भगवान विष्णूचा विजय झाला असा आहे. दृष्टम् या शद्बाने हे दानपत्र पूर्ण झाल्यावर सचिवालयात नोंदले गेले होते हे सिद्ध होते. यात चंद्रगुप्त द्वितीय याला परमभागवत हे विरुद दिलेले आढळते. अतः तो विष्णूचा परमभक्त होता असे प्रभावती गुप्त म्हणते. प्रभावती ही रुद्रसेन द्वितीय याची अग्रमहिषी (पट्टराणी) होती. युवराज श्री दिवाकरसेन याची ती माता होती. 'य त.म्रपट.त प्रभावती गुप्तेने कार्तीक शुक्ल द्वादशीत भगवद्भक्त आचार्य चनालस्वामी यास दङगुण ग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे (पृ. १८७). या राजमातेने हे दान प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून द्वादशीस पारण्याच्या प्रसंगी दिलेले दिसते. प्रभावती गुप्ता ही अत्यन्त भगवद्भक्त होती. तिने हे दान प्रथम भगवंताच्या पादमूलांस (पादुकांस) अर्पण करून नंतर ते उपर्रिनिर्दिष्ट आचार्यास दिले असे यात म्हटले आहे (पृ. १८८). भगवद् भक्ताचार्य चनालस्वामी हा कोणी वैष्णव महन्त दिसतो. दानसुद्धा प्रबोधिनी एकादशीचे पारणे सोडताना दिले आहे. ही एकादशी विष्णूच्या चातुरमासोत्तर उत्थान प्रसंगी येणारी एकादशी आहे. आणि हे दानही भगवत्पादमूलापासून दिले आहे. हे पादमूल विष्णूचेच असावयास पाहिजेत हे मानणे क्रमप्राप्तच आहे. हा सारा मामला विष्णुभक्तांचा आहे यात संशय घेण्यास कुठे कारण सापडत नाही. अतः पादमूल याचा अर्थ स्पष्ट करावयाचा म्हटले तर या पादुका भगवान विष्णूच्याच असावयास पाहिजेत. तिथे रामपादुका हा अर्थ निघू शकत नाही.

आता प्रभावती गुप्ताचा ऋद्धपूर ताम्रपट दृष्टीखालून घालावा. हा ताम्रपट द्वितीय प्रवरसेनाच्या शासनकालाच्या १९ व्या वर्षात दिलेला आहे. म्हणजे पुणे ताम्रपत्राच्या नंतर २१ वर्षांनी हा ताम्रपट

दिलेला दिसतो. याचा काल साधारतणः इ. स. ४३९ च्या आसपास असावा. तो ताम्रपट कोणत्या स्थानापासून दिला हे स्पष्ट होत नाही तरीपण 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' असे शब्द प्रारंभी असल्याने तो रामगिरीवरून दिला असावा असे म्हणण्यास आक्षेप नसावा. या ताम्रपटाचा प्रारंभ जितं भगवता (भगवान विष्णूचा विजय झाला) या शब्दांनी केला आहे. पण विशेष लक्षात येणारी गोष्ट म्हणजे सर्व प्रथम 'दृष्टम्'। या महत्वाचा शब्दाचा इथे आढळ होत नाही. दृष्टम्। हा शद्ब नसल्याने हे दानपत्र सचिवालयात नोंदलेले दिसत नाही, असेच म्हणावे लागते. या दानपत्राला शासकीय मान्यता प्राप्त झालेली आढळत नाही. म. म. डॉ. वा. वि. मिराशी लिहितात "द्वितीय प्रवरसेनाच्या बहुतेक पूर्ण ताम्रपटात आरंभी दिसणारा 'दृष्टम्' शद्ब मात्र इथे आढळत नाही. तथापि या ताम्रपटाची लिपी व लेख यावरून तो खरा आहे या विषयी संशय नाही." एरवी अत्यन्त चोखन्दळ असणारे डॉ. मिराशी या गोष्टीकडे कानाडोळा करतात. वस्तुतः या विषयावर अन्य उदाहरणे देऊन त्यांनी साधार चर्चा करावयास हवी होती पण असे घडले नाही. डॉक्टरसाहेबांच्या प्रमेयास उपोद्वलक नसणाऱ्या गोष्टी ते चातुर्याने टाळत असतात. कोणत्याही टीकेवर उत्तर देताना महत्वाचे खरे आक्षेप उल्लेख न करता ते दावण्याचा प्रयत्न करतात. चिकित्सक संशोधकांच्या हे लक्षात येते. सामान्य वाचकाला यातील मेख कळत नाही. तो उत्तर दिले एवढ्या गोष्टीला महत्त्व देऊन मान डोलावतो.

दुसरी एक महत्वाची चूक त्या ताम्रपटात राहून गलेली आढळते. हा ताम्रपट ज्याला द्यावयाच्या त्याच्या नावाचा उल्लेख केलेला दिसत नाही. ('पण आश्चर्याची गोष्ट ही की त्यांची नावे दिली नाहीत'— इति डॉ. वा वि. मिराशी. 'तरीसुद्धा ताम्रपटाच्या खरेपणाविषयी ते संशयही व्यक्त करू इच्छित नाहीत.) हा ताम्रपट कुणाला द्यावयाचा? कुणाच्या नावाची नोंद सचिवालयात झाली असेल? हा ताम्रपट कुणाच्या मालकीचा राहील? सचिवालयात नोंद झाल्याचा दृष्टम्। हा शद्बहि तिथे नाही! तरीपण हा ताम्रपट खरा असल्याचा आग्रह डॉ. मिराशी धरतातच. कारण हे की त्याच्या मूल प्रमेयाची पुष्टी करणारा आधार त्यांना या ताम्रपटात आढळला, निदान त्यांचा तसा विश्वास आहे. तो आधार म्हणजे 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' हे पद होय. या आधारावरून पुढील अनुमान परंपरा ते सिद्ध करतात. या पदावरून रामगिरीवर ५ व्या शतकाच्या प्रारंभी रामाच्या पादुका होत्या — रामाचे तुंग देवालय होते — म्हणजे त्या स्थानी राम, सीता, लक्ष्मण यांनी वसती केली होती—विहार केला होता— पुढे लक्ष्मण व त्या मागे रामसीता या प्रमाणे—म्हणजे कालिदासाने हा रामगिरी, तेथील अवशेष पाहून मेघदूतात त्यांचे वर्णन केले असावे म्हणजे त्या काळी कालिदास रामगिरीवर अनेकदा येऊन गेला होता — म्हणजे तो विक्रमादित्याने प्रभावतीला राज्य कारभारात मदत करण्यास धाडलेला राजकार्य धुरंधर होता — म्हणजे कालिदास चंद्रगुप्त द्वितीय याच्या काळात होऊन गेला इत्यादी, इत्यादी, इत्यादी. ही इतिहासश्रृंखला सिद्ध करण्यासाठी हा ताम्रपट संदेहास्पद आहे असे म्हणणे म्हणजे आपल्या प्रमेयावर कुठाराघात करणेच ठरले असते. हे जाणून या ताम्रपटात दान घेणाऱ्यांचा उल्लेख नसला तरी, तसेच प्रारंभी सचिवालयात नोंद झाल्याचा द्योतक दृष्टम् हा महत्वाचा शद्ब नसला तरी हा ताम्रपट विश्वासार्ह आहे असा आग्रह धरून त्या आधारावरच डॉ. मिराशी यांनी रामटेक संशोधनाची इमारत निर्माण केली आहे. सुज्ञ वाचकासाठी याहून अधिक वर्णन करण्याची जरूरी नसावी असे मला वाटते.

या ताम्रपटात प्रभावती गुप्तचा उल्लेख भगवद् पादानुध्याता असा केला आहे. डॉ. मिराशी लिहितात :—"प्रभावती गुप्ताचे वर्णन 'भगवत्पादानुध्याता' (भगवान विष्णूच्या चरणांचे चिन्तन करणारी) या शद्बांनी केले आहे. त्यावरून ती विष्णूपासक होती हे उघड आहे. (पृ. २३५). डॉ. मिराशी पुढे लिहितात 'लेखाचा काळ द्वितीय प्रवरसेनाच्या एकोणिसाव्या शासनवर्षी कार्तिक शुक्ल द्वादशी असा दिला आहे. प्रभावती गुप्ता विष्णूपासक असल्याने तिने हे दान प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून द्वादशीस पारण्याचे वेळी दिलेले दिसते. तिचा पुणे ताम्रपट अशाच प्रसंगी दिला होता.' दान कालावरूनसुद्धा प्रभावती गुप्ता ही विष्णूची उपासक होती हे वाचकांच्या लक्षात येईल असे मी समजतो." (पृ. २३६).

डॉ. मिराशी यांच्या ग्रंथातील पुढील उल्लेख सूचक आहे. "उपर्युक्त बारा दानांपैकी नऊ दाने खालील एकादशीच्या पारण्यांच्या प्रसंगी दिली गेली होती असे आढळून येईल" (पृ. १०९.) एकादशी व्रताचा संबंध भागवत धर्माशी विशेष आहे. रामाच्या संबंधात एकादशीचे उपोषण कधी केलेले आढळत नाही. वाकाटक नृपतींनी रामनवमी, रावणवधदिन, रामराज्याभिषेक अशा निमित्ताने त्या त्या तिथीस दान दिल्याचा उल्लेख कुठेही आढळून येत नाही. प्रभावती गुप्ता हिने दान देताना रामजन्माचा काळ निवडला नव्हता. या किरकोळ गोष्टीही लक्षात घेतल्या तर रामगिरीवर रामाच्या पादुका नसून विष्णूच्याच असाव्यात हे पटू लागते. प्रवरसेन याच्या इंदूर ताम्रपटातसुद्धा तो ताम्रपट 'भगवत्पादमूले दत्तम्' असा उल्लेख आढळतो. या उल्लेखावरून हे पादमूल रामाचे होते असा अर्थ कोणी घेणार नाही. ती विष्णूचीच पाउले होती असेच इतिहास तज्ज्ञ म्हणतात.

आता पुढचा एकच उल्लेख किती बोलका आहे हे वाचकांनीच पाहून घ्यावे. प्रभावती गुप्ताचा पती द्वितीय रुद्रसेन याचा उल्लेख अनेक ताम्रपटांतून पुढीलप्रमाणे केलेला आढळतो. 'भगवतश्चक्रपाणेः प्रसादोपार्जित श्री समुदयस्य महाराज श्री रुद्रसेनस्य. ' रुद्रसेन द्वितीय हा चक्रपाणी विष्णूचा भक्त होता. विष्णूच्याच प्रसादाने आपणास राज्यैश्वर्य प्राप्त झाले अशी त्याची श्रद्धा होती. या राजाच्या धार्मिक श्रद्धेत हा जो बदल घडून आला (कारण वाकाटक नृपती हे शैव संप्रदायी होते) त्याचे कारण त्याची अग्रमहिषी (पट्टराणी) प्रभावती गुप्ता असावी (पृ. ४१). म्हणजे प्रभावती गुप्ताच्या प्रभावाने रुद्रसेन विष्णुभक्त बनला. हे ऐतिहासिक सत्य असताना प्रभावती गुप्ता स्वतः मात्र रामभक्ती करीत होती हे अनुमान खरे कसे मानावयाचे? आपल्या पतीला विष्णूची उपासना करावयास लावणारी प्रभावती गुप्ता (पृ. १८३, ओळ १६-१७) रामोपासिका होती असे कोलांटी उडी घेऊन म्हणावयाचे याला काय म्हणावयाचे? यासाठी अवग स्वतंत्र नवे आधार मात्र मिळत नाहीत. भगवत शब्दाचा अर्थ An epithet of Vishnu, Siva, Jain, Buddha असा दिला आहे. भागवत--A follower or devote of Vishnu or Krishna हे शब्दार्थ लक्षात घेता रामगिरीचा स्वामी विष्णूच असला पाहिजे आणि विष्णूपासक प्रभावती गुप्त विष्णूच्या पादुकांची पूजा करीत होती हाच एकमेव अर्थ मान्य करावयास हवा. प्राचीन काळी विष्णूच्या नावाच्या शेवटी सामान्यतः स्वामिन् हे पद लावले जात असे असे डॉ. मिराशीच म्हणतात. मात्र रामगिरिस्वामीच्या बाबतीत ते आपला पवित्रा बदलून तिथे रामप्रभू असा अर्थ करतात. कारण तो त्यांच्या प्रमेयाला सोयिस्कर आहे. हा सोयवाद इतिहास-लेखनात इष्ट नाही. प्रभावती गुप्तावर संशोधकांनी हा अन्याय केला आहे असे मला वाटते. प्रभावती गुप्ताची व्यथा संशोधक ओळखू शकतील काय? संशोधकांच्या प्रमेयासाठी इतिहासातील व्यक्तींना विकृत स्वरूपात रंगवावयाची ही प्रथा इष्ट आहे काय? प्रभावती गुप्ताची ही व्यथा आपण समजून घेतली पाहिजे. ती जणू म्हणते :—

'इतिहासाच्या डोळस वाचकांना मी काही गोष्टी सांगू इच्छितो. माझे पितामह सम्राट चंद्रगुप्त प्रत्यक्ष विष्णूचा अंशावतार मानले गेले. ते परम भागवत होते. माझे पिता द्वितीय चंद्रगुप्त हेसुद्धा परम-भागवत म्हणून ख्यात होते. माझे चुलते रामगुप्त यांनी शकांची अपमानास्पद अट मान्य करून राजमहिषी ध्रुवस्वामिनी हिला शकांच्या स्वाधीन करण्याचे ठरविले. प्रजेच्या कल्याणासाठी पत्नीचा त्याग देय समजू नये ही त्यांची विचारधारा. एका नारीच्या सतीत्वाचा हा लिलाव साऱ्या स्त्रीजातीचा अपमान होता. माझ्या पित्याने विष्णूने वराह अवतार घेऊन पृथ्वीचा उद्धार केला त्याप्रमाणे या संकटातून ध्रुवस्वामिनीचा उद्धार करून मानव स्त्रीची विटंबना होऊ दिली नाही. राष्ट्राच्या संस्कृतीच्या दृष्टीने हे अयोग्य कृत्य माझ्या पित्याने घडू दिले नाही. मला याचा अभिमान वाटतो. मी स्त्री आहे. मी माता आहे माझी मनोभूमिका इतिहास-लेखकांनी समजून घेण्याचा प्रयत्न करावा.

माझी ही विष्णुभक्ती माझ्या मुलांच्या नावांतून प्रकट झाली आहे. माझ्या मुलांची नावे दिवाकर, दामोदर अशी होती. मी रामाची उपासक असते तर त्यांची नावे रामसेन, लक्ष्मणसेन अशी ठेवू शकले असते. रामभक्तीला माझा विरोध नाही. पण मी विष्णूपासक होते एवढे इतिहास-लेखकांनी विसरू नये. रामगिरी-वरील विष्णूच्या पादुकांचे रामपादुकात रूपांतर करून माझ्या देवतेवर अन्याय करू नये. माझ्या पतीला मी विष्णूउपासक बनविण्याचा यशस्वी प्रयत्न केला पण इतिहास संशोधकांनी मला रामोपासिका बनवून आपल प्रमेय सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. यात मी मात्र खर्ची पडले. मला केवळ रामाच्या पादुकांची उपासिक बनविले एवढेच नाही तर मी माझ्या मुलाकडून प्रवरपूरला उत्तुंग राममंदिर निर्माण करविले, त्याला सेतुबंध महाकाव्य लिहिण्यास प्रवृत्त केले अस निराधार प्रचार करून माझ्यावर अन्याय केला आहे, याला इतिहासात कुठेही आधार नाही. मी रामाची उपासिका असते तर तसा स्पष्ट उल्लेख करण्यात मला संकोच वाटला नसता. यात शरम वाटण्याची कोणती गोष्ट आहे? भगवत्पादानुध्याता म्हणवून घेणाऱ्या मला इतिहास लेखक केवळ स्वार्थवश होऊन माझ्या देवतेची विटंबना करीत आहेत. आमच्या दोन्ही कुलांत कोणी रामोपासक झाले नाहीत. रामगिरीवर विष्णूच्याच पादुकांचे पूजन होत होते. आज ही गोकुळाष्टमीस तुम्ही रामगिरीवर जाऊन विष्णूच्या पादुकांचे दर्शन घेऊ शकता. अधिक उण्याची क्षमा प्रार्थिते.

⊕ ⊕ ⊕

अपर्णा देव / आठवती दिवस

वर्षा

घुमड घुमड मेघांचे मेघांच्या जल्लोषाचे
जल्लोषात बरसायाचे माती चिब करायाचे ।
चिब ओल्या मातीचे मातीमध्ये नाचायाचे
नाचताना लोळायाचे अंग चिखल व्हायाचे ।
हात पाय मातीचे माती माती निंदण्याचे
निंदताना रोवायाचे दाणे दाणे जवारीचे ।।

शिशिर :

गारवर्फ पाण्यामध्ये हातपाय भिजवायाचे
कुडकुडत अंगाला शेकोटीस शेकायाचे
थंड रात्रीच्या चंद्राला गोधडीने उबवायाचे
पहाटेच्या सूर्याने अंगभर नाहायाचे
उन्हामध्ये शिशिराच्या रानोनान उंडरायाचे
मायेच्या हाताने अंग अंग पुसायाचे ।।

ग्रीष्म :

अंग अंग लाही होता
नदीच्या कोमट पाण्यात, ढोरांसह डुंबायाचे
आंबराईत सावळच्या
धोंडा उशास घेऊन, देहभान विसरायाचे
मारोतीच्या पारावर
अर्धी रात्र कलताच खोपटात परतायाचे ।।

द. प. इंगोले / दलित साहित्याचे खंदे प्रेरक : डॉ. म. ना. वानखडे

वृत्तपत्रात डॉ. म. ना. वानखडे यांच्या आकस्मिक निधनाचे वृत्त वाचले आणि मन विषण्ण झाले. त्यांच्या रूपाने महाराष्ट्रातील एक सामाजिक शक्ती लुप्त झाली तद्वतच एक उत्तम प्रशासकीय कर्तृत्वसुद्धा नाहीसे झाले.

डॉ. वानखडेंना दोन वर्षांपूर्वी नागपुरातच प्रत्यक्ष पाहण्याचा आणि दलित साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून त्यांचे समतोल आणि समर्पक अध्यक्षीय भाषण ऐकण्याचा सुयोग प्राप्त झाला होता. कवी अनिलांच्या मतानुसार, डॉ. वानखडेंनी या अध्यक्षीय वक्तव्यात दलित साहित्याला साहित्यशास्त्रीय बैठक देण्याचे कार्य केले. भंडारा येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षाच्या पदाकरिता डॉ. वानखडे यांचे नाव सुचविण्यात आले होते. परंतु प्रकृती अस्वास्थामुळे "माझी निवड पक्की करू नका. मी पुढे काय ते कळवितो." असे विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षांना विनयपूर्वक कळवून डॉ. वानखडे प्रकृतीवर उपचार करवून घेण्यास अमेरिकेतील 'व्हिस्टन' या शहरी गेले होते. दुर्दैवाने तिथेच १३ एप्रिलला त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि तेव्हापासून १ मे पर्यंत म्हणजे मृत्यू येईपर्यंत ते शुद्धीवर येऊ शकले नाहीत. बेशुद्धावस्थेतच त्यांना मृत्यूने गाठले.

विदर्भातच जन्मास आलेल्या या विद्वान गृहस्थास विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन सन्मानित करणे ही अत्यंत समयोचित आणि वैदर्भियांना अभिमानास्पद बाब होती. परंतु कुठलाही मानवी संकल्प पूर्णतेस नेऊ न देण्याचे कार्य नियतीने आपल्या स्वभावधर्मानुसार केले. आणि भविष्यात संपन्न होणाऱ्या एका गोड सुयोगाचे रूपांतर डॉ. वानखडेंच्या दुःखद वियोगास झाले.

डॉ. एम्. एन. वानखडेंचा जन्म विदर्भात अमरावती जिल्हातील थुगाव येथे २० जानेवारी, १९२४ रोजी झाला होता. १९४५ मध्ये नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्ये असताना बी. ए. ऑनर्स परीक्षेत संपूर्ण नागपूर विद्यापीठातून इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल "माधवराव चांदोरकर" सुवर्णपदक त्यांना मिळाले होते. नंतर पुढे १९५० मध्ये एम्. ए. आणि १९६५ मध्ये अमेरिकेतील फ्लोरिडा विद्यापीठातून "अमेरिकन कवी वाल्ट व्हिटमनवर भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव" हा विषय घेऊन त्यांनी पीएच. डी. ही पदवी मिळविली.

१९५८ ते १९६२ या दरम्यानच्या कालावधीत डॉ. वानखडे हे औरंगाबाद येथील सुप्रसिद्ध मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य होते. त्यांच्या प्राचार्यपदाच्या काळात 'मिलिंद' ची ख्याती सर्वदूर पसरली होती. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सर्वहारा वर्गातील विद्यार्थी प्रचंड संख्येने 'मिलिंद'मध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास येत. एकेकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वास्तव्याचा परिसस्पर्श झालेल्या या महाविद्यालयात शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेले विद्यार्थी स्वत:ला भाग्यशाली समजत असत. डॉ. एम. एन. वानखडेंनी ज्याप्रमाणे अमेरिकेतील 'फ्लोरिडा' विद्यापीठात अध्ययन करून डॉक्टरेट मिळविली, त्याप्रमाणे त्याच विद्यापीठात त्यांना अध्यापनाकरितासुद्धा पाचारण करण्यात आले होते. १९६३ ते १९६५ या कालावधीत त्यांनी फ्लोरिडा विद्यापीठ जेन्सव्हिले, यु. एस्. ए. (अमेरिका) येथे इंग्रजी विभागाचे सहाय्यक अध्यापक हे स्थान सांभाळिले. पुढे १९६५ ते १९६६ या एका वर्षात त्यांनी वेस्टर्न इलिनॉस विद्यापीठ, मेकाम्बला, अमेरिका येथे इंग्रजीचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून नोकरी केली.

अमेरिकेतून भारतात परत आल्यानंतर त्यांची अनेक ठिकाणी उच्च पदावर नियुक्ती झालेली होती. १९६८ मध्ये औरंगाबाद येथील, मराठवाडा विद्यापीठाच्या कलाशाखेचे ते अधिष्ठाता होते. त्याचप्रमाणे साहित्य अकादमी (मराठी मंडळ) दिल्ली, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई; नागपूर

विद्यापीठ कुलगुरू नियुक्ती समिती, इत्यादी विविध समित्यांवर डॉ. एम. एन. वानखडे यांची सन्माननीय सदस्य म्हणून नियुक्ती झालेली होती. याशिवाय मार्च, १९७३ पासून तर त्यांच्या निधनदिनापर्यंत ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष होते. हे महत्त्वपूर्ण पद आपल्या असामान्य कर्तृत्वाने सांभाळीत असतानाच मृत्यूने त्यांना या पदावरून आणि या जगातूनसुद्धा अवघ्या ५४–५५ वर्षाच्या वयातच सर्वांने निवृत्त केले हा एक दैवदुर्विलासच होय. डॉ. एम. एन. वानखडेंची साहित्यसेवा संख्येने विपुल नसली तरीही त्यांची साहित्यावरील अकृत्रिम निष्ठा आणि गाढा व्यासंग मुग्ध करणारा होता. १९६७ मध्ये भुसावळ येथे संपन्न झालेल्या बौद्ध साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते; तद्वतच जानेवारी, १९७६ मध्ये नागपूरला झालेल्या पहिल्याच दलित साहित्य संमेलनाचेही डॉ. वानखडे अध्यक्ष होते. या अभूतपूर्व संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी दलित साहित्या-संबधी मांडलेले शास्त्रशुद्ध आणि तर्कशुद्ध विचार हे आजही वैशिष्ट्यपूर्ण आणि अनन्यसाधारण समजण्यात येतात. 'दलित' या शब्दाची सर्वव्यापक चिकित्सा आणि व्याख्या करताना डॉ. वानखडे म्हणाले होते की " 'दलित' म्हणजे केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व 'दलित' या व्याख्येत समाविष्ट होतात." त्यांच्या मते "दलित साहित्याच्या रूपाने दलित लेखकाने एक वेगळ्या अनुभवाने व आगळ्या सौंदर्याने नटलेले विश्व निर्माण केले. निराळा सामाजिक आशय, विषय, भावना, शैली, व भाषा ह्या द्वारे त्याने मरगळलेल्या मराठी वाङमयात एक नवीन समृद्ध असे दालन उघडले. दलित साहित्यामध्ये वैचारिक वाङमयाची त्रुटी आहे". ही एक प्रामाणिक खंत त्यांनी त्या प्रसंगी बोलून दाखविली होती. दलित साहित्याची परिभाषा करताना डॉ. वानखडे म्हणाले होते, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरसारख्या महत्त्वपूर्ण शहरी आपल्या दलित बांधवांसमवेत धम्मचक्र फिरविले. त्या क्रांतिकारक घटनेतून जे सर्वंकष बंड आणि वैचारिक आंदोलन दलित समाजाच्या ठायी उत्पन्न झाले त्याचा एक आविष्कार म्हणजेच 'दलित साहित्य' होय".

दलित साहित्याला एक भक्कम व्यासपीठ निर्माण करून देणाऱ्या 'अस्मितादर्श' या दर्जेदार त्रमासिकाचे डॉ. वानखडे हे संस्थापक–संपादक होते. १९६७ साली त्यांनी या त्रिमासिकाची स्थापना औरंगाबाद या शहरी केली होती. त्यावेळेस 'अस्मितादर्श' हे त्रिमासिक पूर्वाश्रमीचे 'अस्मिता' या नावाने ओळखले जाई. पुढे सरकारी नोकरीत त्यांचा प्रवेश झाल्यामुळे १९७३ पर्यंत 'अस्मितादर्श' चे सल्लागार म्हणून ते काम पाहत. 'अस्मिते'च्या पहिल्या अंकाकरिता डॉ. वानखडे यांनी 'महाराष्ट्रातील आज-उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङमयीन समस्या या विषयावर दोन सत्रांमध्ये परिसंवाद आयोजित केलेला होता. या चर्चेत प्रा. वा. ल. कुळकर्णी, प्रा. म. भि. चिटणीस, प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. रा. ग. जाधव व स्वत: डॉ. वानखडे यांनी सहभाग घेतला आणि या संवाद–मंथनातून प्राप्त झालेले विचार 'अस्मिते' च्या पहिल्या अंकात प्रकाशित करण्यात आले. दलित साहित्याची भूमिका व स्थान निश्चित करणारा व योग्य दिशा मिळवून देणारा हा परिसंवाद त्या काळात खूपच गाजला होता.

बाबुराव बागूलांच्या 'सूड' या कादंबरीला डॉ. वानखडे यांनी लिहिलेली प्रस्तावना दलित साहित्या-संबंधाने अभ्यासपूर्ण आणि तात्विक पातळीवर जाऊन मूलगामी चिकित्सा करणारी आहे. ते लिहितात, "दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक, विद्रोही साहित्य. विशाल अशा मराठी साहित्याच्या सागराला मिळणारी अशी ही एक नदी होय."

डॉ. एम. एन. वानखडे यांच्या मृत्यूने दलित साहित्याचे एक 'भान' हरवले आहे. त्यांच्या रूपाने दलित साहित्याचा एक निष्ठावंत पुरस्कर्ता आणि मार्गदर्शक या जगातून निघून गेल्यामुळे या झंझावाती आणि अपरिहार्य अशा साहित्याची अपरिमित हानी झाली आहे हे निश्चित.

⊕ ⊕ ⊕

अक्षयकुमार काळे / **विठ्ठलराव घाटे**

१६ मे, १९२५ रोजी रविकिरण मंडळ नारायण पेठेतल्या पत्र्या मारुतीजवळच्या घाटयांच्या बिऱ्हाडात दुपारी मरण पावले हे खरे असले तरी या ना त्या कारणाने ते जिवंत होते. रविकिरण मंडळाचे रवी माधवराव आधी निघून गेले तरी इतरांना चांगलेच दीर्घायुष्य लाभले. पण पाने पिकल्यावर ती गळणारच. काही दिवसांपूर्वी शकरराव कानेटकर गेले, परवा परवा माडखोलकर आणि आता घाटे.

मी पुण्याला गेलो तेव्हा आवर्जून घाटयांकडे गेलो होतो. त्यांना पाहण्याची खूप उत्सुकता होती. त्या लांबरुंद पलंगावर छातीवर हात ठेवून घाटे आरामशीर पहुडले होते. डोळे मिटले होते मण चेहरा प्रसन्न होता. मला खरी मुलाखत घ्यायची होती अनुराधाबाईची म्हणून ते कारण सांगितले. पण त्यांनी डोळे उघडले नाहीत. दिवस सरू लागले होते. गेलेल्या दिवसात आत्मा आनंदाने विहार करीत होता. आता नव्यांना तिथे प्रवेश नव्हता. नवागतांचा आणि अनागतांचा निरोप घेऊनही आता पंधरा वर्षे लोटली होती. म्हणून डोळे उघडले नाहीत. छातीवरची सैलसर मिठी थोडी घट्ट केली. डोळे मिटूनच थोडे बोलले आणि आम्ही निघून आलो. घाटयांकडे गेलो होतो ते पांढऱ्या केसांमागचे हिरवे मन पाहण्यासाठी. पण घाटे सर्वांपलीकडे गेले होते. तेथे सगळ्यांनाचा जणू मज्जाव होता. जरा उदास वाटले. प्रत्यक्ष बोलले असते तर मजा आला असता, हरकत नव्हती. पण वाईट वाटले नाही. आपले उघडे जीवन अक्षरबद्ध करून नव्हते का ठेवले त्यांनी ? पानापानावर त्याची साक्ष होती. पानापानावर प्रसन्न मुद्रेचे काळ्या केसांकडून पांढऱ्या केसांकडे झुकलेले चिरतरुण घाटे उभे होते, रिझवीत होते आणि जीवनाकडे नेत होते.

घाटे खुल्या हाताने जीवनाकडे गेले आणि इतरांना घेऊन गेले. आता आतापर्यंत सिलसिला जारी होता. काव्य जगले आणि केलेही. पद्य फार कमी लिहिले. कविराज चंद्रशेखरांचे आशीर्वाद आणि माधवरावांचा सहवास यातून घाटयांच्या काव्यनिर्मितीस सुरुवात झाली आणि 'मधुमाधव' जन्मला. काव्ये-तिहासकार माधवरावांसाठी या संग्रहाची दखल घेतात घाटयांसाठी नाही. पण घाटयांनी––

धुंद तुझ्या गाण्याने होऊ । धुंदीत उद्या निरोप घेऊ
धुंदीतच जगताला पाहू । मग धुंदीतच जगणे मरणे

अशा धुंदीतच काही रचना सुंदर केल्या आहेत. तो काळच मुळी अभिजातवादाच्या चलतीचा काळ होता. तेव्हा विठ्ठलरावांनी 'श्री शिवराजस्तोत्र', 'शिवरायाचा जयजयकार'; 'तो पहा महात्मा आला'; 'दावा हिंदीजन मजला' अशा स्वरूपाच्या कविता केल्या यात आश्चर्य नाही. त्यांच्या मनीचे हार्द काही कवितात उमटलेही, पण त्यात माधवरावी लज्जत नाही. घाटयांनी हे ओळखले की कविता रुसली न कळे, पण त्यांनी पद्याला जवळ जवळ रामराम ठोकला. अधून मधून काव्यासाठी लेखणी रावबली पण त्यात जीव नव्हता. घाटयांनी आपला पिंड ओळखला. गद्यलेखनाची कास धरली. अमृत स्रवू लागले; घाटयांची भाषा नजाकतदार त्यात उत्तर हिंदुस्थानी अयब कमी पण अदब कमालीची. भाषिक अभिमानाचा पोकळ डौल नव्हता. ते उर्दू फारसी लकबांचा वापर सहजगत्या करीत. जगाकडे झेपावण्याचा तर छंद जुना. जे पाहिलं होते; घाव खाऊन साहिले होते ते अक्षरबद्ध होऊ लागले. व्यक्ती मागून व्यक्ती येत आणि जात, घाटे न्याहाळू लागले. समानधर्मी भेटला की थांबत, अदमास घेत, व्यक्तिमत्वात शिरत आणि त्याचे होऊन जात. पुष्क-ळांची जीवने पाहली. स्वतःचे अंतर्बाह्य निरीक्षण करण्याचा उरक कधीचाच. शास्त्रीय दृष्टी आणि रसिकता यांचा मनोज्ञ संगम झाला आणि निवलेल्या केसांतले हिरवे तारुण्य ओळखता आले, मोठेपणा जाणता आला, लहानपणा हेरता आला. आणि एकाहून एक सुंदर व्यक्तिचित्रे घाटयांच्या लेखणीतून बाहेर पडू

अनुक्रमणिका

लागली. त्या म्हाताऱ्यापेक्षाही घाटे म्हातारे झाले आणि सहानुभूतीने त्यांना समजावून घेऊ लागले. विसंगती कळे पण सहानुभूतीच्या पातळीवर, उपरोधाच्या नव्हे ! 'पांढरे केस हिरवी मने', 'काही म्हातारे एक म्हातारी' यांसारखे सुंदर व्यक्तिचित्रांचे संग्रह बाहेर पडले. कर्नल मार्शल, आबासाहेब जहागिरदार, आचार्य, शंकरभय्या विनिवाले, श्रीपत मामा, किती किती म्हणून सांगायचे. घाटयांची बालके मराठी साहित्यात अमर झाली.

कौतुकही खूप झाले घाटयांचे. पण घाटे मदोन्मत्त झाले नाहीत. लिखाणाचा कैफ आधीपासूनचा पण प्रसिद्धीचा चढू दिला नाही. वेळीच सावरले स्वतःला त्यामुळे दिसला माणूस की बुडव कुंचला रंगात असा प्रकार झाला नाही. जीवनात बरेच ऐसपैस होते पण लिखाणात मात्र सावधता होती. नेमके तेच लिहिले खूप आवरले स्वतःला. त्यांच्या कलात्मक संयमाला तोड नाही. त्यांचे आत्मचरित्र किती आदर्श आहे. वाङमय म्हणून आणि विशिष्ट कालखंडातील सामाजिक जीवनाच्या चढउताराचा इतिहास म्हणून घाटयांचं मन पारदर्शी आणि बुद्धी न्यायप्रिय त्यामुळे गफलत झाली नाही. प्रत्येक व्यक्ती, घटना भावनेच्या आणि बुद्धीच्या शास्त्रकाटयावर तोलली गेली. घाटयांचे काही चुकलेही असेल पण बुद्धिपुरस्सरता त्यात नव्हती. त्यात होती निर्व्याज जीवनशक्ती आणि डोळस कर्तव्यकठोरता. चष्मा घाटयांचा आहे पण दृष्टी विकृत नाही. ती स्वच्छ आहे. निर्मळ आहे. घाटयांची बुद्धी स्थितप्रज्ञ आहे. कमावल्याचा अहंकार केव्हाच गळून पडला आहे आणि गमावल्याची मळमळ तर कधीची विरली आहे. घाटयांचे आयुष्य म्हणजे एका संपन्न व्यक्तिमत्वाचा शोध आहे. अनेक नात्यांनी जगाशी बांधले जाऊन देखील अहंकारविरहित आपलेपणा जपण्याचा घाटयांचा प्रयत्न आहे.

घाटे खरेखुरे रसिक होते. जीवनाचा उपभोग घेतला पण बुद्धी गहाण ठेवली नाही. जे स्वीकारायचे ते मोकळेपणाने, धारिष्टयाने स्वीकारले. त्यांचे जग मुखवटयाचे नव्हते अन् लंपडावाचेही नव्हते. जीवन जसे वाटयाला आले तसे स्वीकारले. 'जीवनाचे साफल्ये त्यागात नाही स्वीकारात आहे' हे घाटयांना मनोमन पटले होते. पण जे मिळाले नाही त्याची मळमळ अंतःकरणाला शिवू दिली नाही. 'भूतकाळातील चित्रे आणि पत्रे फाडून', वर्तमानकाळाचे बोट धरून चालत गेले. भविष्यकाळाला गवसणी घालण्याचा घाटयांना छंद नव्हता तरी स्वप्ने पाह्यली. भूतकाळाच्या कोषात कायमचे रममाण होण्याची वृत्ती नव्हती तरी कित्येकदा प्रामाणिकपणे मागे वळून पाह्यले. आणि असे केले म्हणूनच वर्तमानाचे बोट घट्ट धरता आले. पुढे चालता आले.

घाटे गेले; जाणारच होते. घाटयांनी मृत्यू केव्हाच ओळखला होता. जवळून त्याला पाह्यले होते. घाटयांना इतके वय लाभले की त्यांच्या हयातीतच ते उपकारापुरतेही उरले नव्हते. आजच्या जगात घाटयांना स्थान नव्हते आणि घाटयांच्या जगात आजच्या युगाला स्थान नव्हते. काही दिवसांपूर्वी प्रो. श्री. वा. रानडयांची भेट झाली तेव्हा त्यांनी सांगितले की घाटयांचे डोळे गेले. दिसत नाही. मनाची दारे हळू हळू बंद झाली आणि डोळयांनीही पाहायचे नाही असे ठरविले. म्हणजे निमित्तमात्रही जगाचे दर्शन घाटयांनी नाकारले होते. या जगाशी, या युगाशी घाटयांना काही कर्तव्य नव्हते. घाटे त्या जमान्याचे होते. फरक इतकाच की आधी जमाना गेला अन् नंतर घाटे. पण जाताना जे ठेवून गेले ते विलक्षण आहे. त्याचेच हे पुण्यस्मरण !

⊕ ⊕ ⊕

प्रल्हाद पांढारकर / 'क्राइम अॅन्ड पनिशमेंट' डोस्टोव्हस्कीची अमर कृती (भंडारा)

'क्राइम अंड पनिशमेंट' ही डोस्टोव्हस्कीची सुप्रसिद्ध कादंबरी. १९६६ साली प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीस आता एकशे दहा वर्षे होऊन गेली तरी तिची मोहिनी आजही तशीच कायम आहे. जागतिक साहित्यसृष्टीत ज्या कृती अमर ठरल्या आहेत त्यात 'क्राइम अॅंड पनिशमेंट' आहेच.

मागच्या शतकातला काळ, व्यक्ती आणि वातावरण यांचं चित्रण डोस्टोव्हस्कीनं या कादंबरीत केलेलं असलं तरी या कादंबरीत चित्रित झालेलं वातावरण क्षणोक्षणी वर्तमानाचं रूप घेऊनच आपणासमोर साक्षात होत असतं. कारण माणूस, त्याचा गुंतागुंतीचा कुठल्यातरी शक्तीनं झपाटलेला आणि झपाटून टाकणारा स्वभाव, त्या स्वभावाप्रमाणं होत असलेलं त्याचं वर्तन आणि त्या विलक्षण वर्तनासंबंधीच्या सभोवतालच्या माणसांच्या प्रतिक्रिया हे सारं कधी गतकाळातलं ठरू शकत नाही. कारण हे सर्वच तसं चिरंतन आहे.

रॉस्कोलनिकोव्ह हा या कादंबरीचा नायक. रॉस्कोलनिकोव्ह म्हणजे अतिशय गुंतागुंतीचं व्यक्तिमत्व. वेगळयाच मानसिक अवस्थेत जगणारं. आक्रमक आणि तरीही स्वतःच आतून उध्वस्त होणारं. आई आणि बहिणीवर अपार प्रेम असणारं आणि एकाएकीच त्यांच्याकडे पाठ फिरविणारं. स्वतःबद्दल आणि सभोवतालच्या जगाबद्दलही विलक्षण उदासीन असणारं. स्वतःच्या मानसिक कलहानं भोवंडून जाणारं.

दारिद्र्यामुळं रॉस्कोलनिकोव्हचे कॉलेज बंद झालं आहे. दूरच्या गावी राहणारी त्याची विधवा आई आता त्याला पुरेसे पैसे पाठवू शकत नाही. हा स्वतःही काही कमावत नाही. तशी संधी आहे पण तो तसं इच्छित नाही. अर्थातच त्याचं कॉलेज बंद होतं. अंगावर कपडेदेखील धड असत नाहीत. दोन-दोन दिवस तो काही खातही नाही. तो स्वतःला बिळासारख्या एका खोलीत गाडून घेतो. त्या बिळाबाहेर तो कधी पडलाच तरी तो एकटाच असतो. गर्दीतही तो एकटाच असतो.

पण रॉस्कोलनिकोव्ह आळशी आहे, डोक्यानं मंद आहे म्हणून हे सारं होत असतं असं नाही. तो बुद्धिमान तरुण आहे. त्याचं स्वतःचं असं विशिष्ट तत्त्वज्ञान आहे. मतं आहेत. कुठलीही गोष्ट तो आधी ठरवून करीत नाही. ते त्याच्या स्वभावात बसत नाही. त्या विशिष्ट क्षणी वाटेल त्यानुसार तो वागणार. मग त्याचं ते वागणं अतर्क्यही असेल. प्रसंगी दुष्टासारखंही वाटेल. त्याच्या स्वभावात हे सर्व विचित्र मिश्रण आहे. त्याच्या वर्तनाचे आडाखे मांडता येत नाहीत. त्याचं व्यक्तिमत्व दुभंगलेलं आहे. विकृत वाटते असा हा रॉस्कोलनिकोव्ह आहे.

आपल्या आयुष्यात बहुधा एकच गोष्ट हा ठरवून करतो. आणि ही गोष्ट म्हणजे 'एल्योना इव्हानोवना' या विधवेचा, सावकारी करणाऱ्या आपल्या जुन्या, वृद्ध घरमालकीणीचा खून!

पण ही कृती विकृती वाटत असली तरी ती तशी नाही. विकृत वाटणाऱ्या, भयंकर वाटणाऱ्या या कृतीमागंही एक सुसंगती आहे. त्याचं स्वतःचंच तत्वज्ञान आहे.

रॉस्कोलनिकोव्हच्या मते समाजातील व्यक्तींचे दोन वर्ग पडतात. एक सामान्य व्यक्तींचा वर्ग व दुसरा असामान्य व्यक्तींचा. समाजातील, देशातील प्रचलित कायदे आणि बंधनं ही सामान्य व्यक्तींसाठी असतात. या कायद्याचं पालन करणं हेच यांचं कर्तव्य असतं. असामान्य व्यक्ती मात्र स्वतंत्र असतात. हे कायदे त्यांच्यासाठी नसतातच. उलट, याच व्यक्ती कायदे करणाऱ्या आणि सामान्यांना आदेश देणाऱ्या असतात. आपली उद्दिष्टं साधण्यासाठी प्रसंगी करावा लागणारा रक्तपातही यांना माफ असतो. समोर येणारा अडथळा ओलांडून (त्यासाठी कुणाचा बळी घेण्याचा प्रसंग आला तरीही ते योग्यच आणि क्षम्यच असतं). यशस्वीपणे यांनी पुढं जायचं असतं. यांचं ध्येय साध्य झालं की हेच समाजाचे शासक बनतात व आदरणीय ठरतात. अर्थात त्यांना त्यामुळेच मागच्या सर्व गोष्टींबद्दल आपोआपच माफी मिळते!

आणि रॉस्कोलनिकोव्हच्या मते तो स्वतः एक असामान्य व्यक्ती आहे. तो दरिद्री आहे. आई-बहीण दारिद्र्यात दिवस कंठीत आहेत. दारिद्र्यामुळं त्याचं कॉलेज-शिक्षण थांबलं आहे. बरे दिवस येण्याची वाट पाहतापाहताच सारं आयुष्य संपून जाणार आहे. आणि पुढं बरे दिवस आलेही तरी त्याचा काय उपयोग ?

दारिद्र्याचा पाश त्याला तोडायचा आहे. कुठून तरी त्याला खूप पैसा मिळवायचा आहे. त्या पैशावर आपलं शिक्षण पुरं करायचं आहे. खूप पैसा एकदम मिळविण्यासाठी काय करायचं तेही त्यानं योजनापूर्वक निश्चित केलेलं आहे. आपल्या जुन्या, म्हाताऱ्या घरमालकिणीचा, श्रीमंत आणि त्याच्या मते तिरस्करणीय अशा घरमालकिणीचा खून !

तिचा खून करून मिळणाऱ्या घबाडातून त्याचं शिक्षण पूर्ण होणार आहे. त्याच्या पूर्ण कुटुंबाचंच त्यामुळं कल्याण होणार आहे. शिवाय त्या पैशातून तो इतर दरिद्री लोकांनाही मदत करणार आहे. दुसऱ्याचं रक्त पिणाऱ्या या म्हातारीच्या पैशातून शंभर चांगली कामं करता येण्यासारखी आहेत.

यासाठी तो त्या म्हातारीचा खून करणारच आहे. ती अत्यावश्यक बाब आहे. तो असामान्य असल्यानं त्याला तो खून माफही आहेच.

रॉस्कोलनिकोव्ह योजनापूर्वक त्या म्हातारीचा खून करतो. (तिचा खून केल्यानंतर तिची बहीण—लिझावेटा—अवचितच तिथं हजर होते. मग तिचाही खून करणं त्याला क्रमप्राप्तच ठरतं) आपली सारी बुद्धी पणास लावून तो हे सारं करतो.

आणि त्यानंच हे दोन्ही खून केले आहेत याबाबत कुठलाही पुरावा मागं राहिलेला नसतो.

पण असा पुरावा मागं नसला तरीही तो कमाल प्रक्षुब्ध झालेला आहे. एका विचित्र मानसिक अवस्थेनं त्याच्या व्यक्तिमत्वाचा संपूर्ण ताबा घेतलेला आहे. त्याचं वर्तन विलक्षण चमत्कारिक झालेलं आहे. त्यानंतरच्या त्याच्या प्रत्येक कृतीचा अर्थ आता त्यालाच समजेनासा झाला आहे. कुठलीतरी भीषण शक्ती आता त्याच्या पाठीशी आहे आणि ती त्याला कळसूत्री बाहुल्याप्रमाणे नाचवते आहे. आतून तो भयंकर घाबरलेलाही आहे.

त्याच्या वर्तनाचा अर्थ त्याच्याप्रमाणेच अर्थात इतरांनाही कळत नाही. आणि म्हातारीच्या खुनाची गोष्ट त्याच्या उपस्थितीत निघते तेव्हा तर तो झपाटल्यासारखाच करतो. त्याच्या या वर्तनामुळं आता त्याच्याबद्दल सभोवतालच्या लोकांत संशय निर्माण होऊ लागलेला आहे.

खास या खुनाचा छडा लावण्यासाठी नेमलेला इन्व्हेस्टिगेटर पोफियरी पेट्रोविच् तर रॉस्कोलनिकोव्हला क्षणोक्षणी अस्वस्थ करतो आहे. त्याची प्रक्षुब्धता अजूनच वाढवतो आहे. जाणूनबुजूनच. आपले पाश त्याच्या गळ्याभोवती टाकून आवळू पाहतो आहे. पण रॉस्कोलनिकोव्ह त्याच्या अशाही मानसिक अवस्थेत त्याला दाद देत नाही. कारण आपण खून केला म्हणजे मोठा गुन्हा केला, पाप केलं असं त्याला वाटतच नाही. कारण तो तर असामान्यांच्या वर्गातला आहे.

मारमिलाडोव्हची मुलगी—सोनया—घराच्या चरितार्थासाठी नाइलाजानं शरीरविक्रय करते. तिच्याविषयी विलक्षण अनुकंपा रॉस्कोलनिकोव्हला वाटते आहे. त्या अनुकंपेमुळंच तो तिच्याकडे हळूहळू आकृष्ट होतो आहे. पण त्याची जाणीव त्याला स्वतःला नाही. सोनयाच्या मनात तर त्याच्याबद्दल असीम आदराची भावना आहे. तो तिच्या भविष्याचं भयंकर चित्र तिच्यापुढं सहज रेखून जातो. त्यामुळं तर तिचा थरकापच उडतो. कारण त्यानं रेखाटलेलं तिचं चित्र जीवघेणं असलं तरी खरं आहे.

त्याला सोनयाच्या खोलीत बायबलची जुनी प्रत दिसते. तो ते चाळू लागतो. ते बायबल लिझावेटाकडून तिला मिळाल्याचं ऐकून तो विस्मितच होतो.

रॉस्कोलनिकोव्हचा तसा कशावरच विश्वास नसतो. श्रद्धा नसते. पण लाझारसच्या पुनरुत्थानाचा भाग त्यातून तो तिला वाचायला सांगतो. (इन्व्हेस्टिगेटर पोफयिरीनं त्याला त्यापूर्वी "तुझा

लाझारसच्या पुनरुत्थानात विश्वास आहे काय ?" असा प्रश्न विचारलेला असतो. त्याचाच हा परिणाम. कुतूहल म्हणून).

सोनयाची पूर्ण ओळख आता त्याला अंतरातून पटलेली आहे. तिच्या दुःखानं आत कुठंतरी तो व्यथितही झालेला आहे. तिच्याबद्दलची करुणाच त्याला आता तिच्याकडे खेचू लागलेली आहे. स्वतः सारखीच तीही दुःखी असल्याची त्याची खात्री पटलेली आहे.

असे हे दोन दुःखात्मे. एका अज्ञात धाग्यानं आता एकत्र बांधलेले. या जगात आता केवळ तिच्याबद्दल त्याला माया वाटते आहे. मनातलं सारं तिलाच तो यापुढं सांगणार आहे. सारं! लिझा-वेटाचा खून कुणी केला हेसुद्धा!

रॉस्कोलनिकोव्ह आपल्या गुन्ह्याचा कबूलीजबाब देतो आणि आठ वर्षांसाठी त्याची रवानगी सैबेरियात होते. यावेळी तो अवघा चोवीस वर्षांचा तर आहे.

त्याच्यासोबत सोनयाही इथं आली आहे. आता ती बहुधा रोजच जेलमध्ये जाऊन त्याची भेट घेते.

पण आता तो संपूर्णपणे खचला आहे. त्याचं भावविश्व भकास, उजाड झालं आहे. आपलं 'तत्वज्ञान'च संपूर्ण कोलमडून पडल्याची त्याची खात्री पटलेली आहे. सैबेरियातून आठ वर्षांनंतर बाहेर पडून तरी काय करायचं आहे? कशासाठी जगायचं आहे? कशासाठी धडपडायचं आहे? केवळ अस्तित्वासाठी? अस्तित्वासाठी तो जगलेलाच नाही. यापेक्षा अधिक काहीतरी त्याला हवं होतं. तो स्वतःला इतरांपासून अगदी वेगळा आणि 'खास अधिकार असलेला' समजत होता. परंतु समाजानं अखेर त्याला इतरांसारखं सामान्यच ठरवलं.

आणि केवळ याच गोष्टीनं त्याचा कणा मोडलेला आहे.

आपण गुन्हा केला आहे असं त्याला आताही वाटत नाही. माणुसकीचा कैवार घेणाऱ्यांकडे मुळात सत्ता नव्हतीच. .ती त्यांनी हिसकावूनच घेतली होती. . .ही सारी मोठी माणसं त्यांच्या पहिल्याच प्रयत्नात अपेशी झाली असती तर त्यांनाही प्रायश्चित्त मिळालं असतं. . .पण ते सुरवातीपासून अखेरपर्यंत यशस्वीच होत गेले. . .आणि म्हणूनच ते मोठे ठरले. . .मला ते यशस्वीपणे जमलं नाही आणि म्हणूनच माझ्या वाट्याला हे प्रायश्चित.

याच जाणिवेतून रॉस्कोलनिकोव्ह स्वतःला गुन्हेगार समजत आहे. आणि आताचं हे प्रायश्चित त्यासाठीच आहे. या घटनेचा हाच अर्थ त्याला अभिप्रेत आहे.

मग आपल्या गुन्ह्याचा कबुलीजबाब देण्यापेक्षा त्यानं आत्महत्या का केली नाही? (आत्महत्येचा विचार एकदा त्याच्या मनात आलाही होता). त्याच्या आत्महत्येनं त्याच्या त्या विशिष्ट तत्वज्ञानाला तडा गेला असता. परंतु आताही तो गेलाच आहे. अर्थात् हे अटळ आहे. आणि रॉस्कोलनिकोव्ह वास्तवाच्या या जाणिवेनंच पूर्णपणे कोलमडून गेला आहे. आता जगायचं तरी कशासाठी? या प्रश्नानं त्याचा जीव घुसमटून गेला आहे. त्याच्या जिवाचा आकांत चालला आहे.

सकाळचे सहा झाले आहेत. इतरांच्याबरोबर रॉस्कोलनिकोव्ह नदीकाठाजवळ कामासाठी आला आहे.

जरावेळानं तो थोडा पुढंच आला. तिथं रचून ठेवलेल्या लाकडांच्या एका रचलेल्या थप्पीवर बसून राहिला. दूरवर बघत. एक मोठं निसर्गचित्र त्याच्यासमोर पसरलं होतं.

दूरून कुठून तरी गाण्याची लकेर हळूवारपणे वाऱ्यावरून तरंगत आली. तिथं. .दूर दूर स्वातंत्र्य भरून राहिलं होतं. .तियले लोकही त्याच्यासारखे कैदी नव्हते. .गुलाम नव्हते.

तो ते निसर्गचित्र बघत होता. तन्मयतेनं. जराही हालचाल न करता. तो तसा कसला विचारही करीत नव्हता. आणि तरीही हळू हळू कुठलंतरी एक अनामिक दुःख त्याला व्यथित करू लागलं.

एकाएकी सोनया त्याला आपल्या बाजूलाच दिसली.

ती कधीचीच त्याच्याजवळ येऊन बसली आहे. हळूच. आणि या क्षणापर्यंत त्याच्या ते ध्यानीही आलं नव्हतं. खूप दिवसांनी ती आज इथं, त्याच्याजवळ आली आहे. ती नुकतीच आजारातून उठली आहे. आजाराच्या खुणा आताही तिच्या चेहऱ्यावर दिसत आहेत.

ती त्याच्याकडे बघून हळुवार हसली. आपला हात त्याच्यापुढं करीत. त्यानं तिचा हात आपल्या हातात घेतला. दोघांचे हात गुंतून असतानाच त्यानं तिच्याकडे पाहिलं आणि त्या क्षणीच त्याची नजर खाली. जमिनीकडे वळली. तोंडून शब्दही फुटला नाही.

सभोवती निस्तब्धता. आणि ती दोघंच आता तिथं असलेली.

तो एकदम तिच्या पायांशी बसता झाला. तिच्या गुडघ्यांना कवटाळून आक्रंदून रडू लागला. ती तर भीतीनं एकदम गोठल्यासारखी झाली. मग ताडकन् उभी होऊन त्याच्याकडे बघत राहिली. थरथरत.

आणि एकाएकी, अगदी त्याच क्षणी, प्रथमच तिला सगळं सगळं उमजलं. तिचे डोळे आनंदानं लकाकले.

त्याची आपल्यावर अमर्याद प्रीती आहे याची सोनयाला खात्री पटली.

त्या दोघांनाही यावेळी परस्परांना काहीतरी मनातलं सांगायचं आहे. पण शब्द फुटत नाहीत. दोघांचेही डोळे आसवांनी डवडवले आहेत. नव्या भविष्यकाळाच्या किरणांनी त्यांचे चेहरे उजळून निघाले आहेत. त्यांच्या नव्या आयुष्याची नवी, लोभसवाणी पहाट आता त्यांच्या डोळ्यांत फुटलेली आहे. प्रेम-भावनेनं या दोन्ही दुःखी जिवांचा पुनर्जन्म झालेला आहे.

अजून सात वर्षं संपायची आहेत. ती दोघंही त्या दिवसाची वाट पाहणार आहेत. तोपर्यंत सोवत आहे दुःखाची! आणि सुखाचीही! त्यानं स्वतःला आता सावरलं आहे. आपला पुनर्जन्म झाल्याची जाणीव त्याला झाली आहे.

त्याच दिवशीची संध्याकाळ.

सारे कैदी आता गजाआड, कुलुपाच्या पहाऱ्यात असताना रॉस्कोलनिकोव्ह पडल्यापडल्या सोनयाचा विचार करतो आहे. सोवतीचे कैदी आजवर त्याचा तिरस्कारच करीत होते. पण आज ते त्याला मित्रासारखे वागवू लागले आहेत. सभोवतीचं सारंच बदलू लागलेलं आहे.

नवं जीवन सुखाच्या साऱ्या जाणीवा बरोबर घेऊन आता त्याच्यासमोर साक्षात उभं आहे.

आपल्या उशीखाली बायबलची प्रत त्यानं ठेवली होती. ती त्यानं सोनयाकडूनच पूर्वी घेतली होती. स्वतः मागून घेतली होती. आतापावेतो त्यानं ती उघडूनही पाहिली नव्हती. आताही तो ती प्रत चाळत नाही.

"तिच्या, माझ्या सोनयाच्या—श्रद्धा, भावभावना आता माझ्याही नाहीत का ?" त्याला वाटतं आहे.

सोनयाही विलक्षण आनंदी आहे. या विलक्षण सुखाचीच तिला आता भीती वाटू लागली आहे. इतकं अपार सुख! सुखाचा अथांग डोह!

येणारी सात वर्षं आता केवळ सात दिवसांसारखीच भर्रकन संपून जाणार आहेत.

⊕ ⊕ ⊕

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (१६ एप्रिल, १९७८ ते ३० जून, १९७८)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. **कार्यालय व्यवस्थापन**

१.१ दि. ४–६–७८ ला कार्यकारी मंडळाची सभा भंडारा येथे सार्वजनिक वाचनालयात झाली. या सभेत वाशीम, वरुड व नरखेड या शाखा सभांना मान्यता देण्यांत आली.

२. **आजीव सभासद**

श्री. संवत्सर अनिल, नागपूर.
सौ. संवत्सर नील अनिल, नागपूर.
श्री. एकबोटे व. ना. यवतमाळ.
अॅड. एलकुंचवार ना. न., यवतमाळ.
प्रा. देशपांडे गोविंद, यवतमाळ.
श्री. देशमुख रामराव मेघश्याम, अचलपूर.
प्रा. तिडके श्रीकांत, मुर्तिजापूर.
श्री. सुभेदार आनंद मुकुंद, यवतमाळ.
डॉ. नंदुरकर ना. झु., यवतमाळ.

३. **अस्थायी समित्या :**

दि. ९ एप्रिल, १९७८ ला अकोला येथे झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत ठरल्याप्रमाणे अध्यक्षांनी दि. १२–५–७८ ला ३१ मार्च, १९७९ पर्यंतच्या अस्थायी समित्या नेमल्या. त्या अशा——

(१) धनवटे रंगमंदिर व्यवस्थापन समिती, (२) संगीत समिती, (३) साहित्यिक कार्यक्रम समिती.
(४) चित्रकला समिती (५) नाट्य समिती (सर्व प्रकारच्या स्पर्धा सोडून)

४. **सांस्कृतिक कार्यक्रम :**

४.१ शोकसभा श्री. वि. द. घाटे, डॉ. म. ना. वानखडे, श्री. आनील वांदेकर ह्यांच्या निधनाबद्दल दि. ५–५–७८ ला शोकसभा घेण्यांत आली. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकरराव आष्टीकर होते. सभेमध्ये श्री. आ. रा. देशपांडे (अनिल), डॉ. सुनील सुभेदार, डॉ. सौ. आशा सावदेकर, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. सौ. अनुराधा केने, श्री. भाऊ समर्थ व डॉ. द. भि. कुळकर्णी ह्यांची भाषणे झाली. श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषण दिले. शोक प्रस्ताव अध्यक्षांनी वाचून दाखविला. नंतर उपस्थितांनी २ मिनिटे उभे राहून मूक श्रद्धांजली अर्पण केली.

४.२ दि. २०–४–७८ ला मेजर आठल्ये यानी 'प्रवासी' हा एकपात्री प्रयोग सादर केला.

४.३ महिला विभाग कार्यक्रम

दि. २०–४–७८ ला महिला विभागातर्फे 'साहित्याचे नवप्रवाह' या विषयावर चर्चा झाली.

या चर्चेत सौ. सुलभा हेर्लेकर, सौ. सुमती संत व सौ. अनुराधा केणे ह्या भगिनींनी भाग घेतला. कार्यक्रमाचे संयोजन सौ. वर्षा रेगे यांनी केले.

५. स्मृति दिन व जयंती

५.१ दि. १–५–७८ ला कै. नाना जोग यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पुतळयाला पुष्पमाला अर्पण करण्यांत आली.

५.२ दि. ९–५–७८ ला शिवजयंती निमित्त प्रा. श्रीधर शनवारे यांचे हस्ते छायाचित्राला पुष्पमाला अर्पण करण्यांत आली.

५.३ दि. १७–५–७८ ला कै. नि. व. भवाळकर यांचे जन्म शताब्दी निमित्त त्यांचे छायाचित्राला पुष्पमाला अर्पण करण्यांत आली. याप्रसंगी डॉ. आष्टीकर, श्री. गो. स. देहाडराय, श्री. चंद्रकांत कुळकर्णी, डॉ. म. रा. जोशी, डॉ. तु. वि. गेडाम, प्रा. गुल्हाने, श्री. गोविंदराव वंजारी आमदार, श्री. ग. नी. भवाळकर, यांनी बापूसाहेबांच्या विविध कार्याचे मूल्यमापन करून आदर व्यक्त केला.

५.४ दि. २५–६–७८ वि. सा. संघाचे आद्य संस्थापक कविभूषण कै. बळवंत गणेश उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांचा प्रथम स्मृती दिन श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. सुरवातीला अध्यक्षांनी छायाचित्राला पुष्पमाला अर्पण केली. श्री. गो. स. देहाडराय, श्री. ज्ञानेश्वर साधू व कवी अनिल यांनी खापर्डे यांच्या कार्याची माहिती दिली व आदरांजली अर्पण केली.

६. सन्माननीयांची भेट व सत्कार

६.१ दि. २–६–७८ भंडारा येथील वि. सा. संघाच्या साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर, वणी ह्यांचा शालश्रीफल अर्पण करुन सत्कार करण्यांत आला. याप्रसंगी डॉ. आशा सावदेकर, श्री. श्रीकृष्ण विठ्ठल गंधे, श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) श्री. ज्ञा. रा. साधू यांची गौरवापर भाषणे झाली. श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषण केले. कु. विभावरी अंतरकर (वसई) या कवियत्रीने सुरवातीला काव्यवाचन केले. डॉ. आष्टीकर यांनी पुष्पमाला अर्पण करून अध्यक्षीय भाषण केले. प्रा. शेवाळकर यांनी सत्कारास उत्तरादाखल भाषण दिले.

६.२ माननीय शिक्षणमंत्री नामदार डॉ. बळीराम हिरे यांनी दि. ८–६–७८ ला विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. त्यांना संघाच्या विविध कार्याची माहिती देण्यात आली. श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषण करुन वि. सा. संघासमोरील अडचणींची माहिती दिली व युगवाणीचे अंक भेटी दाखल दिले. संघाध्यक्ष डॉ. आष्टीकर यांनी पुष्पमाला अर्पण करून स्वागत केले. मंत्री महोदयांनी शासनातर्फे शक्य ते सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

६.३ भारतातील महाराष्ट्रीय महिला जादूगार कु. मंदाकिनी जाधव (मेरी गोल्ड) यांचा दि. १७-६-७८ ला वि. सा. संघातर्फे सत्कार करण्यांत आला. सौ. कमल आंबेकर यांनी प्रास्ताविक भाषणात मेरी गोल्ड संबंधी माहिती दिली. प्रश्नोत्तर रूपाने चर्चा झाली. डॉ. आष्टीकर यांनी आभाराचे भाषण करून मेरी गोल्डला भारतातच नव्हे तर परदेशातही सुयश चिंतिले.

७. चित्रकला समिती विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने बालचित्रकारांचे चित्र प्रदर्शन 'वसोली' या संस्थेतर्फे दि. १६ ते २० जून पर्यंत आयोजित करण्यांत आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. आष्टीकर यांनी केले.

८. विदर्भ साहित्य संघाचे साहित्य संमेलन, भंडारा

८.१ तेत्तिसावे विदर्भ साहित्य संमेलन भंडारा येथे दि. ४ व ५ जून, १९७८ ला जकातदार कन्या विद्यालयाच्या प्रांगणात साजरे झाले. माननीय श्री. बाळासाहेब तिरपुडे उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे उद्घाटक होते. प्राचार्य राम शेवाळकर यांचे अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहाने व यशस्वीरीतीने हे संमेलन संपन्न

झाले. कार्याध्यक्ष श्री. म. वा. देवघरे, स्वागताध्यक्ष श्री. जीवनचन्द्र निर्वाण, संयोजक व प्रेरक श्री. प्रल्हाद पांढारकर व श्री. भा. आ. पांढरीपांडे होते. स्वागताध्यक्षांचे भाषण झाल्यावर उपस्थित असलेले पूर्व-संमेलनाध्यक्ष सर्वश्री आ. रा. देशपांडे (अनिल) या. मु. पाठक, ना. रा. शेंडे, शरश्चंद्र टोंगो, डॉ. मधुकर आष्टीकर, यांचा सत्कार करण्यांत आला आणि नंतर "भंडारा जिल्हयाची अस्मिता" संपादक—श्री. ना. रा. शेंडे या पुस्तिकेचे उद्‌घाटन झाले. तसेच प्रा. रमेश ललगुणकर, गोंदिया यांच्या आनंद कथामाला, भाग १ ते १० या पुस्तकांचे उद्‌घाटन झाले. उद्‌घाटकांचे भाषणानंतर प्राचार्य राम शेवाळकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले.

८.२ दि. ४ जून, १९७८ सायंकाळी ४.४५ वाजता नामदार बाळासाहेब तिरपुडे यांचे हस्ते वैदर्भीय लेखकांच्या साहित्याचे ग्रंथप्रदर्शन उद्‌घाटन झाले. हे प्रदर्शन शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर यांनी सार्वजनिक वाचनालयात आयोजित केले होते व ते दि. ४ ते ६ जून पर्यंत खुले होते.

८.३ त्याच दिवशी म्हणजे ४ जून ७८ ला कवी संमेलन झाले. अध्यक्षस्थानी प्रा. या. मु. पाठक होते. अनेक स्थानीय व बाहेरगावच्या कवींनी यात भाग घेतला. कवी संमेलनानंतर श्री. बाळासाहेब संत, जबलपूर यांचे शास्त्रोक्त गायन झाले. हा कार्यक्रम रात्री २ पर्यंत चालला.

८.४ दि. ५ जून, १९७८ ला सकाळी ९ वाजता 'आजच्या मराठी साहित्यातील स्त्री जीवन" या विषयावर परिसंवाद झाला. डॉ. शकुंतला खोत अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. आशा सावदेकर आणि श्री. भा. आ. पांढरीपांडे यांनी परिसंवादात भाग घेतला.

८.५ नंतर कथाकथनाचा कार्यक्रम श्री. शरश्चंद्र टोंगो यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यात सर्वश्री निशवेकर, वसंत चिंचाळकर, सौ वर्षा रेगे, सौ. कुमुद मंडलेकर, सौ. सुधाताई कापरे, बाजीराव पाटील आदिनी भाग घेतला.

८.६ नंतर दुसरा परिसंवाद प्राचार्य राम शेवाळकर यांचे अध्यक्षतेखाली झाला. यात प्रा. कृष्णा चौधरी प्रा. श्रीकांत तिडके, श्री. अक्षयकुमार काळे, प्रा. ज. सा. गवळीकर यांनी भाग घेतला.

८.७ संध्याकाळी ५ चे सुमारास खुले अधिवेशन झाले. या अधिवेशनात खालील ठराव पारित करण्यांत आलेत—

ठराव क्रमांक १ (दुखवटयाचा ठराव)

हे साहित्य संमेलन (१) बळवंत गणेश उपाख्य अण्णासाहेब खापर्डे, (२) ग. दि. माडगूळकर, (३) भ. श्री. पंडित, (४) पु. शि. रेगे, (५) चि. त्र्यं. खानोलकर, (६) व्यं. शं. वकील (७) वि. स. खांडेकर, (८) वा. वा. भोळे, (९) ग. त्र्यं. माडखोलकर, (१०) सौ. उषा कोलते, (११) पु. वा. साठे, (१२) ज. रा. जोशी, (१३) म. ना. वानखेडे, (१४) वि. द. घाटे, (१५) अनिल वांढेकर, (१६) सुनिल कुमार चॅटर्जी, (१७) पंडित भगवतीप्रसाद मिश्र, (१८) राजा वढे, (१९) द. चि. सोमण, (२०) हमीद दलवाई, (२१) रा. श्री. जोग. या दिवंगत कार्यकर्त्यांना, साहित्यिकांना आणि लेखकांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करते.

अध्यक्षाकडून.

ठराव क्रमांक २

लोकनायक बापुजी अणे ह्यांची जन्मशताब्दी १९८० साली व्हावयाची आहे. त्या निमित्ताने त्यांचा चरित्रग्रंथ, त्यांच्या आठवणीचा संग्रह, त्यांचा पुतळा व स्मृति व्याख्यानमाला अशा चार गोष्टींच्या सहाय्याने त्यांच्या स्मृतीची जपणूक करुन पुढील पिढीच्या स्वाधीन करण्यांची जबाबदारी वि. सा. संघाने स्वीकारावी.

सूचक : डॉ. बाबासाहेब नंदूरकर.
अनुमोदक गोविंद देशपांडे.

ठराव क्रमांक ३

साहित्य संमेलनात भाग घेण्यासाठी ज्या साहित्यिकांना निमंत्रण दिले जाते त्यांना मानधन देण्यात येवू नये.

सूचक श्री. प्रल्हाद पांढारकर.
अनुमोदक श्री. गोविंद लांजेवार.

अनुक्रमणिका

ठराव क्रमांक ४

पदमपूर हे भवभूतीचे जन्मस्थान त्यांचे सर्व साहित्य पदमपूरच्या परिसरातच निर्माण झाले. या थोर साहित्यिकाचे उचित स्मारक विदर्भ साहित्य संघाने योजना आखून करावे व महाराष्ट्र शासनाने त्याला संपूर्णपणे आर्थिक व इतर सहकार्य द्यावे. यापूर्वी रामटेकला कालीदासाचे असेच उचित स्मारक सरकारने केलेले आहेच, तेव्हा या बाबतीतही सरकार निश्चितपणे संपूर्ण सहकार्य देईल अशी आशा आहे.

सूचक गो. स. देहाडराय.
अनुमोदक श्री. कृष्णा चौधरी.

ठराव क्रमांक ५

महाराष्ट्राखेरीज इतर अमराठी राज्यात मराठीची सेवा करणाऱ्या अनेक साहित्य संस्था आपापल्या परीने मराठीची सेवा करीत आहेत. पण त्यांना योग्य मार्गदर्शन व मराठी विभागातून हवा तो जिव्हाळा मीळू शकत नाही अशी त्यांची एक केवळ तक्रार आहे. महाराष्ट्रातील साहित्य संस्थांना हे काम अंगावर घ्यायला पाहिजे आणि महाराष्ट्र शासनाने या दृष्टिने जर काही योजना त्यांच्यापुढे आल्या तर त्यांना सहकार्य दिले पाहिजे. अमराठी राज्यात (आंध्र, कर्नाटक आणि मध्यप्रदेश व्यतिरीक्त इतर राज्यांत) मराठी भाषेचा प्रसार व प्रचार करण्यांच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने त्या त्या राज्यातील प्रमुख विद्यापीठात मराठीच्या अध्यापनाची सोय करावी. तामीलनाडू आदि राज्यांनी इतर भाषिक राज्यांत त्यांच्या त्यांच्या भाषेच्या प्रसारासाठी अशी सोय केलेली आहे.

सूचक राम आस्वले.
अनुमोदक भा. रा. पांढरीपांडे.

ठराव क्रमांक ६ :

विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र शासनातून जे अनुदान मिळते ते अतिशय कमी आहे. विदर्भ आठ जिल्ह्याचा आहे आणि क्षेत्रफळाच्या दृष्टिने तो इतर विभागापेक्षा बराच मोठा आहे. खेडोपाडी या साहित्य चळवळीचे लोण पोचवायचे तर आर्थिक बळ जोरकस असल्याशिवाय हे करता येणार नाही. तेव्हा महाराष्ट्र शासनाने अनुदान देतांना अधिक उदार धोरण ठरवावे.

सूचक : श्री. गो. स. देहाडराय.
अनुमोदक : श्री. अ. ल. लिमये.

ठराव क्रमांक ७

तंजावरच्या दुर्मीळ ग्रंथालयात पुष्कळशी ऐतिहासिक कागदपत्रे (मराठी इतिहासाशी संबंधित) आणि कालदृष्टचा अत्यंत जुनी अशी नाटके, कादंबऱ्या आदी साहित्य सामुग्री उपलब्ध आहे. हस्तलिखित स्वरुपात उपलब्ध असलेली ही इतिहासाची साधने जर काळाच्या उदरात गडप झाली तर मराठीचे फार मोठे नुकसान होणार आहे. तेव्हा या ठरावाद्वारे महाराष्ट्र शासनास अशी विनंती करण्यांत येते की, त्याने या सर्व सामुग्रीचा झेरॅस्कोप किंवा फोटोस्टेट कॉपीज काढून त्या महाराष्ट्रातील साहित्य संस्थांच्या सूपूर्द कराव्यात. वि. सा. संघ या बाबत संपूर्ण सहकार्य देईल.

सूचक श्री. मधुकरराव आप्टीकर.
अनुमोदक श्री. प्रल्हाद पांढारकर.

ठराव क्रमांक ८ :

विदर्भीय साहित्यीकरांचे साहित्य विदर्भ साहित्य संघात संकलीत करुन त्यांचे सुरक्षितपणे जतन व्हावे याकरीता विदर्भ साहित्य संघात एक दालन ठेवण्यांत यावे. तसेच विदर्भातील प्रत्येक साहित्यीकाने संशोधकाने आपले पुस्तकाची एक प्रत विदर्भ साहित्य संघात द्यावी असे आवाहन या ठरावाद्वारे करण्यात येत आहे.

सूचक श्री. मा. तु. दलाल.
अनुमोदक श्री. ना. सी. कातोरे.

वरील सारे ठराव सर्वानुमते संमत झालेत.

८.८ सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. संमेलनाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी समारोपाचे भाषण केले. डॉ. आप्टीकर यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी श्री. ना. रा. शेंडे यांनी देखील भंडारावासीयातर्फे आपले विचार मांडले.

अनुक्रमणिका

९. शाखा सभावृत्त

९.१ वरुड दि. ९ जून, १९७८ रोजी डॉ. आष्टीकर ह्यांचे हस्ते विदर्भ साहित्य संघाच्या वरुड शाखेचे केदारेश्वर मंदिरात उद्‌घाटन करण्यांत आले. या प्रसंगी डॉ. प्रभुदेसाई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. देहाडराय हे पण प्रस्तुत कार्यक्रमास मार्गदर्शन करण्यास उपस्थित होते. ह्या शाखेच्या सर्व साधारण सभासदांची संख्या शंभराच्या वर असून, आणखी प्रतिसाद मिळत आहे. व्याख्यान मालेची निर्मिती करण्याचा विचार आहे.

९.२ वाशीम : सर्वसाधारण सभासदांची सभा होऊन खालील कार्यकारीणीची निवड झाली. अध्यक्ष— श्री. डॉ. रवि जाधव; उपाध्यक्ष—सुधाकर सावळकर, सचिव श्री. चंद्रशेखर उकळकर, सहसचिव कु. प्रियंवद घिसड, कोषाध्यक्ष श्री. प्रकाश राठी. कार्यकारीणी सदस्य सर्वश्री नारायण कुळकर्णी, धनंजय खरे, नामदेव कांबळे, मधुकर अनसिंगकर.

९.३ नरखेड ७ जून, १९७८ ला सर्वसाधारण सभासदांची सभा होऊन पुढील कार्यकारी मंडळ निवडण्यांत आले. अध्यक्ष—श्री. रमेश बाबू गुप्ता, उपाध्यक्ष– श्री. भाऊराव मुदगल, सौ. मिनाक्षी अंधारे, सरचिटणीस– प्रा. रमेश पोतदार, चिटणीस सर्वश्री आनंदराव गुरुमुळे, प्रा. रघुनाथ उमाठे, नंदकुमार क्षीरसागर कोषाध्यक्ष– भाऊराव ठाकरे, सदस्य– सर्वश्री. के. एस. वांदरे, बा. गो. कटारे, रामराव ढोके, सुभाष खोडे, मधुकर कराळे, रमेश कलंभे, प्रा. भाऊ भोगे, भाऊराव काकडे, डॉ. अर्जून चोपडे.

९.४ मूर्तिजापूर दि. ६ मे, १९७८ रोजी कविसंमेलन कार्यक्रम करण्यात आला. संमेलनाचे संचालन तरुण भारताचे विशेष प्रतिनिधी श्री. प्रभाकर सिरास यांनी केले. या संमेलनात सर्वश्री विठ्ठल वाघ, शंकर बडे, श्रीकृष्ण राऊत, ज्ञानेश्वर बहुरुपी, विनय देशमुख, मधु खोकले, सुभाष इंगोले, व सौ. निरुपमा कुळकर्णी यांनी भाग घेतला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री. वि. द. घाटे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

१०. मराठी साहित्य महामंडळ

मराठी साहित्य महामंडळाची वार्षिक सभा दि. ३० एप्रिल, १९७८ ला आंध्र प्रदेश मराठी साहित्य सभेच्या हैद्राबाद येथील कार्यालयात झाली. या सभेला वि. सा. संघाचे प्रतिनिधी श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) डॉ. मधुकर आष्टीकर व श्री. गो. स. देहाडराय उपस्थित होते. या सभेत प्रामुख्याने संमेलन विषयक नियमांचा पुर्नविचार होऊन दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या. तसेच महामंडळाचे कार्यालय आगामी वर्षासाठी विदर्भ साहित्य संघ, नागपूर या घटक संस्थेकडे ठेवण्यांचे मान्य झाले. कार्यवाह म्हणून डॉ. मधुकर आष्टीकर व कोषाध्यक्ष म्हणून श्री. गो. स. देहाडराय यांची निवड झाली व १–५–७८ पासून हे कार्यालय नागपूरला नेण्याचे ठरले.

११. परीक्षा समिती सूचना

११.१ आगामी प्रथम सत्रीय परीक्षा २६ ऑगष्ट, १९७८ रोजी होईल. आवेदन पत्रे भरण्याची अंतीम तारीख १५ जुलै, १९७८ राहील.

११.२ शासकीय परीक्षांचे वर्ग ५ जुलै पासून सायंकाळी ६ ते ७ होतील. तत्पूर्वी अमराठी कर्मचाऱ्यांनी प्रवेश घ्यावा.

११.३ १९७८–७९ यावर्षी प्रथम सत्रीय अभ्यासक्रम पूर्ववत राहील. फेब्रुवारी १९७९ पासून मग तो ७९ च्या बोर्ड व विद्यापीठ अभ्यासक्रमाशी एकरुप राहील.

११.४ केंद्राधिकाऱ्यांनी दि. १५–७–७८ पर्यंत आवेदन पत्रे भरून पाठवावीत.

⊕ ⊕ ⊕

विदर्भ साहित्य संघ

पंचावन्नाव्या वर्षाचा वृत्तांत

(१ एप्रिल, १९७७ ते ३१ मार्च, १९७८)

प्रास्ताविक

विदर्भ साहित्य संघाच्या पंचावन्नाव्या (१९७७—७८) वर्षाचा वृत्तांत वार्षिक साधारण सभेपुढे सादर करताना आनंद होत आहे. सभासदांची संख्या सारखी वाढते आहे. आणि त्याप्रमाणातच कार्यकारिणी-वरील जबाबदारीही. १९७७ ते १९८० या वर्षांकरिता त्रैवार्षिक निवडणुकीच्या न्यायालयीन आदेशा-प्रमाणे, निकालाची अधिकृत घोषणा दि. २८–४–७७ ला निर्वाचन अधिकारी अ‍ॅड. पां. बा. गडकरी यांनी केली. या अधिकृत निकालानंतर दि. २–५–७७ ला नव्या कार्यकारी मंडळाने सूत्रे हाती घेतली. अजूनही कोर्टकचेरी चालूच आहे व यात बराचसा कालापव्यय व अर्थापव्ययही होत आहे. संस्थेच्या कार्यप्रणाली विषयी सभासद जागरुकतेने उपयुक्त सूचना देतात, ही संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने समाधानाची बाब आहे. असेच सहकार्य ह्यापुढेही लाभावे ही अपेक्षा व्यक्त करून १९७७–७८ या वर्षाचा वृत्तांत आपणापुढे ठेवीत आहोत.

१. **कार्यालय व्यवस्थापन**

१.१ **सभासद संख्या** ३१–३–७८ पर्यंत उपकर्ते ९, आश्रयदाते ३, सहायक १, हितचिंतक २, आजीव सभासद ३००, साधारण सभासद २,४०७ असे एकूण २,७२२. केवळ 'युगवाणी' मासिकाचे वर्गणीदार सभासद १४५.

१.२ **शाखा** अकोला, आकोट, अमरावती, अचलपूर (परतवाडा) उमरखेड, खामगांव, गोंदिया, चंद्रपूर, चिखली, तुमसर, दिग्रस, दारव्हा, नागभीड, पांढरकवडा, ब्रह्मपुरी, भंडारा, मुर्तिजापूर, यवतमाळ, लाखनी; वरूड, नरखेड, वणी आणि वर्धा या ठिकाणी संघाच्या शाखासभा आहेत.

१.३ **संलग्न संस्था** रंजन कला मंदिर, नागपूर.

१.४ **वार्षिक साधारण सभा** वार्षिक साधारण सभा रविवार दि. २४–७–७८ ला सकाळी झाली. संघाध्यक्ष डॉ. आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा घेण्यात आली. या सभेत १९७७–७८ चा अर्थसंकल्प मान्य करण्यात आला. सविस्तर प्रतिवृत्त संबंधित पुस्तकात लिहिण्यात आले आहे.

१.५ **कार्यकारी मंडळाच्या सभा** या वर्षात २ मे, २४ जुलै, ११ सप्टेंबर, ११ डिसेंबर, १९७७ व १९ मार्च, १९७८ अशा पांच सभा आयोजित करण्यात आल्या. ११ सप्टेंबर, १९७६ ची सभा यवतमाळ येथे झाली व त्या सभेत भंडारा येथे वि. सा. संघाचे साहित्य संमेलन घेण्याचे ठरले.

तसेच मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय ३१ मार्च, १९७८ नंतर नागपूरला आणावे असे ठरले. या सभात त्या त्या कालातील दिवंगत साहित्यिक व मान्यवर व्यक्ती यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नवीन शाखांना मान्यता देण्यात आली. पहिल्या सभेत (२–५–७७ च्या) सुरवातीसच सर्व सभासदांनी संघाशी एकनिष्ट राहण्याबद्दल शपथ घेण्याची नवीन प्रथा अध्यक्षांनी सुरु केली.

२. **विश्वस्त मंडळाची सभा**

१०–७–७७, २०–७–७७ आणि १९–१–७८ अशा तीन सभा आयोजित करण्यांत आल्या. १०–७–७७ च्या सभेत १९७६–७७ चा जमाखर्च, १९७७–७८ चा अर्थसंकल्प याची माहिती विश्वस्तांना देण्यात आली. २०–७–७७ च्या सभेत डॉ. वा. वि. मिराशी (विश्वस्त) ह्यांची प्रकृती नीट रहात नाही म्हणून राजीनामा दिला. त्यांचेजागी डॉ. वामन शिवराम वारलिंगे ह्यांची निवड व नेमणूक करण्यात आली.

३. **दिवंगतांना श्रद्धांजली**

३.१ श्री. राजा बढे, १३ एप्रिल, १९७७ ला प्रकट शोकसभा.

३.२ श्री. व. ग. उपाख्य कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, वि.सा. संघाचे संस्थापक, ३० मे,७७ ला शोकसभा.

३.३ श्री. ग. दि. माडगूळकर १६ डिसेंबर, १९७७ ला शोकसभा.

३.४ श्री. भ. श्री. पंडित, संघाचे आजीव सदस्य, २२ जाने., १९७८ ला शोकसभा.

३.५ श्रीमंत माधवराव उपाख्य राजाबाळ चिटणवीस, वि. सा. संघाचे आश्रयदाते, २२ जाने., ११७८ ला शोकसभा.

३.६ श्री. पु. शि. रेगे, १९ फेब्रुवारी, १९७८ ला शोकसभा.

३.७ याशिवाय साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. सुनीतिकुमार चॅटर्जी, प्रा. रा. श्री. जोग, श्री. रामभाऊ धोटे, आजीव सदस्य, श्री. पु. वा. साठे, श्री. हमीद दलवाई, श्री. ज. रा. जोशी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली.

४. **संघाचा वर्धापन दिन**

मकर संक्रांतीच्या शुभदिनी (दि. १४ जानेवारी, १९७८ ला) वि. सा. संघाचा पंचावन्नावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. इतिहास संशोधक व शिवशाहीर श्री. ब. मो. उपाख्य बाबासाहेब पुरंदरे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी डॉ. व. शि. पुरोहित, डॉ. व. वि. कुलकर्णी, डॉ. मधुकरराव पाठक आणि डॉ. सौ. चेतना दुरगकर ह्यांना (मराठीत) पीएच. डी. पदवी मिळाल्याबद्दल शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रसंगी डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांचाही नागपूर विद्यापीठ मराठी विभागाचे प्रमुख झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या निमित्ताने १५ जाने., १९७८ ला रसिकरंजन, नवप्रभात आणि सुभाष मंडळ या संस्थांनी एकांकिका सादर केल्या.

५. **नैमित्तिक कार्यक्रम**

१५ ऑगस्ट, १९७७ ला ध्वजारोहण समारंभ, २ आक्टोबर. १९७७ ला गांधी जयंती व २६ जानेवारी, १९७८ ला प्रजासत्ताक दिन साजरे करण्यात आले.

अनुक्रमणिका

६. मान्यवर व्यक्तींच्या भेटी व सन्मान

खालील मान्यवर व्यक्तींनी संघाला भेटी दिल्या त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला:—

६.१ दि. १२ एप्रिल, १९७७ ला डॉ. मु. श्री. कानडे, पुणे विद्यापीठाच्या मराठी विषयाचे प्रमुख.

६.२ दि. १४ मे, १९७७ ला श्री. मोरेश्वर तपस्वी, दिल्लीचे सुप्रसिद्ध वार्ताहर.

६.३ दि. १२ जुलै, १९७७ ला श्री. अटल बहादुरसिंग, नागपूरचे महापौर.

६.४ दि. २३ जुलै, १९७७ ला श्री. बाळासाहेब शब्दे, म. रा. ग्रंथालय विभागाचे महसंचालक.

६.५ दि. २३ जुलै, १९७७ ला आय. एन. टी. यांच्या बाल व प्रौढ कलाकारांची भेट.

६.६ दि. १३ ऑगस्ट, १९७७ ला श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाचे अध्यक्ष.

६.७ दि. ५ सप्टेंबर, १९७७ ला श्री. कृ. द. पुराणिक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय विभागाचे संचालक.

६.८ दि. ३० आक्टोबर, १९७७ ला प्रा. शिवाजीराव भोसले.

६.९ दि. २९ डिसेंबर, १९७७ ला श्री. वसंत सोपारकर, "श्री" साप्ताहिकाचे संपादक आणि श्री. भाऊ तारसेकर मराठी ब्लिट्झचे संपादक.

६.१० दि. ९ जाने., १९७८ ला सुप्रसिद्ध कवी सर्वश्री वसंत बापट, नारायण सुर्वे, केशव मेश्राम, मंगेश पाडगावकर, शंकर वैद्य व विंदा करंदीकर.

६.११ दि. ९ जाने., १९७८ ला सायं. सर्वश्री उद्धव शेळके व मनोहर तल्हार.

६.१२ दि. १० मार्च, १९७८ ला श्री. श्रीराम वैद्य, महापौर नागपूर.

७. स्मृति दिन जयंती

७.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४–४–७७) प्रतिमेला पुष्पहार.

७.२ श्री शिवछत्रपती शिवाजी जयंती (२०–४–७७) ग्रंथ प्रदर्शन व चलचित्र प्रदर्शन.

७.३ नाना जोग स्मृति दिन (१–५–७७) पुतळ्याला हार.

७.४ साने गुरुजी स्मृति दिन (११–६–७७) प्रतिमेला हार.

७.५ आचार्य अत्रे स्मृति दिन (१३–६–७७) 'झेंडुची फुले' या काव्य ग्रंथातील निवडक कवितांचे गायन.

७.६ टिळक पुण्यतिथी (१–८–७७) प्रतिमेला हार.

७.७ प्र. के. अत्रे जन्म दिन (१३–८–७७) प्रतिमेला हार.

७.८ कविवर्य 'बी' ना. मु. गुप्ते (३०–८–७७) प्रतिमेला हार.

७.९ श्री चक्रधरस्वामी जयंती (२२–९–७७) श्री. बा. श्री. कोठीकर यांचे व्याख्यान.

७.१० कवीवर्य अण्णाजी बोबडे स्मृति दिन (१–१०–७७) प्रतिमेला हार.

७.११ महात्मा गांधी जयंती (२–१०–७७) प्रतिमेला हार.

७.१२ राष्ट्रीय कवी दुर्गाप्रसाद तिवारी स्मृती दिन (३१–१०–७७) नामदार बाळासाहेब चौधरी यांचे अध्यक्षतेखाली डॉ. कोलते आणि डॉ. आष्टीकर यांची भाषणे.

७.१३ वि. रा. हंबर्डे स्मृती दिन (१९–११–७७) प्रतिमेला हार.

७.१४ ग. त्र्यं. माडखोलकर स्मृति दिन (२७–११–७७) प्रतिमेला हार व त्यानिमित्त २८–११–७७ ला सभा.

७.१५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्वाणदिन (६–१२–७७) प्रतिमेला हार.

७.१६ राम गणेश गडकरी स्मृति दिन (२३–१–७८) सावनेर येथे समाधीला पुष्पमाला अर्पण आणि त्यानिमित्त २४–१–७८ अभिव्यक्ती या संस्थेतर्फे गडकरी दर्शन हा कार्यक्रम.

७.१७ महात्मा गांधी पुण्यतिथी (३०–१–७८) प्रतिमेला हार.

७.१८ बा. सी. मर्ढेकर स्मृति दिन (२०–३–७८) भाषण.

८. सांस्कृतिक कार्यक्रम

८.१ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी श्री. अ. ल. लिमये यांची निवड झाल्याबद्दल दि. ७ मे, १९७७ ला सत्कार करण्यात आला.

८.२ विदर्भातील वाङ्मयीन चळवळ अधिक सक्रिय व अभिवृद्ध करण्याकरिता साहित्यिक संस्था, कार्यकर्ते व वाङ्मय प्रेमी ह्यांचा मेळावा दि. २९ मे, १९७७ ला घेण्यात आला.

८.३ जळगाव येथील कवी देवकीनंद सारस्वत यांनी १९३० मे, ७७ ला वि. सा. संघाला भेट दिली व काव्यगायन केले.

८.४ बाल श्रोतृवृंदासाठी विनोदी कथा कथनाचा कार्यक्रम दि. १२ जून, ११७७ ला झाला.

८.५ मुंबईच्या पाप्युलर प्रकाशन संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्य दि. १ ते ३ जुलै, १९७७ ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

८.६ शासकीय विभागीय ग्रंथालयाचे वाचक व्यासपीठ आणि वि. सा. संघाच्या संयुक्त विद्यमाने शासकीय पुरस्कार प्राप्त सर्वश्री प्र. द. भावे, डॉ. वा. वि. मिराशी, प्रभाकर पुराणिक, दिनकर देशपांडे, डॉ. व. वि. कुळकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

८.७ नव्या पिढीतील पाच कथाकार सर्वश्री, यशवंत देशपांडे, कु. मीरा कुळकर्णी, बबन चहांदे, सुहास कुळकर्णी, कु. चित्रा पांढरकर यांचा कथाकथनाचा कार्यक्रम झाला.

८.८ विविध भाषातील साहित्य अकादमी पारितोषिक प्राप्त पुस्तकांचा परिचय करून देण्याच्या दृष्टीने "स्मरणकथा" (ले. गो. नि. दांडेकर) या पुस्तकावर डॉ. सुनील सुभेदार यांनी भाषण दिले.

८.९ अभिव्यक्ती या स्त्री लेखिकांच्या संस्थेतर्फे 'काव्यवर्षा' या शीर्षकाखाली पावसाळ्यातील कवितांचे वाचन झाले.

८.१० चित्रकला विषयक व अन्य काही लघुपट दि. १९ जुलै रोजी दाखविण्यात आले.

८.११ सर्वश्री वसंत चिंचाळकर, वसंत निगवेकर, कमलाकर धारप, शंकर कऱ्हाडे, सौ. शकुंतला जोग आणि मालती निमखेडकर यांचा दि. २४ सप्टेंबर, १९७७ ला कथाकथनाचा कार्यक्रम झाला.

८.१२ 'मेरी तेरी बात' (ले. यशपाल) अकादमी पुरस्कार प्राप्त पुस्तकासंबंधी श्री. राजन त्रिवेदी यांनी भाषण दिले.

८.१३ सर्वश्री उल्हास मनोहर, कु. अरुणा पवार व श्रीमती सुशीला शंकर यांचे ३ आक्टोबर, १९७७ ला तीन कवि आणि एक समीक्षक असा कार्यक्रम झाला.

८.१४ कु. चित्रा पांढारकर, कु. रत्ना महाजन, कु. चारु फत्तेखानी, कु. नंदिनी उपासनी, कु. विजया देशपांडे, कु. निलिमा मोहरीर व कु. अरुणा पवार यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला.

८.१५ श्री. पु. भा. भावे यांचे 'व्यक्तिमत्व व कथा' यावर दि. २२–१०–७७ ला श्री. वसंत वरखेडकर यांचे भाषण झाले.

८.१६ डॉ. अनिल अवचट व श्री. बाबा आढाव यांनी दि. ९ आक्टोबर, १९७७ ला साहित्यावरील नवीन मूल्यांच्या संदर्भात विवेचन केले.

८.१७ दि. १५ आक्टोबर, १९७७ ला डॉ. श्रीराम लागू व नट श्री. मोहन गोखले यांच्याशी रंगभूमीसंबंधी चर्चा झाली.

८.१८ न्या. मू. रानडे आंतर-महाविद्यालयीन वादस्पर्धा ही स्पर्धा वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे आणि वि. सा. संघ या संस्थांच्या विद्यमाने ३० सप्टेंबर, १९७७ व १ आणि २ आक्टोबर, १९७७ ला आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय 'भारतात आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम कसला आहे' असा होता. साक्षांत वृत्तांत आक्टो.-नोव्हे., १९७७ च्या अंकातील कार्यवृत्तात प्रसिद्ध करण्यात आला.

८.१९ दि. ५ सप्टेंबर, १९७७ ला प्रा. ज. रा. फणसाळकर, नागपूर चिटणीस यांचा एकावन्नाव्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

८.२० दि. १८ सप्टेंबर, १९७७ ला श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांना त्यांच्या साक्षरता प्रचार व सांस्कृतिक कार्याबद्दल भारत सरकारचे नेहरू पारितोषिक मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

८.२१ 'सहा कवियत्री व एक समीक्षक' हा कार्यक्रम दि. १५ आक्टोबर, १९७७ ला झाला. त्यात सौ. शोभना चांदूरकर, सौ. मृणाल चिंचाळकर, सौ. अरुंधती जोशी, सौ. अपर्णा देव, माधुरी पारसणीस व सुनीती सप्रे या सहा कवियत्रींनी आपल्या कविता म्हटल्या आणि सौ. सुलभा हेर्लेकर यांनी परामर्ष घेतला.

८.२२ न्या. मू. रानडे आंतर-महाविद्यालयीन वादस्पर्धेच्या विजेत्यांना दि. २–११–७७ ला आमदार ग. प्र. प्रधान ह्यांच्या हस्ते बक्षीस समारंभ.

८.२३ दि. ७–११–७७ ला श्री. निरंजन उजगरे ह्यांचे काव्यवाचन व चर्चा.

८.२४ श्री. गणेश व्याख्यानमाला—ही व्याख्यानमाला दि. २५, २६, २७ नोव्हेंबर साहित्य अकादमी, कार्यवाह डॉ. र. श. केळकर ह्यांनी गुंफली. विषय— (१) साहित्य आणि अध्यात्म, (२) आशियातील रामायण परंपरा, (३) मराठी आणि हिंदीचे कृष्ण-काव्य असे होते.

८.२५ दि. २–१२–७७ ला महिला विभागातर्फे कथा कथनाचा कार्यक्रम. ह्यात डॉ. सौ. पद्मावती थेरगावकर, सौ. सुनीती आफळे, सौ. मालती दामले, सौ. जयश्री रुईकर व सौ. वर्षा रेगे ह्यांनी भाग घेतला.

८.२६ दि. १२–१२–७७ श्री. आत्माराम रावजी देशपांडे (अनिल) ह्यांच्या 'दशपदी' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाल्याबद्दल सत्कार.

८.२७ श्री. वेहरे व्याख्यानमाला—ही व्याख्यानमाला दि. १४ व १५ फेब्रुवारी, ७८ ला प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. पंडीत आवळीकर यांनी 'कवीचे धर्मांतर', 'कवींचे आकलन' या विषयावर गुंफली.

८.२८ आयकर सल्लागार श्री. शांतिलाल शहा ह्यांचे दि. २७–१–७८ ला 'वैज्ञानिक युगात धर्माचे स्थान' या विषयावर व्याख्यान.

८.२९ दि. ४–२–७८ ला सर्वश्री रमेश कावळे, पद्माकर पाटील, कु. विजया देशपांडे या तीन कवींचे काव्यवाचन.

८.३० दि. २७–२–७८ 'सांस्कृतिक संध्या' कार्यक्रम आयोजित केला. यांत वाद्य, नृत्य, काव्य आदि कार्यक्रम झाले.

८.३१ दि. ६–३–७८ ला डॉ. रमेश जनबंधु, कु. लता ढोरे व श्री. रंजनकुमार श्रृंगार पवार यांचे काव्य-वाचन व श्री. सुधाकर गायधनी यांनी त्यांचे समीक्षण केले.

८.३२ दि. ९–३–७८ ला 'मुलांचे मासिक' चे संपादक श्री. बा. रा. मोडक यांचा त्यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्य सत्कार.

८.३३ प्रा. दिलीप डबीर यांची १० व ११ मार्चला नारदीय कीर्तने झाली.

८.३४ खांडेकर पारितोषिक महाराष्ट्रातील सहा विद्यापीठांतून स्नातक (B. A.) परीक्षेत मराठी विषयात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १२५/- प्रमाणे खांडेकर निधीतून रोख पारितोषिके देण्यात आली.

८.३५ संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांची साहित्य अकादमीवर निवड झाल्याबद्दल दि. १९ जाने., १९७८ ला सत्कार झाला. तसेच डॉ. वा. शि. बारलिंगे विश्वस्त यांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल अभिष्ट चिंतन करण्यात आले.

९. चित्रकला समिती

९.१ दि. १४ व १५ मे, १९७७ ला नागपूर स्कूल ऑफ आर्ट्सच्या सहकार्याने चित्रकला प्रदर्शन.

९.२ दि. १४ मे १९७७ ला कलाश्रित या संस्थेच्या सहकार्याने" चित्ररंग आणि भावतरंग" हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी डॉ. मधुकर आष्टीकर, श्री. वसंत चिचाळकर, श्री. रज्जन त्रिवेदी श्री. कमलाकर धारप व प्रा. म. ना. लोही या साहित्यिकांनी चित्रासंबंधी आपल्या प्रतीक्रिया व्यक्त केल्या.

९.३ दि. २५ मे ते ८ जून पर्यंत बालचित्रकला शिबीर आयोजित केले. यांत ४ ते १४ वर्षातील १४२ मुलामुलींनी भाग घेतला.

९.४ दि. ११ जून ते १४ जून बालचित्रकला प्रदर्शन.

९.५ दि. ३ ते ८ आक्टोबर, १९७७ ला विद्यार्थ्यांनी दारूसंबंधी काढलेल्या पोस्टर्सचे प्रदर्शन.

९.६ दि. ४ ते ११ डिसेंबर ७७ स्कल्पटर्स फोरम ऑफ इंडिया या संस्थेच्या सहकार्याने शिल्पकला प्रदर्शन.

९.७ दि. ११–१–७८ ला 'यातना १९७८' सबंधी आणिबाणीतील चित्रांचे दर्शन.

१०. संगीत केंद्र

१०.१ दि. १५ ऑगष्ट, १९७७ ला सुप्रसिद्ध गायिका श्रीमती प्रभा अत्रे व पुरवी मुखर्जी यांचा सत्कार व संगीतविषयक चर्चा.

१०.२ दि. २५ सप्टेंबर, १९७७ ला गुरु गायन वादनालयाच्या विद्यार्थ्यांचा संगीताचा कार्यक्रम.

१०.३ दि. ९ आक्टो., १९७७ ला श्री अरूण कुमार भट्टाचार्य यांच्या विद्यार्थ्यांचे कार्यक्रम.

१०.४ दि. २९ आक्टोबर, १९७७ ला श्री. गोपाळ वाडेगावकर याचे सोलो तबला वादन.

१०.५ दि. १२ डिसेंबर, १९७७ ला संगीत अलंकार स्वर्गीय पंडित शंकरराव सप्रे ह्यांच्या पुण्यतिथीनिमीत्त नाट्य निपुण स्वर सम्राज्ञी कु. किर्ती शिल्लेवार ह्यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम.

१०.६ दि. २५ डिसेंबर, १९७७ ला गांधर्व संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांचे संगीत आणि वाद्य वादनाचा कार्यक्रम.

१०.७ दि. ८ जानेवारी, १९७८ ला बुटीसंगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांचे संगीत आणि वाद्य वादनाचा कार्यक्रम याप्रसंगी सूरमणि डॉ. शकुंतला पळसकर यांचा सत्कार.

११. नाट्य समिती

११.१ दि. १३ व १४ जुलै महिला एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. नागपूरातील ८ संस्थांनी भाग घेतला. सविस्तर वृत्तांत 'युगवाणी' ऑगष्ट-सप्टेंबर, १९७७ च्या अंकात दिला आहे.

११.२ दि २५ ऑगष्ट, १९७७ ला श्री पु. ल. देशपांडे लिखित 'आम्ही लटिके ना बोलू' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.

११.३ दि. २७ सप्टेंबर, १९७७ ला श्री. वसंत कानेटकर लिखित 'स्मगलर सम्राटाच्या न्यायालयात' आणि डॉ. मधुकर आष्टीकर लिखीत "डॉक्टर सलामत तो रोग पचास" या दोन एकांकिका सादर करण्यात आल्या.

११.४ दि. १ व २ आक्टोबर, १९७७ ला मुंबई येथील सुप्रसिद्ध 'बहूरूपी' या नाटयसंस्थेतर्फे 'जुलूस' या नाटकाचे प्रयोग सादर करण्यात आले.

११.५ दि. २१, २२ व २३ आक्टोबर, १९७७ ला बालनाटयस्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यात ८ बाल–नाटय संस्थानी भाग घेतला. सविस्तर वृत्त 'युगवाणी' आक्टोबर–नोव्हेंबर, १९७७ या अंकात दिले आहे.

११.६ दि. १ नोव्हेंबर, १९७७ ला सुप्रसिद्ध नट व दिग्दर्शक प्रा. मधुकर तोडरमल व सिनेनट श्री. अरूण सरनाईक यांची भेट व नाटयविषयक चर्चा.

११.७ दि. ४ नोव्हेंबर, १९७७ बालनाटय स्पर्धेचे पारितोषिक वितरण श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे हस्ते.

११.८ दि. ५–११–७७ ला मराठी रंगभूमीदिन साजरा झाला. त्यावेळी मराठी नाटय परिषदेच्या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. पु. व्य. दारव्हेकर यांचा सत्कार करण्यात आला.

११.९ इतर नाटयस्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्या अशा—१. कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा, २. पुरूष पात्र विरहित एकांकिका लेखन स्पर्धा, यशस्वी झालेल्या स्पर्धकांची नावे आणि वैयक्तिक अभिनयात प्रशंसापात्र कलावंतांची नावे युगवाणीच्या फेब्रुवारी–मार्च, १९७७ च्या अंकात दिलेली आहेत.

११.१० दि. १०, ११ व १२ फेब्रुवारी, १९७८ ला श्री. सेतुमाधवराव पगडी यांची व्यास्याने झाली. विषय १. उर्दू काव्यातील प्रवाह, २. इतिहास संशोधनातील विनोद आणि ३. 'मराठी रंगभूमी काल, आज आणि उद्या' असे होते.

११.११ आनंदवन, वरोरा यांच्या वतीने अशोक–वन मित्र–मेळावा दि. १२ मार्च, १९७८ ला भरला होता. हे स्थान नागपूर वर्धा रोडवर असून या प्रसंगी नाटय समितीच्या वतीने "हंगर स्ट्राईक" ही एकांकिका सादर करण्यात आली.

१२. परीक्षा समिती

१२.१ ऑगष्ट, १९७७ व फेब्रुवारी. १९७८ या दोन्ही सत्रात मिळून एकूण २५६२ परीक्षार्थी सम्मीलित झाले. गतवर्षीपेक्षा ही संख्या ६५६ ने कमी आहे. विद्यालयीन-महाविद्यायीन व शासकीय कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन संपामुळे वाढ होण्याऐवजी संख्येत घट झालेली आहे.

१२.२ गतवर्षीचे उत्पन्न- रु. १४५६६ तर यावर्षी रु. ११५८१-०५ गतवर्षीचा व्यय- रु. १५३५२ तर यावर्षी रु. १४७९३-३०.

१२.३ एकूण ५७ केंद्रात यावर्षी परीक्षा घेण्यात आली.

१२.४ प्रतिसत्रात सर्वप्रथम येणाऱ्या परीक्षार्थ्यांस आणि सर्वाधिक परीक्षाशुल्क व परीक्षार्थी पाठविणाऱ्या केंद्राधिकाऱ्यांस पारितोषके प्रदान करण्यात आली.

१२.५ प्रा. सौ. सुनंदा कुळकर्णी यांना यावर्षी समारंभपूर्वक मामावरेरकर पारितोषिक रूपये १०१, साहित्याचार्य सर्वोच्चपदवी प्राप्त केल्यावद्दल प्रदान करण्यात आले.

१२.६ सप्टेंबर व फेब्रुवारी दोन्ही सत्रातील शासकीय परीक्षांचे वर्ग घेण्यात येऊन अ-मराठी शासकीय अधिकारी वर्गाचे समारोप समारंभ घडविण्यात आले.

१२.७ प्रथम सत्रीय दीक्षान्त समारंभ माजी कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांचे हस्ते साजरा करण्यात आला.

१२.८ अहवाल वर्षी ४ पदवीधरांनी साहित्याचार्य प्रबंध परीक्षेकरिता आपली नावे व विषय नोंदविले आहेत.

१२.९ अहवाल वर्षी परीक्षा समितीच्या दोन बैठकी भरविण्यात येऊन धोरण व पाठचक्रम निश्चित करण्यात आला.

१३. श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालय

१३.१ दि. ३० ऑगस्ट, १९७७ ला अभ्यास मंडळातर्फे श्री. मधुकर राजे यांचे कवी 'बी' व त्यांची कविता या विषयावर व्याख्यान.

१३.२ दि. ३० आक्टोबर, १९७७ ला डॉ. सौ. आशा सावदेकर यांचे कै. नीळकंठ बळवंत भवाळकर व्यक्ती आणि कार्य या विषयावर भाषण.

१३.३ दि. ५ मार्च, ७८ ला श्री. रमेश अंभईकर यांनी 'आजची मराठी रंगभूमी' या विषयावर भाषण दिले.

१३.४ एम. ए. मराठी आणि साहित्य पारंगतच्या परीक्षांना बसणाऱ्या १०० विद्यार्थ्यांना श्री. चंद्रकांत कुळकर्णी ह्यांनी मार्गदर्शन केले. सौ. शुभांगी संत, सौ. सुमती संत, श्री. अक्षयकुमार काळे या संशोधकांनी सहकार्य दिले. अभ्यास मंडळाचा नियमित लाभ घेणारे ४० विद्यार्थी होते.

१३.५ नागपुरातील वर्तमानपत्रांच्या संपादकांना विशेष सहकार्य देण्यांत आले. प्रा. भास्कर नंदनवार, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे, श्री. प्रभाकर पुराणिक या लेखकांना आणि आकाशवाणी केंद्रालाही विशेष संदर्भ सेवा देण्यात आली.

१३.६ अहवाल वर्षात २१७ ग्रंथ विकत घेण्यात आले. युगवाणीकडून ११२ पुस्तके मिळाली. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय, संचालनालयाकडून महाभारताचे १८ खंड (संस्कृत) मिळाले. तसेच डॉ. शकुंतला खोत यांनी २ पुस्तके देणगी दाखल दिली.

१३.७ सध्या ग्रंथालयाच्या संग्रही एकूण ७,५७५ पुस्तके आहेत.

१३.८ ग्रंथालयासाठी २ कपाटे, १ मॅगझीन रॅक खरेदी करण्यात आले.

१३.९ संदर्भ ग्रंथालयात असलेल्या प्रतिभा, नवभारत, ललित इत्यादी मासिकाच्या अंकाची बांधणी करून घेण्यांत आली.

१३.१० सौ. शान्ता देउस्कर, श्री. राजशेखर वालेकर, श्री. वसंतराव कुळकर्णी या व्यक्तींनी ग्रंथ निवडीकरता सहकार्य दिले.

१४. युगवाणी

१४.१ यावर्षी युगवाणीचे सहा जोड अंक प्रकाशित झाले. त्यात 'दीपावली' विशेषांक महत्वाचा होता.

१४.२ भेटीदाखल व परीक्षणार्थ आलेल्या ११२ ग्रंथाची युगावणीमध्ये वेळोवेळी पोच देण्यात आली.

१४.३ युगवाणीला परतभेटी दाखल खालील नियतकालिके येतात—

दैनिके :– तरुण भारत, नागपूर टाईम्स्, महासागर, राष्ट्रदूत, उद्घोष.

साप्ताहिक :– साधना, विवेक, आर्वीटाईम्स्, मराठवाडा, प्रज्वलंत, सोबत, लोकराज्य, नागरीक जीवन, चर्चा व पुण्याचे तरुण भारत.

पाक्षिके :– मासेस, रुद्रवाणी, सोव्हिएट देश.

मासिके :– लोकशिक्षण, वाचनालय, कुमार, मराठी विज्ञान परिषद, किर्लोस्कर, पुरुषार्थ, प्रतिष्ठान, प्रसाद, सत्यकथा, नवभारत, आलोचना, साहित्य सहकार, तत्वज्ञान, नवनीत, मागोवा, प्राज्ञलोक, कविता, जीवनविकास, स्पेन, महानुभव, एकता, ललित, मायमराठी, संतकृपा, ज्ञानोदय, तात्पर्य पंचधारा, अमृत, अरुंधती, संमति व वायजा.

द्वैमासिक :– अस्मितादर्श.

त्रैमासिक :–प्रेरणा, मराठी संशोधन पत्रिका, मराठी साहित्य पत्रिका.

दैनिक महाराष्ट्र टाईम्स् विकत घेतल्या जातो.

१५. धनवटे रंग मंदिर

१५.१ यावर्षी रंग मंदिराच्या वापराबद्दल खालील उत्पन्न झाले—

	प्रयोग	उत्पन्न रु.
(१) नाटचप्रयोग	१७८	५२,५००.००
(२) बालनाटच	२५	२,१७५.००
(३) सांस्कृतिक कार्यक्रम (आर्केस्ट्रा, गायन आदि)	७४	३०,५००.००
(४) सभा, संमेलन व इतर	४१	८,१६५.००
(५) जादुचे प्रयोग	४	१,६५०.००
	एकूण	९४,९९०.००

१५.२ धनवटे रंग मंदिरातील कँटीन, पानठेला, सायकल स्टचँड आदिकरिता रीतसर निविदा मागवून ठेका एकूण रु. ५,४००.०० ला देण्यात आला.

१५.३ नवीन ६ पंखे (४८") घेण्यात आले.

१६. अनुदान

१६.१	श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय विभागातर्फे	रु. २,५००.००
१६.२	नाटच व इतर कलात्मक कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाच्या संस्कृति आणि कला संचालनालयातर्फे १९७७–७८ या वर्षीकरिता (हे अनुदान मे, १९७८ मध्ये प्राप्त झाले)	रु. ६,०००.००
१६.३	महाराष्ट्र राज्य आणि संस्कृति मंडळाकडून 'युगवाणी' करिता	रु. १०,०००.००
१६.४	महाराष्ट्र शासनाकडून मिळालेले वि. सा. संघाची मेंटनंस् ग्रँट १९७७–७८	रु. ६,०९०.००

याशिवाय (१) कै. पंडित शंकरराव सप्रे यांच्या स्मृती प्रीत्यर्थ सप्रे कुटुंबियांकडून रु. ३,०००.०० ची देणगी. (२) कै. हंबर्डे स्मारक निधि रु. १५१.००. (३) कै. कु. छाया दुपल्लीवार व कै. बाळ डांगरे ह्यांचे स्मृति प्रीत्यर्थ अभिनयाची पारितोषिके द्यावीत म्हणून श्री. पु.त्रा. दारव्हेकरांच्या सत्कार निधीतून तूर्त रु. १,०२७.०० जमा करण्यात आले. श्री. गणेश नायडू ह्यांनी त्यात रु. ३१.०० ची भर घातली.

अनुक्रमणिका

१७. वि. सा. संघाचे साहित्य संमेलन :

वि. सा. संघाचे ३३ वे साहित्य संमेलन भंडारा येथे घेण्याचे ठरले. परंतु ते अहवाल वर्षात होऊ शकले नाही.

१९. मराठी साहित्य महामंडळ

अहवाल वर्षात दि. ३ जुलै, १९७७ व १७ नोव्हेंबर, १९७७ ला पुणे येथे सभा झाल्या. या सभांना वि. सा. संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

२०. शाखा सभावृत्त :

२०.१	अमरावती	१५ एप्रिल, १९७७	वि. सा. संघ शाखा स्थापना.
२०.२		१३ फेब्रु., १९७८	बेहेरे व्याख्यान मालेतील एक व्याख्यान प्रा. डॉ. पंडीत आवळीकर यांनी दिले.
२०.३	ब्रह्मपुरी	२१ व २२ जाने., १९७८	प्रथम वार्षिक उत्सव साजरा केला.
२०.४	वणी	१८ मे, १९७७	हमीद दलवाई यांचे दु:खद निधनाबद्दल शोकसभा.
२०.५		१ जुलै, १९७७	कवि भूषण अण्णासाहेब खापर्डे यांचे निधनाबद्दल शोक सभा.
२०.६		४ मार्च, १९७८	वैदर्भीय लेखिकांच्या कवितांच्या पल्लवी ग्रंथाचे प्रकाशन.
२०.७	नागभीड	८ जाने., १९७८	डॉ. आष्टीकरांच्या हस्ते शाखेचे उद्‌घाटन.
२०.८		२३ जाने., १९७८	भ. श्री. पंडीत यांचे दुख:द निधनानिमित्त शोकसभा.
२०.९		१२ फेब्रु., १९७८	पु. शी. रेगे यांचे दुख:द निधनानिमित्त शोकसभा.
२०.१०	दिग्रस	१६ ऑक्टो., १९७७	नवीन शाखा उघडण्यात आली.
२०.११		१५ डिसें., १९७७	कवि अनिल यांच्या दशपदी काव्य संग्रहाला पारितोषिक मिळाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.
२०.१२		१९ जाने., १९७८ ते २१ जाने., १९७८	सुशिला पाटील यांनी महाभारतातील कर्ण व द्रौपदी या विषयावर तीन दिवस व्याख्याने दिली.
२०.१३	गोंदिया	२३ जाने., १९७८	राम गणेश गडकरी स्मृति दिन.
२०.१४		६ फेब्रु., १९७८	कथा कथनाचा कार्यक्रम.
२०.१५		३ मार्च, १९७८	प्रा. या. मु. पाठक यांचे समर्थ रामदासावर व्याख्यान झाले.
२०.१६		१२ मार्च, १९७८	नानासाहेब तेलंग यांचे निधनाबद्दल शोकसभा.
२०.१७	अचलपूर	१८ मे, १९७७	शाखा स्थापना डॉ. आष्टीकर यांचे हस्ते.
२०.१८		२८ जून, १९७७	प्रा. राम शेवाळकर यांचे व्याख्यान.
२०.१९		१ डिसें., १९७७	कविसंमेलन स्थानिक कलाकारातर्फे.

अनुक्रमणिका

२०.२०	२२ जाने., १९७८	बालनाटच स्पर्धा १५ वर्षा खालील मुलांमाठी 'कोंबडा बघतां पहाटेची वाट' या एकांकिकेला बक्षिस मिळाले.
२०.२१	३० मार्च, १९७८	श्री. दातार यांचे "रामायणातील राजनिती" या विषयावर व्याख्यान.
२०.२२ लाखनी	६ आक्टो., १९७७	शाखेचे उद्घाटन श्री. वसंतराव वरखेडकर यांचे हस्ते झाले.
२०.२३	११ मार्च, १९७८	'साहित्य व समाज' या विषयावर द. त्र्यं. साठे यांचे व्याख्यान.
२०.२४ दारव्हा	१५ ऑगष्ट, १९७७	कवि संमेलनचा कार्यक्रम स्थानिक कलाकारातर्फे.
२०.२५	२ आक्टो., १९७७	गांधी जयंती निमित्त कार्यक्रम.
२०.२६	२३ नोव्हें., १९७७	श्रीमती शांताबाई किर्लोस्कर, पुणे, यांचे व्याख्यान.
२०.२७	२४ जाने., १९७८	गडकरी पुण्यतिथी.
२०.२८	२५ जाने., १९७८	कविसंमेलन.
२०.२९ यवतमाळ	९ एप्रिल, १९७७	कविवर्य राजाभाऊ बढे यांना श्रद्धांजली व प्रा. ना. य. कुळकर्णी यांचे सौंदर्याची प्रतिती या विषयावर व्याख्यान.
२०.३०	१० एप्रिल, १९७७	'खोटे बाई आत जा" या बक्षीस पात्र नाट्यप्रयोगातील कलावंताचा सत्कार.
